**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी)**

**पृ.शी.**: महाराष्ट्राच्या नागरी भागातील समस्या सोडविण्यास शासनास आलेले अपयश

**मु.शी.**: महाराष्ट्राच्या नागरी भागातील समस्या सोडविण्यास शासनास आलेले अपयश या विषयावर सर्वश्री विनोद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत प्र.पाटील, सुमंतराव गायकवाड, चंद्रकांत पाटील, डॉ. दीपक सावंत, श्रीमती शोभा फडणवीस, डॉ. नीलम गोऱ्हे, डॉ. रणजित पाटील, श्री. रामनाथ मोते, ॲड.आशिष शेलार, सर्वश्री विजय उर्फ भाई गिरकर, नागो पुंडलिक गाणार व भगवान साळुंखे यांचा प्रस्ताव

श्री. विनोद तावडे (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो.

"महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक नागरिकरण झालेले राज्य असणे, मुंबई देशाची आर्थिक राजधानी असूनही व एमएमआरडीए परिसरातील जनतेला तसेच उप राजधानी नागपूर येथील नागरिकांना ब-याच समस्यांना सामोरे जावे लागणे, अमरावती, अकोला व चंद्रपूर इत्यादी महानगरपालिकांची आर्थिक स्थिती शासनाच्या दुर्लक्षामुळे खालावलेली असणे, नागरी भागातील जनतेला रस्ते, भूमिगत गटार व्यवस्थापन, पाणी पुरवठा, घन कचरा व्यवस्थापन इत्यादी पायाभूत सुविधांपासून वंचित राहण्याची वेळ येणे, स्ट्रक्चरल ऑडिट अभावी ३० वर्षापेक्षा जास्त वय असलेल्या इमारतीतील नागरिकांचा जीव धोक्यात येणे, तसेच फायर ऑडिट केवळ कागदावरच झाल्याने अनेक इमारतीमधील नागरिकांचे जीवन असुरक्षित असणे, मुंबई ठाणे जिल्हयामध्ये क्लस्टर डेव्हलपमेंटबाबत शासनाने वेळेत निर्णय न घेणे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेमध्ये अनधिकृत घरांची मोठी समस्या निर्माण होणे, स्वस्तात घरे उपलब्ध करुन देण्यासाठी स्थापन केलेल्या म्हाडाने पुनर्विकासाच्या धोरणामध्ये वारंवार बदल करणे, या बदललेल्या धोरणामुळे रहिवाशांचा फायदा होणे अपेक्षित असताना, प्रत्यक्षात ४०० चौ.फू.पेक्षा कमी बांधीव क्षेत्र (Built Up Area)मिळण्याची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शक्यता निर्माण होणे, मुंबई व मुंबई उपनगर जिल्हयातील शासकीय जमिनीवर



श्री. विनोद तावडे....

अतिक्रमण रोखण्याची जबाबदारी असलेल्या अधिका-यांनीच अतिक्रमण करण्यास प्रोत्साहन देणे, शासकीय अधिकाऱ्यांच्या या भ्रष्टाचारामुळे गरीब नागरिकांचे स्वस्तात घरे मिळविण्याचे स्वप्न भंग पावणे, महाराष्ट्रातील नागरी भागाच्या समस्या सोडविण्यात शासनास आलेले अपयश त्यामुळे कोटयवधी जनतेमध्ये निर्माण झालेला असंतोष व या समस्या सोडविण्यासाठी शासनाने करावयाची कारवाई व याबाबतची शासनाची भूमिका विचारात घेण्यात यावी."

सभापती महोदय, नगरविकास विभागाशी संबंधित असा हा विरोधी पक्षाचा प्रस्ताव आहे. या प्रस्तावावरील चर्चेच्या वेळी माननीय मुख्यमंत्री महोदय सभागृहामध्ये उपस्थित रहातील अशी अपेक्षा होती. परंतु मला वरवर असे कळले की, "आदर्श" घोटाळयाचा पर्दाफाश आजच्या आज सभागृहामध्ये करावयाचा की नाही यासंबंधी आता कॅबिनेटमध्ये चर्चा चालू आहे. माननीय मुख्यमंत्री अशा कॅबिनेटमध्ये आहेत की ज्यामध्ये आदर्श अहवाला संबंधी चर्चा चालू आहे. या आदर्श प्रकरणाचा अहवाल घटनेप्रमाणे, कमिशन ऑफ इन्क्वायरी ॲक्टप्रमाणे सहा महिन्यामध्ये सभागृहासमोर मांडला पाहिजे, तो मांडला गेला नाही म्हणून कोर्टात दाद मागण्यात आली. कोर्टाने तो अहवाल मांडण्याचे निर्देश दिलेले आहेत त्यामुळे तो अहवाल मांडला जाईल असे मी गृहीत धरतो. आमच्या कोकणातील तरुण आणि तडफदार राज्यमंत्री श्री. उदय सामंत हे सन्माननीय सदस्य श्री. भास्करराव जाधव यांना चितपट करुन आलेले आहेत. ते या चर्चेची नोंद घेतील. माननीय मंत्री महोदय श्री. पद्माकर वळवी यांनी चर्चेची नोंद घेऊन काही उपयोग नाही. कारण त्यांची शिव छत्रपती पुरस्काराची फाईल माननीय मुख्यमंत्री परत पाठवितात. पण त्यांनी प्रयत्न करत राहावे, अडथळयांची शर्यत त्यांनी पार पाडत रहावे, त्यांना ऑलंपिकमध्ये गोल्ड मेडल मिळेल.

सभापती महोदय, विधानपरिषदेमध्ये ओल्या दुष्काळासंबंधी, महिला व बालविकासासंबंधी, नगरविकससंबंधी आणि अंतिम आठवडा असे चार प्रस्ताव देऊन विरोधी पक्षाच्या भूमिकेतून सरकारवर टीका करत असताना आम्ही काही सूचना सुध्दा करतो. काल माननीय गृहमंत्री महोदय श्री.आर.आर.पाटील यांनी विरोधी पक्षाच्या विधायक सूचनेचे स्वागत करुन काही नवीन योजना घोषित केल्या. आम्ही चांगल्या सूचना करतो, परंतु ज्याना समजण्याची क्षमता आहे ते समजतात आणि कार्यवाही करतात. आम्ही मात्र विधायक सूचना करण्याची आपली भूमिका पार पाडत असतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

२०-१२-२०१३ ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-३

MSS/ D/ ST/ १०:००

श्री. विनोद तावडे....

सभापती महोदय, आजच्या या नगरविकास विभागाशी संबंधित असलेल्या प्रस्तावावर बोलत असताना मला असे वाटते की, ठाणे असेल, पिंपरी-चिंचवड असेल, मुंब्रा असेल आणि बाकीच्या ठिकाणी देखील अशा पध्दतीचे विषय सुरु झालेले आहेत. हे अधिवेशन नागपूरमध्ये होत असताना नागपूरचे प्रश्न प्रामुख्याने घेतले जातात, परंतु राज्यातील अन्य महत्वाच्या प्रश्नावर देखील चर्चा होणे आवश्यक असते म्हणून हा प्रस्ताव आम्ही दिलेला आहे. संपूर्ण देशाचे नागरीकरणाचे प्रमाण जवळपास 24 ते 25 टक्के असताना महाराष्ट्रात मात्र हे नागरीकरणाचे प्रमाण 50 ते 52 टक्क्यापर्यंत गेलेले आहे. वाढत्या नागरीकरणाचे काही फायदे आहेत आणि काही तोटे देखील आहेत. आपण नागरीकरणाचे फायदे घेत आहोत. आपला जीडीपी वाढलेला आहे, त्याचा वापर करुन या राज्यामध्ये जी काही आर्थिक उलाढाल होत आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

त्या गोष्टीचा फायदा घेत आपण नागरीकरणाच्या आव्हानांवर मात करण्याऐवजी जीडीपी वाढला आहे म्हणून कर्ज काढण्याचे काम करीत आहात. आपण कर्जावर कर्ज काढीत आहात, पण आमच्या शेतकऱ्यांना काही आर्थिक लाभ दिला आहे काय, झोपडपट्टीतील माणसाला काही लाभ मिळाला आहे काय, या लोकांना कोणत्याही प्रकारचा लाभ फायदा शासनाकडून दिला गेलेला नाही असे माझ ो स्पष्ट मत आहे. या राज्यावर 2 लाख 85 हजार कोटी रुपयांचे कर्ज होते. 3 लाख 85 हजार कोटी रुपयांचे कर्ज झाल्याची बातमी आम्हाला मिळाली आहे. नागरीकरण वाढल्यामुळे जीडीपी वाढलेला आहे, वाढलेल्या जीडपीचा उपयोग वाढत्या शहरीकरणासाठी किती प्रमाणात होत आहे, या गोष्टीचे सरकारने आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे. वाढत्या शहरीकरणातून मोठया प्रमाणात उत्पन्न गोळा केले जात आहे, परंतु त्या उत्पन्नातून मिळालेला पैसा नागरीकरणाच्या समस्येसाठी न वापरता तो निधी स्वत:च्या आमदारांना दहा-दहा कोटी विकास निधी म्हणून द्यावयाचा आणि त्यांच्याकडून कामे करुन घ्यावयाची, त्यांच्या ठेकेदारांची देणी द्यावयाची आणि या विकास कामाच्या नावाखाली निवडणूक फंड गोळा करावयाचा, अशा प्रकारे पैसे घालाविण्यापेक्षा शहरीकरणाच्या ज्या समस्या आहेत, त्या समस्यांना तोंड देण्यासाठी आलेल्या पैशांचा उपयोग केला असता तर तो पैसा सत्कारणी लागला असता तसेच तो खर्च जनतेच्या दृष्टीने महत्वाचा ठरला असता.

सभापती महोदय, नागपूर महापालिकेची शासन स्तरावर निर्णयासाठी अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत. नगररचना विभागाचा नागपूर शहरात वाणिज्यिक क्षेत्रासाठी चटईक्षेत्र निर्देशांक वाढविण्याचा हा विषय बऱ्याच दिवसापासून शासन स्तरावर प्रलंबित आहे. महानगरपालिकेच्या बीओटी तत्वावरील प्रस्तावित हॉस्पिटलच्या बांधकामाकरिता अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करण्याबाबतचा विषय देखील प्रलंबित आहे. या विषयी महानगरपालिका, नागपूर यांच्याकडून शासनाकडे सातत्याने पत्रव्यवहार चालला आहे. नागपूर येथे महापालिका असतानाही आपण नागपूर सुधार प्रन्यासची स्थापना केली. त्यांचा प्लॉट नियमित करण्याबाबातचा एक विषय आहे. हा विषय देखील शासन स्तरावर प्रलंबित आहे. नागपूर शहरातील 80 लेआऊट नियमित झालेले नाहीत. या बाबतीत नागरिक दररोज पाठपुरावा करीत आहेत. नागपूर महानगरपालिकेचे आणि नागपूर सुधार प्रन्यासचे अनेक विषय दुर्दैवाने शासन दरबारात लालफितीत अडकलेले आहेत.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

नागपूर शहरात सुध्दा जागेचे आरक्षण बदलून विशिष्ट लोकांना फायदा देण्यात आलेला आहे. नागपूर मधील चिखली येथील भूखंड क्रमांक 3341 चे आरक्षण बदलले गेले. हा भूखंड सिवरेज प्लॅन्टसाठी आरक्षित होता. ते आरक्षण निवासी भूखंडात बदलले गेले. ते आरक्षण का बदलले, कोणासाठी बदलले, या आरक्षणाचा लाभ कोणाला झाला या गोष्टींचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात करावा.

सभापती महोदय, अशाच प्रकारचे मी दुसरे उदाहरण सांगतो. मौजे खामला येथील शासकीय अधिकारी आणि विकासक यांच्या टोळीने संगनमत करुन या जमिनी शहरी घरासाठी आरक्षित असताना सदर जमीन विकासकाने गिळंकृत केल्याचे दिसून येते. मौजे खामला येथील खासरा नंबर 82 व 95 हे भूखंड गुंठेवारी कायदा अंतर्गत दिनांक 28 मे, 2008 रोजी नियमित केले गेले. सदरील प्लॉटचे संदर्भात एनआयटीने 71632.87 चौरस मीटरच्या 5 प्लॉटचे नियमितीकरण दिनांक 10 जून, 2008 रोजी केले. यानंतर एनआयटीने 2011-12 नंतर दोन आराखडे मंजूर केले. सदरची जागा शहरातील गरिबांच्या निवाऱ्यासाठी वापरता येऊ शकत होती, असे असताना सुध्दा विकासक आणि शासकीय बाबू यांनी सदरील जागा गिळंकृत केली आहे. त्या विकासकावर आणि शासकीय बाबूंवर कारवाई करण्याची हिंमत सरकार दाखविणार आहे काय असा माझा प्रश्न आहे. या ठिकाणचे प्रशासन होलेस्टीक अर्बन प्लॅनिंग पासून अनेक मैल दूर आहे. जेथे जेथे मलिदा मारता येईल, त्या पध्दतीने मलिदा मारत जावयाचा, अशा पध्दतीने तेथील कारभार चालला आहे.

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ ST/ 10:10

श्री.विनोद तावडे.....

सभापती महोदय, बांधकाम विभागांतर्गत आयआरडीपी योजनेमधून नागपूर शहरात तयार करण्यात आलेले रस्ते व इतर रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी शासन अनुदान देणार होते. अतिवृष्टी झाल्यानंतर रस्त्यांचे जे नुकसान झाले त्याकरिता महापालिकेने 500 कोटी रुपयांची मागणी केली होती. दुर्दैवाने सरकारकडून अद्याप निधी दिला गेलेला नाही. पुरवणी मागण्यांमध्ये सुध्दा या करिता तरतूद व्हावयास पाहिजे होती ती झालेली नाही.

सभापती महोदय, पाणी पुरवठा व पाटबंधारे विभागाकडून पेंच नवेगाव खैरी जलाशयातून नागपूर महापालिकेला 78 दलघमी पाणी पुरवठा करण्याबाबत स्थायी समितीने मंजुरी दिल्यानंतर शासनाने महापालिकेला 8445 लाख रुपये भरणा करण्याविषयी सूट देण्याच्या विषयाबाबत सातत्याने महापालिका पाठपुरावा करीत आहे. शहरातील लोकांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याबाबत सरकारकडून ठोस पाऊल उचलले जात नाही. त्यामुळे या प्रस्तावाच्या अनुषंगाने विदर्भाच्या शहरातील विषय या ठिकाणी मांडावेसे वाटतात.

सभापती महोदय, अकोला महापालिकेमध्ये गुंठेवारीचे नकाशे आयुक्तांनी मंजूर केले असून गुंठेवारीचा कायदा, 2001 नुसार कागदपत्रांची पूर्तता न करताच गुंठेवारी मंजूर केली आहे. अकोला महापालिकेचे आयुक्त यांच्याबाबत अनेक मुद्दे यापूर्वी माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर व दिवाकर रावते यांनी या सभागृहात मांडलेले आहेत. डॉ.उत्कर्ष गुटे यांच्याकडे प्रभारी आयुक्त पदाचा कार्यभार असताना त्यांनी राजेंद्र घनबहादूर यांना सहाय्यक आयुक्त पदावर नेमले. घनबहादूर हा कर्मचारी कंपाऊंडर असून त्याला सहाय्यक आयुक्त पदावर नियुक्ती दिल्याबद्दलची बाब कोर्टात गेल्यानंतर ते त्या दर्जाचे नसल्यामुळे त्यांना सहाय्यक आयुक्त पदी नेमू नये असे कोर्टाने निर्देश दिले. त्यानंतर त्यांना पदावनत केले गेले. नवीन आयुक्त आल्यानंतर त्यांनी घनबहादूर यांना पुन्हा सहाय्यक आयुक्त पदी बढती दिली. राजेंद्र घनबहादूर याच्यामध्ये अशी काय बहादुरी आहे हे कळून येत नाही. आयुक्त एका सामान्य कर्मचाऱ्याला सहाय्यक आयुक्त पदावर नियुक्ती देतात त्याबाबत सुध्दा राज्य सरकार जे चुकीचे केले आहे त्याबद्दल आयुक्तांवर कारवाई करणार का हे स्पष्ट केले पाहिजे.

सभापती महोदय, वैद्यकीय देयकांची प्रतिपूर्ती करण्याची नस्ती अकोला महापालिकेतून गहाळ झाली आहे. याच विषयावर वारंवार मुद्दा मांडण्यात आला आहे. शिक्षकांना सहावा वेतन

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

20-12-2013 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) C.2

श्री.विनोद तावडे.....

आयोग लागू झाल्यानंतर शिक्षकांना मिळणा-या रक्कमेला आयुक्तांनी पध्दतशीरपणे बगल दिली. शिक्षकांना सहावा वेतन आयोग लागू झाल्यानंतर त्याची थकबाकीची रक्कम मिळाली. परंतु प्रत्यक्ष शिक्षकांपर्यंत ती न पोहोचता ते पैसे कुठे वापरले गेले? का वापरले, कशासाठी वापरले, कोणाच्या परवानगीने वापरले? या संदर्भात स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, अकोला महापालिकेतील शिक्षण विभागातील कार्यरत 9 अस्थायी कला शिक्षकाची पदे 1994 पासून सेवेत कायम करण्याचे प्रकरण नागपूर खंडपीठामध्ये प्रलंबित असून डॉ.गुटे यांनी 10 ऑक्टोबरच्या सभेत ऐनवेळी विषय मंजूर करुन घेतला आहे. प्रभारी आयुक्तपदाची सूत्रे स्वीकारणाऱ्या आणि प्रचंड आर्थिक गैरव्यवहार करणाऱ्या डॉ.गुटे यांची चौकशी करण्याकरिता समिती नेमणार आहात का?

सभापती महोदय, विदर्भातून जर मुंबईकडे जायचे असेल तर मुंबईमध्ये महानगरपालिका, एसआरए, म्हाडा, एमआयडीसी, प्रदूषण नियंत्रण मंडळ, एमएमआरडीए, भारतीय रेल, पीडब्ल्यूडी, मुंबई पोलीस, मुंबई पोर्ट ट्रस्ट, आरटीओ, एमएसआरडीसी, एमटीएनएल, बीईएसटी, महाराष्ट्र सरकार अशा जवळजवळ 15 वेगवेगळ्या एजन्सींकडून मोठया प्रमाणात कामे केली जातात. या एजन्सींमध्ये योग्य प्रकारचा समन्वय नाही. जसे सरकारमध्ये काँग्रेस पक्षाच्या मंत्र्यांच्या खात्यातील फाईल राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या मंत्र्यांच्या खात्याकडून अडविली जाते आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या मंत्र्यांच्या खात्यातील फाईल काँग्रेस पक्षाच्या मंत्र्यांच्या खात्याकडून अडविली जाते तोच प्रकार या एजन्सींकडून केल्या जाणाऱ्या कामांबाबत होत असतो. मागील वेळी मी हा विषय उपस्थित केला होता. माननीय मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिले होते. महाराष्ट्राच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली या सर्व एजन्सीच्या प्रमुखाची नियमितपणे किमान त्रैमासिक बैठक झाली पाहिजे.

नंतर डी.1...

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

या बैठकीला ते आले पाहिजेत. अशा रितीने समन्वय झाला तर मुंबईचे अनेक प्रश्न मार्गी लागू शकतील. असे केले तरच नागरी विषयातील सिंगल विंडो सिस्टीम पार पाडली जाऊ शकेल.

सभापती महोदय, मागे आम्ही माननीय मुख्यमंत्री महोदयांना मुंबईतील विक्रोळी-पार्कसाईट येथील एसआरएच्या इमारतीला लागलेल्या आगी संबंधी भेटलो होतो. एसआरए अंतर्गत बांधण्यात येणाऱ्या इमारतीमध्ये गरीब लोकांना कमीतकमी कशा सुविधा देता येतील याचा विचार केला जातो. अशा इमारतीला लाग लागून पाच जणांचा आगीत मृत्यू झाला. ती दलित समाजाची मागासलेली माणसे असल्यामुळे काहीच बोलू शकली नाहीत. तेथील आमचे माजी खासदार श्री.किरीट सोमैया, आमचे सरचिटणीस श्री.विनायक कामत यांनी हा विषय लावून धरला व उपोषण देखील केले. तेथे स्वत: श्री.रामदास आठवले साहेब आले होते. माननीय मुख्यमंत्र्यांना भेटल्यानंतर मुख्यमंत्री निधीतून तेथील लोकांना मदत करण्यात आली. मी प्रत्यक्ष जागेवर जाऊन आलो असून एसआरएची बिल्डींग चुकीच्या पद्धतीने बांधली गेली. ऑन पेपर ॲम्ब्युलन्स व फायर ब्रिगेडसाठी जागा दाखविण्यात आली आहे. प्रत्यक्षात तशी जागा नाही. असे एकाच इमारतीत नाही तर मुंबईतील सर्व एसआरएच्या इमारतीबाबत आहे. सर्व बांधकाम हे बिल्डींग कन्स्ट्रक्शन्स रूल्स प्रमाणे झाले पाहिजे. तसे बांधकाम झालेले नाही. त्यामुळे एसआरए अंतर्गत बांधण्यात आलेल्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट पासून फायर ऑडिट करण्याची पुन्हा गरज आहे. असे ऑडिट करत असताना नॅशनल बिल्डींग कोड प्रमाणे एसआरएच्या इमारती बांधल्या गेल्या आहेत काय हे देखील तपासून पहावे. कायद्यातील, नियमातील त्रुटी काढून बिल्डरला सूट देण्याचे काम होत आहे. या एसआरएचे वैशिष्ट्य असे आहे की, एसआरएचा अधिकारी हा नंतर मुंबईत बिल्डर होतो. मी यापूर्वीच अधिकाऱ्यांची नावे घेतलेली आहेत. अशा प्रकारे मुंबईतील इस्टेट इंडस्ट्रीमध्ये नवनवीन बिल्डरांची भर पडत असल्याचे दिसून येते. कॅम्पाकोला संबंधी मांडणी करण्यात येणार असे काल माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितल्यामुळे मी तो विषय आज काही घेत नाही.

सभापती महोदय, ठाणे आणि पुणे जिल्ह्यातील अर्बन रिन्यूअल क्लस्टर सिस्टीमचा मुद्दा मी आता मांडणार आहे. ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीत अर्बन रिन्यूअल क्लस्टर सिस्टीम

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

राबविण्याचा शासनाचा मानस आहे. तशी योजना पुणे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीत शासनाने राबविणे गरजेचे आहे. ठाणे, पुणे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीत धोकादायक इमारतीत राहणाऱ्या रहिवाशांना घरे उपलब्ध करून देण्यासाठी विशेष योजना राबाविण्याची आवश्यकता आहे. ठाणे, पुणे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीत बीएसयुपी योजना राबविण्यास महापालिकांना अपयश आले आहे. ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीत राबविण्यात येणारी अर्बन रिन्यूअल क्लस्टर योजना ही सर्वसमावेशक असली पाहिजे. ती योजना यशस्वीरित्या राबवली जाऊ शकते. महानगरपालिकेच्या हद्दीत असलेल्या गरीब लोकांना त्याचा लाभ मिळू शकतो. या योजनेचा म्हाडा, महापालिका स्वत: किंवा संस्थे मार्फत विकास करू शकते. कोणत्याही भूखंडाचे क्षेत्रफळ चार हजार चौ.मी.असेल तर व सभोवतालचा परिसर हा नैसर्गिक हद्द असेल म्हणजे रस्ता, नाला, रेल्वे लाईन अशा स्वरूपाचा भूखंड या योजनेसाठी पात्र राहील असे नियमामध्ये आहे ते नियम सर्वांना माहीत देखील आहेत. ही योजना मुंबई शहरात काही अंशी यशस्वी झाली. तशी योजना ठाणे, पुणे, पिंपरी-चिंचवड येथे राबविली पाहिजे. शेवटी या क्लस्टर स्कीममध्ये काही फायदे आणि त्रुटी देखील आहेत. नियोजन प्राधिकरण आणि अतिक्रमण,निष्कासन यांच्यामध्ये ताळमेळ नसल्यामुळे अतिक्रमण निष्कासित करण्यामध्ये विलंब होत असल्यामुळे विकासक पुढे येत नसल्याचे प्रामुख्याने क्लस्टर डेव्हलपमेंट योजनेमध्ये जाणवते. म्हाडाच्या मिळकतीमधील 30 टक्के सदनिकाधारक विकासकास सहमती देण्यास तयार नसतील तर त्यासंबंधातील जबाबदारी म्हाडा झटकत असल्याचे दिसून येत आहे.

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे ...

प्रस्तावित युआरसीएस मध्ये एलआयजी, इएलएस मधून एमआयजी घटकांना माफक दरात घरे उपलब्ध करुन देण्यात येत नसल्याची बाब ठळकपणे दिसून आलेली आहे. या योजनेत सुधारणा केल्यास लाभार्थ्यांना लाभ मिळून ही योजना यशस्वी ठरु शकते. या योजनेची अंमलबजावणी अधिक सुसह्य असण्याची आवश्यकता आहे. ही योजना राबविण्याचे अधिकार संबंधित रहिवाशांच्या गृहनिर्माण संस्था, जमीन मालक वा दोघांनाही संयुक्तरित्या 70 टक्के संमतीच्या अटीवर देण्याबाबत योजनेत तरतूद करण्याची आवश्यकता आहे. ही योजना राबविण्यासाठी 3 महिन्याच्या आत संबधित गृहनिर्माण संस्था तसेच कोणीही पुढाकार न घेतल्यास सदरहू योजना महापालिकेतर्फे राबवली जाईल असे ठरले पाहिजे. नाही तर ही योजना वर्षानुवर्षे पेंडिंग राहील. या योजनेअंतर्गत जमिनीची मालकी, भाडे ताबा, ताबा हक्क इत्यादी कायदेशीर अडचणी दूर करण्याकरिता झोपडपट्टी पुनर्वसन कायद्याच्या धर्तीवर संबंधित कायद्यामध्ये आवश्यक ते बदल करण्याची गरज आहे. या योजनेअंतर्गत इडब्ल्यूएस घटकातील लाभार्थ्यांना मोफत तर एमआयजी घटकातील लाभार्थ्यांना माफक दरात घरे उपलब्ध केली तर ही योजना फिजिबल होऊ शकेल. ही योजना राबवितांना एसआरए तसेच एमएमआरडीए प्रमाणे लाभार्थी पुनर्वसन प्रोत्साहन घटक याचे प्रमाण 1:1 असे असले तर ते अधिक प्रॅक्टीकल होऊ शकते. संस्थेच्या देखभाल दुरुस्ती करता आवश्यक असलेला कॉरपस फंड विकासकाकडून प्रिमिअमच्या माध्यमातून जमा करुन घेतला पाहिजे. त्या त्या ठिकाणच्या नैसर्गिक,भौगोलिक परिस्थितीचा विचार करुन त्यातील काही अटी शिथील करण्याची सोय सुध्दा असली पाहिजे.

मागच्या दोन अधिवेशनात म्हाडाचा 33(5) चा विषय गाजला होता. हा विषय खूप गाजला असल्यामुळे मी त्याच्या खोलात आता जाऊ इच्छित नाही. 37 एए(सी) चा मुद्दा बरेच दिवस पेन्डींग होता. या विषयाच्या संदर्भात शिवसेनेने एक मोठा मोर्चा काढला होता. मुंबई, ठाण्यातील म्हाडाच्या जमिनीवरील इमारतीमधील रहिवाशांचा हा प्रश्न आहे. या विषयाच्या संदर्भात आपण निर्णय केला असून प्रिमियमच्या बदल्यात ते देता येईल. या मुद्याच्या आधारे लोकांनी आपापले विकासक आणले व विकासकांनी त्यांना स्कीम दिल्या व एफएसआय किती मिळेल ते सांगितले. त्या प्रमाणे अर्जही करण्यात आले परंतु नंतर तुम्ही हा विषय थांबून ठेवला व नवीन 37 एए(सी) नियम आणला. यामध्ये गेल्या सहा महिन्यात एकही .

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

प्रपोजल आलेले नाही. आपण तयार केलेल्या नियमाप्रमाणे एकही प्रपोजल येत नसेल तर त्याचा अर्थ ते अव्यवहार्य आहे असा होतो. अगोदर 484 चौ.फुटाचे घर मिळणार होते परंतु नवीन नियमानुसार 300 चौ.फुटाचे घर मिळणार आहे. नवीन प्रपोजलमुळे अधिकचे तर सोडा, मागचे जेवढे होते त्यापेक्षा कमी जागा तरी मिळता कामा नव्हती. एका बाजूला म्हाडाला स्टॉक मिळाला पाहिजे याबाबत आम्ही देखील सहमत आहोत. परवाच्या लक्षवेधी सूचनेमध्ये खिरापती सारखे प्लॉट वाटले गेल्याचे दिसून आले आहे. हे प्लॉट कोणाला वाटले ते सुध्दा आपल्याला माहीत आहे. त्यामध्ये माजी मुख्यमंत्री, राजकीय नेत्यांची नावे आहेत. एका बाजूला खिरापत वाटायची व दुसऱ्या बाजूने गरीब माणसाचा आहे तो एफएसआय कमी करायचा हा कोणता न्याय आहे ? जर अशा पध्दतीने कोणी विकासक पुढे आले नाही तर या माध्यमातून बहुदा सरकारचा असा डाव असावा की, आता लहान लहान विकासक पुढे येत नाही म्हणून हे काम एखाद्या मोठया बिल्डरच्या ताब्यात, डीएलएफ सारख्या संस्थांसाठी केला जातो आहे अशी चर्चा म्हाडातील उच्च पदस्थ अधिकारी करीत आहेत. छोटया छोटया विकासकांकडून हे काम होत नाही व आता इमारत मोडकळीस येणार म्हणून टेंडर काढून ते मॅनेज करुन डीएलएफसारख्या मोठया संस्थेला विकासाचे काम एकहाती देऊ अशा पध्दतीने तुम्ही जर सामान्य जनतेच्या स्वप्नाविषयी खेळणार असाल तर ते योग्य होणार नाही.

सभापती महोदय, ही अधिसूचना 29 ऑगस्ट, 2013 रोजीच्या राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली होती.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे..

त्यानंतर राज्य शासनाच्या नगररचना विभागाने माहे ऑगस्टनंतर अहवाल सादर करणे अभिप्रेत होते. परंतु, संचालक, नगररचना यांनी सदरचा अहवाल दिनांक 7 ऑगस्ट, 2013 रोजी सादर केला. म्हणजे अगोदर अहवाल त्यानंतर अधिसूचना असा उलटा कारभार सुरु आहे. तारखेच्या गौडबंगालमुळे कोणाला फायदा झाला, या गोष्टीचा कोणी लाभ उठविला, यामध्ये कोण लाभार्थी होते याची आपण चौकशी केली पाहिजे. खालच्या स्तरावर तारखांच्या गडबडी होतात आणि बॅक डेटेट तारखांनी कसे काम चालते याची आपणास माहिती मिळेल. यामध्ये महत्वाचा मुद्दा असा की, शासनाच्या दिनांक 8 ऑक्टोबरच्या अधिसूचनेमध्ये तक्ता "क" मध्ये एफ.एस.आय.च्या बाबतीत माहिती दिलेली आहे. त्यामध्ये जो एलआर रेशिओ आहे तो जर 2 पर्यंत असेल तर सोसायटीला 45 टक्के आणि म्हाडाला 55 टक्के, 2 ते 4 टक्के असेल तर सोसायटीला 40 टक्के आणि म्हाडाला 60 टक्के, 4 ते 6 टक्के असेल तर सोसायटीला 35 टक्के आणि म्हाडाला 65 टक्के आणि 6 टक्क्याच्या वर असेल तर 30 टक्के सोसायटी आणि 70 टक्के म्हाडाला मिळतात. पूर्वीच्या पध्दतीने हे काम होतच नाही. परंतु आपण या पध्दतीने विकास केला तर एलआयजी डेव्हलप होऊच शकत नाही. आपण काही चांगले काम करीत आहोत, गरिबांना घरे देत आहोत असा आव आणताना प्रत्येक गरीब माणसांच्या घरावर आपण नांगर फिरवत आहात. दुर्दैवाने आज मुंबईत राहणारा माणूस दु:खी आणि कष्टी आहे. या सरकारकडून आपल्याला आपला निवारा मिळणार नाही अशी त्याची खात्री झालेली आहे.

सभापती महोदय, मुलुंड आणि ठाणे परिसरातील खाजगी वन क्षेत्रातील घरांचा प्रश्न आहे. हा प्रश्न मी येथे वारंवार मांडून थकलो आहे. वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी वन जमीन असल्याची नोंद त्यावेळी केली नाही. त्यानंतर 2006 मध्ये अचानक रट्टा पडल्यानंतर एका रात्रीत नोंदी करण्यात आल्या. हा विषय इतके दिवस प्रलंबित आहे. या विषयाला धरुन सर्व पक्षीय नेते काम करीत आहेत. सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण तसेच सन्माननीय सदस्य श्री.चरणसिंग सप्रा यांनी देखील या ठिकाणी हा मुद्दा उपस्थित केला होता. आम्ही हा विषय येथे वारंवार उपस्थित करीत आहोत. या प्रश्नाच्या संदर्भात सत्ताधारी बाकावरील सदस्यांना धरणे आणि मोर्चे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे..

काढावे का लागत आहे हे मला समजत नाही. त्या ठिकाणी राहणाऱ्या लोकांची काहीही चूक नाही. त्यावेळी वन विभागाने त्यांच्या प्रॉपर्टी कार्डावर वन जमिनीची नोंद केली नाही हा दोष त्या लोकांचा नाही.सर्वोच्च न्यायालयात दावा दाखल केल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने सेंट्रल एम्पॉवर कमिटीसमोर सुनावणी घेण्याबाबत आदेश दिले होते. त्या समितीने नेट पर्चेस व्हॅल्यू भरुन 6 ते 120 रुपये प्रती चौ.फू. इतकी रक्कम भरणा करण्याचे त्यांनी रहिवाशांना कळविले होते. रहिवाशांनी सदर रकमेचा भरणा केला. परंतु पुन्हा सदरील मतांची भिन्नता झाल्यामुळे न्यायालयाने नेट व्हॅल्यू रकमेच्या 50 टक्के जास्त रक्कम भरण्याचे कळविले होते. माझा प्रश्न आहे की, आपण अशाप्रकारचा निर्णय घेऊन किती लोकांना त्रास देणार आहात का ? शासनाकडे निर्णय घेण्याची क्षमता नसल्यामुळे लोकांवर किती अन्याय करीत आहात. सध्या या संदर्भातील प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे. आपण या संदर्भात ठोस निर्णय घेणार आहात की नाही ? या प्रकरणात रहिवाशांचा काही दोष नाही असे आपणास सरळ दिसत आहे. वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी नोंदी घेतल्या नव्हत्या म्हणून त्या ठिकाणी बांधकाम झाले आणि बांधकाम झाले म्हणून लोकांनी घरे घेतली. त्यानंतर शासनाला 20-25 वर्षानंतर जाग आली. मग यामध्ये दोष कोणाचा आहे ? मी मागे देखील सांगितले होते की, जमिनीचे वाद कोणत्याही प्रगतशील राज्याला बाधक आहेत. बहुतांश देशात तसेच काही राज्यात नॅशनल लॅन्ड रेकॉर्ड मॉर्डनायझेशन प्रोग्राम नुसार जमिनीचे सर्वेक्षण करुन जमिनीचा मालकी हक्क देण्याची कार्यपध्दती आहे. आपल्याकडे या पध्दतीचा अवलंब केला जाणार आहे काय ? शासनाने गॅरेन्टी ऑफ लॅन्डचा प्रकल्प त्वरित राबविल्यास जमिनीचे वाद त्वरित संपुष्टात येतील आणि जनतेची जमिनीच्या बाबतीत अशी फसवणूक होणार नाही.

सभापती महोदय, यातील दुर्दैव असे की, असे प्रपोझल नगरविकास विभागाने वित्त विभागाकडे पाठविले. परंतु माननीय उप मुख्यमंत्री महोदयांनी सदरचा खर्च शासनास परवडणार नाही अशी टिप्पणी करुन तो प्रस्ताव परत पाठविला. वित्त विभाग आणि महसूल विभागाच्या लालफितीमध्ये हा प्रस्ताव अडकला आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ D/ ST/ पूर्वी श्री.अजित.... 10:30

श्री.विनोद तावडे....

महसूल विभाग कोणाचा, अर्थ विभाग कोणाचा, यामध्ये आर्थिक फायदा कोणाचा ? महोदय, मी तर म्हणेन की, जमीन, प्लॉट कोणाच्या नावावर आहेत त्याबाबतचे अंतिम रेकॉर्ड झाले तर पुण्याच्या आसपासच्या जमिनी कोणाला घेता येतील, कोणाला घेता येणार नाहीत हे आपल्या लक्षात येईल. परंतु यामध्ये सर्वसामान्य माणूस भरडला जात आहे.

महोदय, या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, शासकीय भूखंडांवरील अतिक्रमणास जबाबदार असणाऱ्या अधिकारी आणि राजकीय नेत्यांवर शासन काय कारवाई करणार आहे ? शासकीय जमिनींवरील अतिक्रमणाबाबतचा विषय आम्ही सातत्याने मांडत आहोत. मी आग्रहाने असे म्हटले होते की, शासकीय जमिनीवर 2001 मध्ये किती अतिक्रमण होते आणि आता 2011 पर्यंत त्यात किती वाढ झाली आहे आहे, या बाबतचा सर्व्हे करावा. अशा प्रकारचा सर्व्हे केल्यानंतर आपल्या निदर्शनास येईल की, कोणकोणत्या ठिकाणी अतिक्रमणे वाढली आहेत. सरकारला या बाबत कळवून सुध्दा सरकार काहीच हालचाल करीत नाही हे त्यातील दुर्दैव आहे.

महोदय, महानगरपालिका असतील, तेथील अधिकारी असतील त्यांची विकासकाबरोबर कशी साठगाठ आहे हे लक्षात येईल. माहीम आणि डॉकयार्ड येथील इमारती पडल्या. विक्रोळी पार्कसाईट येथील इमारतीला आग लागली. अशा घटना पुन्हा घडणार नाहीत या दृष्टिकोनातून ठोस उपाययोजना करणे गरजेचे आहे. त्यासाठी म्हाडा, एमएमआरडीए आणि महापालिका अशा नियोजन प्राधिकरणांकडे लँड स्टॉकची बँक असणे गरजेचे आहे. अशा प्रकारचा स्टॉक असेल तरच अशा घटनांतील लोकांना तेथे शिफ्ट करणे शक्य होईल. म्हणून या संदर्भात सुध्दा विचार करण्याची गरज आहे.

महोदय, एयरपोर्ट विषयामध्ये फार मोठा घोटाळा आहे. एयरपोर्टच्या जमिनीवरील लोकांचे पुनर्वसन करण्यासाठी एचडीआयएल कंपनीला टीडीआर दिला. त्यांनी सर्व झोपड्या उठविल्या नाहीत, तसेच त्या झोपडपट्टीवासीयांचे पुनर्वसन केले नाही. परंतु सरकार त्यापूर्वीच त्यांना सर्व टीडीआर देऊन मोकळे झाले. एमआयएल आणि एचडीआयएल या कंपन्यांमध्ये भांडण झाले. एमआयएल ही एयरपोर्ट ऑथॉरिटीची कंपनी आहे. एमआयएल कंपनीने कराराचा भंग केल्याबद्दल एचडीआयएल कंपनीला काढून टाकले. त्या जमिनीवरील झोपड्यांचे पुनर्वसन झालेले नसताना एचडीआयएल कंपनी राज्य सरकारचा संपूर्ण टीडीआर घेऊन बसली आहे. या विषयी सरकार

SJB/ D/ ST/ पूर्वी श्री.अजित.... 10:30

श्री.विनोद तावडे....

काही निर्णय करणार आहे की नाही ? या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, ज्या अधिकाऱ्यांनी एचडीआयएल कंपनीला लोकांचे पुनर्वसन करण्यापूर्वीच संपूर्ण टीडीआर दिला त्यांच्यावर काय कारवाई करणार आहात ?

महोदय, तिवरांच्या झाडांचा विषय या सभागृहात नेहमी चर्चेसाठी येतो. नागपूर येथील एमआरएसएसी ही संस्था तिवरांच्या झाडांचे सॅटेलाईटद्वारे सर्वेक्षण करुन त्या बाबतचा नकाशा सरकारला देऊ शकते. माझी या निमित्ताने मागणी आहे की, अशा प्रकारचे सर्वेक्षण करुन दरवर्षी तिवरांचे ऑडिट केले पाहिजे. यावरुन तिवरांची झाडे असलेल्या जमिनी किती लोकांनी हडपल्या आहेत हे आपल्या निदर्शनास येईल. या सर्व बाबी निदर्शनास येण्यासाठी या संदर्भातील चौकशी झ ाली पाहिजे.

महोदय, दैनिक सामना या वर्तमानपत्रामध्ये दहिसर येथे तिवरांच्या जमिनीवर कसे अतिक्रमण सुरु आहे या बाबतची बातमी प्रसिध्द झाली होती. गणपत पाटील नगर येथील शिवसेना पक्षाच्या नगरसेविका श्रीमती शितल म्हात्रे यांनी तिवरांच्या क्षेत्रावर विकासकाने केलेल्या अतिक्रमणाबाबत आक्षेप घेतला. हा भाग महापालिकेच्या आर (उत्तर) विभागातील आहे. मे.नहालचंद लालचंद प्रा.लि. यांनी अनधिकृतपणे मातीचा भराव तिवरांच्या ठिकाणी टाकला. या बाबतची बातमी दैनिक सामना या वर्तमानपत्रात छापून आली होती. ज्या नगरसेविकेने या अतिक्रमणाबाबत आक्षेप घेतला होता त्यांना त्या कंपनीकडून धमकी मिळते. तिवरांच्या क्षेत्रावर होत असलेल्या अतिक्रमणाबाबत आक्षेप घेतला आणि त्याला अतिक्रमणापासून अडविले तर अशा वेळी सरकार म्हणून आपण काय करणार आहात ? या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, तिवरांच्या जमिनीवर अनधिकृत भराव टाकणाऱ्या मे.नहालचंद लालचंद प्रा.लि. यांच्यावर वन हक्क कायद्यातील विहित तरतुदींतर्गत कारवाई करणार काय ?

सभापती महोदय, गोराई-मनोरी भागात तिवरांचे थिम पार्क करण्याचे ठरविले होते. परंतु अद्यापपर्यंत ते झालेले नाही. सरकार ठराविक लोकांना कशा पध्दतीने मदत करते हे मी सांगत आहे.

नंतर श्री.कांबळे....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

श्री. विनोद तावडे ....

मी हिरानंदाणींचा एक विषय मांडला होता की, घाटकोपरमध्ये त्यांना 100 एकर जमीन दिली असताना, त्यांनी तसा करार केला असताना, 100 एकर जमिनीपैकी प्रत्यक्ष ताब्यात 44 एकर जमीन असल्याचे समजले. उरलेली जमीन कुठे आहे ? 56 एकर जमिनीचा दर 2800 कोटी रूपये धरला तर सरकारचे नुकसान झाले आहे. सदर प्रकरणी कोणाचीही चौकशी झाली नाही किंवा कोणाला शिक्षा झाली नाही. आपण नुसते माफ करीत जायचे, हे सातत्याने होत आहे. मी ही बाब सभागृहात मांडली, चर्चा झाली, कारवाई करतो, असे सांगितले. परंतु, अद्याप काहीही झालेले नाही. हिरानंदाणीचे रोडाज् संकुल मॅन्ग्रोव्हजची कत्तल करून उभे राहले आहे. ठाणे-पातलीपाडा येथे विशेष नगर वसाहत योजना राबविण्यास शासनाने अधिसूचना काढून ठाणे मनपाने आराखडा मंजूर केला. सदर आराखडा मंजूर करताना महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन सेंटर, नागपूर यांच्या कांदळवनच्या नकाशाचा आधार न घेता ठाणे मनपाने सागरी किनारा व्यवस्थापन आराखड्यांतर्गत परवानगी दिली. या जागेवरील सीमांकन विकासकाने अधिकाऱ्यांशी संगनमत करून आराखड्यात कमी क्षेत्रफळ दाखवून प्रत्यक्ष जागेवर जास्त क्षेत्राचे बांधकाम करून शासनाचा महसूल बुडविला आहे. आपण याची चौकशी करणार का ?

महोदय, शासनाचा मुद्रांक बुडविणाऱ्या विकासकाचे एक उदाहरण आहे. मुद्रांक ठरवून कसा बुडविला जातो हे यावरून दिसते. मुंबई उपनगर जिल्ह्यातील एक्सर येथील सर्व्हे नंबर 76 हिस्सा नंबर 11 या मिळकतीच्या बाबत श्री. रामचंद्र पाटील यांची बोगस स्वाक्षरी करून मिळकत हस्तांतरित केल्याबाबत मे. अतुल बिल्डर्स ॲण्ड असोसिएट्स यांच्याविरूध्द आर्थिक गुन्हे शाखेकडे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विकासकाने मयत व्यक्ती ऐवजी दुसऱ्याच व्यक्तीला हजर करून उप विभागीय अधिकारी यांच्याकडून परवानगी प्राप्त करून घेतली आणि या मिळकतीच्या 7/12 उताऱ्यावर काम करून घेतले. दिनांक 9 जानेवारी, 2013 रोजी त्याला अटकही झाली होती. एफआयआर दाखल झाल्यानंतर 90 दिवसांच्या आत आरोपीविरूध्द दोषारोप पत्र तयार करणे आवश्यक असताना 10 महिन्यांचा कालावधी उलटूनही अद्यापपर्यंत उपरोक्त विकासक व नायब तहसीलदार यांच्याविरूध्द दोषारोप पत्र तयारच केले नाही. दोषारोप पत्र तयार करण्यास

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

विलंब करणाऱ्या संबंधित पोलीस अधिकाऱ्यावर अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही.

विकासकाने शासनास कोट्यवधी रूपयास फसविल्याचे उदाहरण आहे. मुंबई उपनगर जिल्ह्यातील पहाडी, गोरेगाव येथील सीटीएस क्रमांक 139/11 ते 14, 16, 18 ते 20 मधील अभिनिर्णय क्रमांक 1276/2012 येथे मुद्रांक अधिनियम, 1958 ची अनुसूची 1 अनुच्छेद 25 ब नुसार सदर मिळकतीचे मुद्रांक शुल्क रूपये 14 कोटी रूपये असताना मुद्रांक जिल्हाधिकाऱ्यांनी केवळ 1 कोटी 70 लाख रूपये मुद्रांक शुल्क आकारल्याने शासनाचा सुमारे 12 कोटी रूपयांपेक्षा अधिक महसूल बुडविल्याची बाब जुलै, 2013 च्या अधिवेशनात मी मांडली होती. त्या अनुषंगाने नोंदणी महानिरीक्षकाकडून चौकशी सुरू असताना दंड वसूल करण्याची विहित कार्यवाही करण्यात येत असल्याचे समजते. पण जाणूनबुजून शासनाचा महसूल बुडविणाऱ्या अधिकाऱ्यांच्या विरूध्द सक्त कारवाई करणे क्रमप्राप्त आहे. सदर प्रकरणी जबाबदार असणारे मुद्रांक जिल्हाधिकारी, श्री. नवले तसेच नगररचनाकार श्री. पटेल व दुय्यम निबंधक श्री. पगारे यांनी संगनमताने शासनाची फसवणूक केली असल्याने सदर कसुरदार अधिकाऱ्यांविरूध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याची गरज आहे. शासनाने तसे करावे, अशी मी मागणी करतो. शासन यामध्ये का टाळाटाळ करीत आहे ? आता सिडकोमध्ये राधा मॅडम साडेबारा टक्क्यांमध्ये काय लूट झाली आहे, ते पाहत आहेत. त्याप्रमाणे आपण यामध्ये कार्यवाही करावी. आपला महसूल बुडविण्याचे काम सुरू आहे. आपण या विषयी चौकशी करणार का ?

सभापती महोदय, पिंपरी-चिंचवड येथील 66 हजार बांधकामांचा प्रश्न आहे. परवा पिंपरी-चिंचवडच्या भाजप कार्यकर्त्यांचा मोर्चा आला होता. माननीय मुख्यमंत्र्यांना शिष्टमंडळ भेटले. चार आमदारांनी राजीनाम्याचे नाटक केले. 66 हजार अनधिकृत बांधकामे असली तरी तेथे लाखांच्या वर कुटुंबे राहतात. अनधिकृत बांधकामांत राहणारा माणूस अनधिकृत नाही. तो गरजेपोटी ठाण्यामध्ये असेल चिंचवडमध्ये असेल जाऊन राहिला. अनधिकृत बांधकामाचे असेच प्रकरण दिल्लीमध्ये झाले होते.

( नंतर श्री. खंदारे ....

NTK/ D/ ST/ पूर्वी श्री.कांबळे 10:40

श्री.विनोद तावडे....

सन 2011 मध्ये दिल्लीमध्ये मास्टर प्लॅनप्रमाणे अनधिकृत बांधकामे नियमित करण्याबाबतचे एक विधेयक सादर झाले होते. 2014 मध्ये ही अनधिकृत बांधकामे अधिकृत केल्यानंतर सील करण्याची त्यात तरतूद होती. तशा प्रकारे या राज्यात अनधिकृत बांधकामे अधिकृत करण्यासाठी एखादे विधेयक आणावे. अधिकृत करीत असताना ती मास्टर प्लॅननुसार करावी. 2020 साली ती सील करावी. पुढील काळामध्ये कोणतेही अनधिकृत बांधकाम होणार नाही आणि कोठे अनधिकृत बांधकाम झाले तर संबंधित अधिकाऱ्यांवर सक्त कारवाई केली जाईल अशी तरतूद असलेले कडक विधेयक आणावे. त्यामुळे मास्टर प्लॅननुसार घरांमध्ये राहणाऱ्या लोकांना न्याय देऊ शकू. बदललेल्या तंत्रज्ञानाच्या आधारावर अनधिकृतपणे होणारी बांधकामे आपण सहज थांबवू शकतो. तसेच मास्टर प्लॅननुसार त्या त्या ठिकाणी घरांची उभारणी करु शकतो. हे सरकार अशा प्रकारचा मास्टर प्लॅनप्रमाणे अनधिकृत बांधकामे अधिकृत करण्यासंबंधी कायदा ठराविक कालावधीत आणणार आहे का ?

सभापती महोदय, या चर्चेला सुरुवात करीत असताना माननीय मुख्यमंत्री सभागृहात येतील असे मला वाटले होते. बहुधा आदर्शच्या अहवालाबाबत मंत्रिमंडळाची बैठक चालू आहे असे समजते. तो अहवाल आज सभागृहात सादर केला जाईल अशी आमची अपेक्षा आहे. ज्या आदर्श घोटाळ्यामुळे नवीन मुख्यमंत्री आले, ज्या आदर्श घोटाळ्यामुळे राजकीय व्यवस्थेवरील जनतेचा विश्वास वाढलेला आहे. ज्यामध्ये माजी मुख्यमंत्री, सेनेचे अधिकारी, सनदी अधिकारी सामील आहेत, एक फाईल क्लिअर केली की एक फ्लॅट मिळतो, एक फाईल क्लिअर केली की एक मजला वाढतो, असे जे प्रकरण घडले त्याची या सभागृहात आज चर्चा होईल. गरज पडली तर हे अधिवेशन एक दिवसाने वाढवावे. उद्याच्या दिवशी आदर्श घोटाळ्याची चर्चा करु. त्यासाठी आमची थांबण्याची तयारी आहे. सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे यांना मी सांगतो की, राष्ट्रवादी पक्षाला या विषयात रस आहे हे मला माहीत आहे. त्यामुळे या माझ्या सूचनेला ते पाठिंबा देतील असा विश्वास व्यक्त करुन मी या ठिकाणी थांबतो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/

**उप सभापती** : या प्रस्तावावरील चर्चा 11.45 वाजेपर्यंत आपल्याला पूर्ण करावयाची आहे. त्यामुळे मी सन्माननीय सदस्यांना विनंती करीत आहे की, त्यांनी हा प्रस्ताव वेळेत पूर्ण करण्यासाठी मला सहकार्य करावे.

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, या महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात नागरीकरण होत आहे. त्या अनुषंगाने लोकांना चांगल्या सोयी मिळाल्या पाहिजेत. परंतु वाढत्या नागरीकरणामुळे या सोयी पुरविणाऱ्या यंत्रणा कुचकामी ठरत आहेत. त्यामुळे लोकांना त्रास होत आहे. त्याचा परामर्श घेण्यासाठी हा प्रस्ताव मांडलेला आहे. मुंबईची भौगोलिक परिस्थिती पाहिली तर 472 कि.मी.इतके मुंबईचे क्षेत्रफळ आहे. या मुंबईची लोकसंख्या जवळपास 1 कोटी 75 लाखापर्यंत पोहोचलेली आहे. ब्रिटिशांच्या काळात या मुंबईची लोकसंख्या 20 लाख होती आणि भविष्यात ही लोकसंख्या 80 लाखापर्यंत जाईल या दृष्टीकोनातून त्यांनी इन्फ्रास्ट्रक्चर तयार केले होते. परंतु आजही त्याच इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये थोडाफार बदल करुन मुंबईचा कारभार सुरु आहे. मुंबईतील उपलब्ध जागेचा विचार करता लोकांना आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध होत नाहीत. लोकांना लहान घरांमध्ये रहावे लागते. त्यामुळे मुंबईमध्ये 40-50 वर्षापूर्वीच्या इमारती आहेत त्यांचे स्ट्रक्चरल ऑडिट करुन त्यांचा पुनर्विकास करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यासाठी नियम तयार करुन वेगवेगळ्या योजना तयार करण्यात आल्या. परंतु सांगण्यास अतिशय खेद होतो की, सरकारने आखलेल्या योजना एकमेकांना छेद देणा-या ठरल्या आहेत. त्यामुळे मुंबईच्या विकासाला खीळ बसलेली आहे. मुंबईत हेरिटेज नावाचे भूत उभे राहिले आहे. हेरिटेजच्या नावाखाली पूर्णपणे विकास थांबविण्याचे काम चालू आहे. हेरिटेज इमारतींची यादी वेबसाईटवर प्रसिध्द झाली त्यावेळी आमचे पक्षप्रमुख श्री.उद्धवजी ठाकरे यांनी मला बोलवून विचारले की हे काय आहे ? याबाबत मी मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांना विचारल्यावर त्यांनाही त्याची कल्पना नसल्याचे समोर आले. म्हणजे त्यांनाही या यादीची माहिती नाही. माननीय मुख्यमंत्र्यांकडे शिवसेनेचे नेते व शिष्टमंडळ गेले होते.

नंतर श्री.शिगम.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब....

आम्ही माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिले की, हेरिटेजच्या ग्रेड-1, ग्रेड-2, ग्रेड-3 अशा ग्रेड केलेल्या आहेत. हा सर्व्हे कुणी केला ? हा सर्व्हे कॉलेजच्या मुलांनी केला आणि लिस्ट तयार केली. आता जी नवीन कमिटी गठीत झालेली आहे ती कमिटी लिस्ट प्रमाणे इमारतींची पाहणी करायला गेली त्यावेळी त्यांच्या निदर्शनास आले की, एक गोलाकार आकाराची इमारत होती म्हणून ती हेरिटेज केली होती. त्या अर्ध्या इमारतीचे पुढे लोखंडी कॉलम टाकून पुनर्बांधणी करण्यात आली होती. हेरिटेज कशासाठी केले जाते, ग्रेड वन, ग्रेड 2, ग्रेड 3 या कशासाठी केल्या जातात, त्याला राष्ट्रीय महत्व काय आहे, स्थानिक महत्व काय आहे ? यासंबंधीचा ज्या ग्रेडस् बनविलेल्या आहेत त्या ग्रेडस्चा कोणताही अभ्यास न करता हेरिटेजची घोषणा झाली आणि त्यामुळे स्थानिक विकास थांबलेला आहे. मला वाटते काल 250 लोकांच्या हेरिटेज संबंधातील सुनावण्या संपल्या. या सुनावणीसाठी आलेले सर्व लोक हे मध्यमवर्गीय मराठी लोक होते. ते तिकडे आक्रोश करीत होते की, तुम्ही आमच्या इमारती दुरुस्त करीत नाही, सेसच्या इमारती दुरुस्त करण्यासाठी मुंबई इमारत दुरुस्ती मंडळाकडे निधी नसल्यामुळे आमच्या इमारती दुरुस्त होत नाहीत, आमचा मूळ मालक आम्हाला इमारती दुरुस्त करु देत नाही, शासनाने इमारत हेरिटेज केल्यामुळे तिची आम्ही दुरुस्ती करु शकत नाही. ज्या इमारती ग्रेड 1मध्ये आहेत त्याच्या आजूबाजूच्या 100 मीटरच्या परिसरातील इमारतींचा देखील विकास करता येत नाही. त्यामुळे विकास पूर्णपणे खुंटलेला आहे.

सभापती महोदय, मी यासंदर्भात थोडीशी पार्श्वभूमी सांगतो. मुंबईमध्ये जेव्हा प्लेगच्या साथीचा प्रादुर्भाव झाला आणि गिरणी कामगार मुंबई सोडून बाहेर जायला लागले त्यावेळी इंग्लंडच्या राणीने 10 कोटी रुपये पाठविले. त्यावेळी गिरणी कामगारांसाठी बीडीडी आणि बीआयटी चाळी बांधण्यात आल्या. या चाळी खुराड्या सारख्या बांधण्यात आल्या. पंडित जवाहरलाल नेहरुनी जेव्हा या चाळी पाहिल्या त्यावेळी त्यांनी सांगितले की ही खुराडी बांधलेली आहेत. परंतु त्याही परिस्थितीमध्ये कामगारांना त्या इमारती राहाण्यासाठी दिल्या गेल्या. वास्तुशास्त्राचा तो एक नमुना होता. प्लेगची लागण झोपडपट्टयामध्ये किंवा बैठ्या चाळीमध्ये जास्त होते म्हणून आजूबाजूच्या परिसरामध्ये, शिवाजीपार्कमध्ये, हिंदू कॉलनीमध्ये एकाच पध्दतीच्या इमारती बांधण्याचा निर्णय घेण्यात आला. म्हणून या इमारती एकाच पध्दतीच्या दिसतात म्हणून त्या हेरिटेजमध्ये आणल्या. या

..2..

ॲड. अनिल परब....

इमारतींना कोणतेही राष्ट्रीय महत्व नाही, कोणतेही स्थानिक महत्व नाही. तसेच या इमारती वास्तुशास्त्राचा अलौकिक नमुना देखील नाहीत. या इमारती ग्रेड 1 मध्ये टाकलेल्या आहेत. ओव्हल हे ऐतिहासिक मैदान आहे. म्हणजे ग्रेड 1मध्ये ज्या इमारतींचा किंवा ज्या भागाचा समावेश करायला पाहिजे होता तो केलेला नाही. हा हेरिटेजचा वरवंटा शिवाजी पार्क, हिंदू कॉलनी या मराठी माणसांच्या डोक्यावर फिरविलेला आहे. नागपाडा, भेंडीबाजार या "सी" वॉर्ड मधील एकही इमारत हेरिटेजमध्ये का गेली नाही ? मग आपण हा जो काही भेद करीत आहात आणि मराठी माणसाच्या डोक्यावर वरवंटा फिरविण्याचे काम करीत आहात ते जाणूनबुजून आणि तिकडच्या बिल्डरांची सुपारी घेऊन केले गेले आहे असा स्पष्ट आरोप करतो. याबाबतीत केवळ शिवसेनेने उठाव केला म्हणून हे काम मंद गतीने चालले आहे. परंतु या हेरिटेजच्या बाबतीत आमची सर्व ताकद पणाला लावून त्यांना न्याय देण्याचा आम्ही निश्चितच प्रयत्न करु.

सभापती महोदय, हेरिटजचे 67(10) हे कलम आणि डीसी रुलचे 33(7) हे कलम परस्परांशी विसंगत आहेत. एका बाजूला तुम्ही विकास करायला सांगता आणि दुसऱ्या बाजूला सांगता की हे हेरिटेजमध्ये असल्यामुळे विकास करता येणार नाही. तेव्हा ही हेरिटेजची संकल्पना आणून मुंबईचा विकास ठप्प करण्याचे काम आपण करीत आहात. म्हणून या हेरिटेजच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदयांनी शासनाची निश्चित भूमिका काय आहे ते सांगावे. शिवाजी पार्क, हिंदू कॉलनी या भागातील सर्व मराठी माणसे मुख्यमंत्र्यांच्या निर्णयाची वाट पहात आहेत. आज या इमारती कोसळत आहेत. या इमारती कोसळल्यानंतर महानगरपालिकेच्या लोकांना निलंबित करण्यात येते. परंतु या धोरणामुळे जो काही विकास खुंटलेला आहे त्याबाबतीत शिक्षा कोणाला करणार ? म्हणून या धोरणाच्या बाबतीत गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे. हेरिटेज असेल, म्हाडा असेल, क्लस्टर असेल किंवा एसआरए असेल याबाबतीत गांभीर्याने निर्णय घेतला पाहिजे.

सभापती महोदय, आताच सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे यांनी सांगितले की, शासनाने पुनर्विकास करण्यासंबंधी 33(5)नुसार परिपत्रक काढले आणि पुनर्विकास करण्यास सांगितले. प्रत्येक सोसायटीने त्यांची ॲग्रीमेण्ट करुन विकासक नेमले आणि काम सुरु करण्याची वेळ आली त्यावेळी म्हाडाच्या सनदी अधिकाऱ्यांनी मुख्यमंत्र्यांना सांगितले की, 1 लाख हौसिंग स्टॉक मिळू शकेल. 10 डिसेंबर 2010 पूर्वी 327 प्रपोझल्स होती. म्हाडाच्या ज्या 56 इमारती

..3..



ॲड. अनिल परब....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहेत त्यांना 50 वर्षे झालेली असून त्या कोसळायला लागल्या आहेत. म्हाडाच्या इमारतींचा दर्जा आधीच निष्कृष्ट आहे त्यामुळे त्या इमारतीमध्ये राहू शकत नाही. अलीकडेच चुनाभट्टी येथील म्हाडाच्या इमारतीचा एक स्लॅब कोसळला. ती घटना मी स्वत: पाहिलेली आहे. स्लॅब कोसळत असताना, इमारती कोसळत असताना सरकारने ही प्रपोझल्स थांबविली आणि सांगितले की, हौसिंग स्टॉक देणार असाल तर विकास करा अन्यथा तो करु नका.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ ST/ 10:50

ॲड अनिल परब...

327 मधील सगळी प्रपोजल्स परत आली आहेत, त्यातील फक्त 17 प्रपोजल्स म्हाडाकडे प्रलंबित आहेत. या 17 प्रपोजल्समध्ये 3 प्रपोजल्स स्वत:ची आहेत, उर्वरित प्रपोजल्स शासकीय कर्मचाऱ्यांना घरे दिली होती त्यांची आहेत. आज म्हाडाकडे एकही प्रपोजल नाही. तुमच्याकडे प्रपोजल्स आली नाहीत तर तुमच्याकडे हाऊसिंग स्टॉक निर्माण कसा होणार याचा विचार केला गेला पाहिजे. म्हाडाला हाऊसिंग स्टॉक निर्माण झाला पाहिजे अशी आमची देखील इच्छा आहे. ज्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी मुंबईतील सर्वपक्षीय आमदारांची बैठक बोलाविली होती, त्यावेळी आम्ही सर्व प्रस्ताव माननीय मुख्यमंत्र्यांना दिले होते. परंतु म्हाडाचे सनदी अधिकारी सांगतात की, 1 लाख हाऊसिंग स्टॉक निर्माण होईल. हे प्रपोजल थांबवून सहा महिन्यांचा कालावधी झालेला आहे. गेल्या सहा महिन्यात एकही प्रपोजल म्हाडाकडे आलेले नाही. मी म्हाडा वसाहतीमध्ये राहतो. आमचा जीव तळमळतो आहे की, म्हाडाच्या इमारतींच्या भिंती पडत चालल्या आहेत. इमारतींचे स्लॅब कोसळत चालले आहेत. इमारतीतील सदनिकांमध्ये मोठया प्रमाणात गळती होत आहे. असे असताना आपल्या आडमुठया धोरणामुळे रिडेव्हलपमेंटला परवानगी दिली जात नाही. या बाबतीत शिवसेना पक्षाने मोर्चा काढला होता. त्यावेळी आपणाकडून सांगण्यात आले की, शिवसेना पक्षाने बिल्डरची तळी उचलली आहे. तुमचे प्रपोजल इतके चांगले आहे तर तुमच्या प्रपोजलला लोकांनी प्रतिसाद का दिला नाही. तुम्ही घराचे मालक नाही. तुम्ही फक्त म्हाडाच्या जागेचे मालक आहात. तुम्ही आम्हाला जागा कन्व्हेयन्स करुन दिलेल्या आहेत. त्यामुळे घराचे मालक आम्ही आहोत. हे घर माझ्या मालकीचे झालेले आहे. त्यामुळे माझ्या संमती शिवाय तुम्हाला घर डेव्हलपमेंट करता येणार नाही. तुम्ही थाटात असाल की, आम्ही सांगू त्याप्रमाणेच म्हाडाचे धोरण असले पाहिजे तर ते सर्वस्वी चुकीचे आहे. तुम्ही जरी जमिनीचे मालक असलात तरी घराचे मालक आम्ही आहोत. दोघांच्या संमतीने पुनर्विकास होऊ शकतो, अन्यथा पुनर्विकास होऊ शकत नाही.

सभापती महोदय, आज 56 लेआऊट मंजूर व्हावयाचे होते, त्यासाठी आपण आर्किटेक्ट नेमलेले नाहीत. म्हाडाकडे 56 वसाहतीचे लेआऊट करण्यासाठी 56 आर्किटेक्ट नाहीत. त्यांच्याकडे फक्त तीन आर्किटेक्ट आहेत. त्यामुळे म्हाडाने खाजगी आर्किटेक्ट नेमले. या खाजगी आर्किटेक्टना स्वत:चा इंट्रेस्ट आहे. ते लोकांना सांगतात की, आम्ही तुमच्या जागा विकसित करण्यासाठी विकासक आणतो. माननीय मुख्यमंत्र्यांनी आश्वासन देऊन जवळ जवळ दीड वर्ष झाले

2...

ॲड अनिल परब...

आहे. आज एकाही वसाहतीचा लेआऊट तयार नाही. तुम्ही डेव्हलपमेंट कशी करणार आहात, लोकांच्या मरायची वाट पहात आहात काय, लोक मेल्यानंतर डेव्हलपमेंटसाठी परवानगी देणार आहात काय? म्हाडाची पुनर्विकासाची जी काही धोरणे आहेत, ती एकमेकाला छेद देणारी आहेत आणि त्यामुळे हा पुनर्विकास थांबलेला आहे.

सभापती महोदय, आज क्लस्टरच्या बाबतीत गदारोळ मोठ्या प्रमाणात सुरु आहे. अनधिकृत बांधकामे झाली आहेत, सदरचे बांधकाम होत असताना शासनाचे अधिकारी काय करीत होते. तुम्ही खरे तर स्लॅबवाईज ओ.सी. दिल्या पाहिजेत. आपण इमारतींचे बांधकाम होऊ देता आणि त्यानंतर दंडाची रक्कम आकारुन ते काम रेग्युलराईज करुन ओ.सी. देता. ही जी तुमची काही धोरणे आहेत, त्यामुळे अनधिकृत बांधकामे मुंबई, ठाणे, पिंपरी-चिंचवड या शहरात फोफावली आहेत. एकदा बिल्डींग बांधून झाल्यानंतर त्याला कोणती ओ.सी.मिळणार नाही असे सक्त आदेश काढले पाहिजेत. आज मुंबई शहरात 50 ते 60 अनधिकृत इमारती आहेत, त्या इमारतींना ओ.सी.मिळालेली नाहीत. या सगळया इमारती तुम्ही पाडणार काय ? कॅम्पाकोलाच्या इमारतीमुळे हा विषय ऐरणीवर आलेला आहे. हे लोक महानगरपालिकेस टॅक्स देत आहेत, इतर टॅक्सेस भरत आहेत, बिल्डरने ओ.सी.घेतली नाही, त्याच्या कारभारात काही गडबड आहे. त्याने कोठला तरी प्लॉट हॅन्डओव्हर केला नाही, त्याची कोठली तरी टेक्निकल अडचण आहे म्हणून त्याला ओ.सी.मिळणार नाही. परंतु पूर्ण पैसे भरुन जे लोक अशा इमारतींमध्ये रहावयास गेले आहेत ते लोक आज अनधिकृत इमारतीच्या छायेखाली जगत आहेत. मग अशा वेळी आपणाला एक धोरण निश्चित करावे लागेल. आपण क्लस्टरचे धोरण ठरविले आहे. परंतु क्लस्टरचे धोरण मुंबईत शक्य होणार नाही, त्याचे कारण असे आहे की, दोन इमारतीच्या आड एक इमारत विकसित झालेली आहे, चार इमारतींच्या आड एक इमारत विकसित झाली आहे. तुम्ही 4 चा एफएसआय देणार आहात परंतु हा एफएसआय वापरला जाणार नाही. त्याचे कारण असे आहे की, जी इमारत उभी आहे, ती पाडावयाची नाही अशी तरतूद नवीन क्लस्टरच्या धोरणात करण्यात आली आहे. जी नवीन बिल्डींग बांधली आहे, ती तोडण्यासाठी आपण परवानगी देणार नाही. मग डेव्हलपमेंट कशी होणार? मुंबई उपनगरात एअरपोर्ट असल्यामुळे उंच इमारती बांधता येत नाहीत. त्या परिसरात इमारतींच्या उंचीच्या बाबतीत मर्यादा घालून दिलेल्या आहेत. 4 चा एफएसआय जर कंझ्युम झाला

3...





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ॲड अनिल परब...

नाही तर कशा पध्दतीने तिकडे क्लस्टर डेव्हलपमेंट होणार आहे, क्लस्टर डेव्हलपमेंटच्या बाबतीत मुंबईतील सर्वपक्षीय आमदारांची पुन्हा एक बैठक घेऊन या बाबतीत शासनाचे धोरण काय आहे याची माहिती दिली गेली पाहिजे. या बाबतीत जी काही धोरणे ठरविलेली आहेत ती सर्व एकमेकांना छेद देणारी आहेत.

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब......

यामध्ये कोणत्याही प्रकारची सुसूत्रता दिसून येत नाही. एक विभाग एक धोरण जाहीर करतो, दुसरा विभाग ते धोरण कसे अडविले जाईल यासाठी प्रयत्नशील असतो. आज मुंबई शहरामध्ये एसआरएचे किती तरी प्रस्ताव अडकून पडले आहेत. 6 मीटरची रुंदी ठेवण्याची तरतूद केली आहे. सुप्रीम कोर्टाने नवीन जज्जमेंट काल पास केले आहे. त्यात म्हटले आहे की फायर ब्रिगेडचे वाहन येण्यासाठी किमान 6 मीटरचा तरी रस्ता पाहिजे. मुंबईमध्ये असे कुठे प्लॉट आहेत ज्या ठिकाणी तुम्ही 6 मीटरचा रस्ता देऊ शकता? ज्या प्लॉटची साईजच कमी आहे, जे छोटे प्लॉट आहेत, 7 मजल्यापर्यंतचे बंधन तुम्ही ठेवले, त्यापेक्षा जास्त बांधकाम करायचे झाले तर तुम्हाला 6 मीटरचा रस्ता द्यावा लागतो. आज प्लॉट साईज तुम्ही बघा आणि त्यानुसार निर्णय घ्या अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, केवळ केबिनमध्ये बसून जी काही पॉलिसी ठरते, त्यातून ती पॉलिसी सोडण्याकरिता कशाप्रकारे आपल्याला पैसे मिळतील अशा ज्या पध्दतीने पॉलिसी ड्रॉप केलेल्या आहेत, त्या सर्व पॉलिसीबाबत पुनर्विचार करण्याची गरज आहे. मंत्री महोदय तुम्ही खरोखर मुंबई आणि नागरीकरणाबाबत संवेदनशील असाल तर या सगळ्या ज्या हाऊसिंग डेव्हलपमेंट पॉलिसीज आहेत त्याबाबत पुनर्विचार केला पाहिजे. अन्यथा यापुढे मुंबई शहरात रोगाने माणसे मरणार नाहीत, दुस-या कोणत्या कारणास्तव मरणार नाहीत, केवळ इमारत पडूनच लोक मुंबईमध्ये मरणार आहेत असे खेदाने नमूद करावे लागत आहे. सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आभार मानून माझे भाषण पूर्ण करतो.

------------------

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या प्रस्तावावरील चर्चेसाठी अर्धा तास वेळ वाढवून द्यावा अशी माझी विनंती आहे. नगरविकास राज्यमंत्री हे नवीन दमाचे आहेत, अत्यंत संवेदनशील आहेत असा आमचा समज आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांनी मुंबई बेटावरील जून्या इमारतींच्या प्रश्नाविषयी भाष्य केले आहे. चार दिवसापूर्वी मी माननीय मुख्यमंत्र्यांना पत्र दिले होते ते राज्यमंत्र्यांकडे पोहोचले आहे. गृहनिर्माण सचिव याठिकाणी असावेत. एक चांगली घटना घडली आहे. मुंबई बेटावरील जून्या इमारतींची पुनर्बांधणी करण्याचे ठरविले आहे. पूर्वी 180 चौ.फूट जागेची तरतूद केली होती. नंतर ती मर्यादा वाढवून 225 चौ.फूट करण्यात आली. मुंबईतील जून्या चाळींमध्ये राहणारी माणसे ही मराठी कुटुंबीय आहेत, पिढ्यानपिढ्या ते निवास करीत आहेत. त्या चाळींचा पुनर्विकास करुन 300 चौ.फूट जागा देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याकरिता 3 एफएसआय देण्याचे ठरले होते, ही बाब स्वागतार्ह होती. मध्यंतरीच्या काळात 225 चौ.फुटाप्रमाणे एफएसआय देण्याचे ठरले. काही इमारतींच्या पुनर्बांधणीचे नकाशे मंजूर झाले. त्या इमारतीचे जोत्यापर्यंत काम पूर्ण झाल्यानंतर भाडेकरुना 300 चौ.फुटाचा निर्णय कळल्यामुळे त्यांचे म्हणणे आहे की, आम्ही 75 चौ.फूट कमी जागा का घ्यायची? 75 चौ.फूट जागा म्हणजे एक नवीन खोली आहे. 3 ते 3.5 वर्षे खात्यामध्ये फाईल पडून राहिली. गाला एंटरप्रायझेस नावाच्या कंपनीच्या विकासकाने सुप्रीम कोर्टात प्रकरण दाखल केले. अनेक जून्या इमारती पाडल्या गेल्या होत्या. भाडेकरु अन्य ठिकाणी भाड्याने रहात आहेत, 9 वर्षे उलटून गेली आहेत. अनेक वयस्कर माणसे आहेत, नवीन घराचे स्वप्न पहात आहेत. त्यातील अनेकजण स्वर्गवासी झाले आहेत. अनेक जण आपल्या कुटुंबाला नवीन घरात केव्हा घेऊन जाणार या चिंतेमध्ये आहेत.

सभापती महोदय, सुप्रीम कोर्टाने निर्णय दिला की, जोत्यापर्यंत काम झाले असले तरी त्या इमारतींना नवीन योजना लागू करावी. त्या अनुषंगाने स्ट्रक्चरल फरक जो करायचा आहे तो करता येईल. निर्णय घेतला जात नाही याबद्दल मी मुख्यमंत्र्यांना विनंती केली आहे. या संदर्भात उत्तर आले तर आनंद होईल. सरकारने याची मान्यता द्यावी. अन्यथा नस्ती वर्षानुवर्षे पडून राहील. अनेक वर्षे भाडेकरु ट्रान्झिट कॅम्पमध्ये रहात आहेत. सर्वोच्च न्यायालयाने जो निर्णय दिला आहे त्यानुसार एका महिन्याच्या आत जी जुनी 50-60 प्रकरणे प्रलंबित आहेत त्याबाबत मंजुरी द्यावी. जे कायदेशीर पहावयाचे असेल ते जरुर पहावे. युध्द पातळीवर निर्णय घ्यावा अशा प्रकारची विनंती करतो. धन्यवाद.

------

नंतर एम.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडला आहे त्यावर माझे काही मुद्दे मी मांडणार आहे.

सभापती महोदय, अनधिकृत बांधकामे केवळ मुंबई-पुण्यामध्ये नसून ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर मध्ये देखील आहेत. येथील अनधिकृत इमारती सातत्याने कोसळत आहेत. त्यात निष्पाप लोकांचा मृत्यू होत आहे. अनेक लोक बेघर होत आहेत.

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, शासनाने उल्हासनगरसाठी जे काही करावयाचे होते ते केलेले आहे. शासनाने त्यांना उदार हस्ते सवलत दिलेल्या आहेत. पण त्याचे पालन त्यांनी केलेले नाही. खरे म्हणजे येथील लोकांनी ऐकायला पाहिजे होते. या प्रश्नासाठी मी स्वत: किती योगदान दिले होते हे आपणाला देखील माहीत आहे. शासनाने योजना जाहीर केल्यानंतर एकाही माणसाने प्रतिसाद दिलेला नाही ही खेदाची बाब आहे. उल्हासनगरवासियांना सर्वच फुकटात पाहिजे आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, उल्हासनगरमधील अनधिकृत बांधकामाचा प्रश्न फार गंभीर आहे. मध्यंतरी आपल्याच पुढाकाराने शासनाने सर्व अनधिकृत बांधकामे अधिकृत करण्यासंबंधी अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेतला. त्यासंबंधातील आपण नियमावली देखील तयार केली. संबंधितांनी त्या समितीकडे अर्ज करण्याचे देखील ठरले. त्यातील काही अर्ज निकाली निघाले. जिल्हाधिकाऱ्यांकडे आलेले अर्ज अडीच वर्षापासून प्रलंबित असून त्यावर कोणतीही कार्यवाही झालेली नाही. यात आपण मोठ्या प्रमाणावर पेनल्टी लावली असल्यामुळे अनेक जण यामध्ये पुढे आलेले नाहीत हे त्या मागचे प्रमुख कारण आहे. इमारतीच्या जागेपेक्षा दुप्पट दंड आकारणी वसूल करण्यात येत आहे. सदर दंड हा अडचणीचा ठरत आहे. तेव्हा यासंबंधी शासनाने फेर विचार करावा अशी लोकप्रतिनिधींची आणि सर्वसामान्य लोकांची विनंती आहे. पूर्वीची अनधिकृत बांधकामे सोडली तर आज देखील नवीन अधिकृत बांधकामे मोठ्या प्रमाणावर होत आहेत. अनधिकृत बांधकामे नियमित करण्यासंबंधातील जी.आर, विधेयक आणले. त्यानंतर देखील मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे झालेली आहेत. यासंबंधी नगरविकास खात्याने दखल घेण्याची आवश्यकता आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते...

मोडकळीस आलेल्या जुन्या इमारतींना 4 एफएसआय देण्याचे मान्य केले आहे. यासंबंधी माननीय मुख्यमंत्री आणि माननीय नगरविकास राज्यमंत्री यांच्या समवेत बैठक देखील झालेली आहे. त्याचा अद्याप निर्णय झालेला नाही. तो होणे आवश्यक आहे.

मुंबई महानगरपालिकेमध्ये वन टाईम प्लानिंग झालेले आहे. तसे उल्हासनगर, कल्याण व अन्य महानगरपालिका क्षेत्रांमध्ये करणे आवश्यक आहे. तसेच स्ट्रक्चरल ऑडिट होण्याची आवश्यकता आहे. तेथे राहणाऱ्या लोकांना रस्ते, पाणी, वीज, भूमिगत गटारे इत्यादी बेसिक सुविधा पुरविल्या पाहिजेत.

उल्हासनगरमधील अनेक मोकळी मैदाने अनधिकृत बांधकामांनी व्यापली गेली आहेत. यासंबंधी आयुक्तांना भेटलो आहे. एवढेच नव्हे तर माहितीच्या अधिकारात माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता माहिती देखील देण्यात येत आहे. तेथील अनधिकृत बांधकामे देखील निष्कासित करण्यात येत नाहीत. म्हणूनच माझी नगरविकास राज्यमंत्र्यांना विनंती आहे की, जे राज्य शासनाचे मोकळे प्लॉट आहेत, मैदाने आहेत त्यावरील अनधिकृत बांधकामे तातडीने निष्कासित करण्या संबंधी निर्णय घ्यावा. धन्यवाद.

**उप सभापती** : आता येथे सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी एक बाजू मांडली आहे. मला उल्हासनगर संबंधातील एकदम चांगली माहिती आहे. उल्हासनगरला शासनाने सवलती दिलेल्या आहेत. असे असताना आपण आता बोलताना जिल्हाधिकाऱ्यांवर ठपका ठेवला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रकरणे पडून आहेत असे आपण सांगितले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयांकडून त्यांना कित्येक वेळा बोलाविण्यात आले. त्यांच्याकडे कोणीही गेलेले नाही. मी या आसनावरून सन्माननीय सदस्यांना खात्री देतो की, उल्हासनगरमधील जे कोणी संबंधित बाधित आहे त्यांनी तयारी दर्शविली तर आज पासून एक महिन्यामध्ये त्यांची प्रकरणे निकाली लावून देण्यात येतील. पण त्यांनी शासनाची रक्कम भरली पाहिजे.

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** .....

त्यांना शासनाची रक्कम भरायची नाही. त्यांना आपण जेव्हा सवलत दिली त्यावेळी असा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता की, आम्हाला आताच्या प्रमाणे नको तर आम्ही त्यावेळी जागा बांधली होती त्यावेळेप्रमाणे द्या. सगळेच फुकट द्यायचे हे कसे शक्य आहे ? उल्हासनगरमध्ये सर्वच गरीब आहेत असे नाही. उल्हासनगरची सर्व परिस्थिती मला चांगली माहीत आहे. सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांना मी सांगू इच्छितो की, जेव्हा आपण अशा मंडळींचे प्रतिनिधित्व करतो तेव्हा त्यांच्या देखील काही जबाबदाऱ्या असतात हे आपण विसरता कामा नये. ही मंडळी जर दरवेळेस तुम्हाला आणि मला हत्यार म्हणून वापर करुन आपल्याला नेहमी शासनाच्या विरुध्द बोलावयास लावत असतील तर ते तितकेसे बरोबर नाही. आज उल्हासनगरमध्ये जेवढे काही अतिक्रमण सुरु आहे ते कोणाच्या आशीर्वादाने सुरु आहेत ? प्रशासन काही करावयास गेले की, राजकीय धमक्या दिल्या जातात हे आपण पाहत आलो आहे. मला वाटते हे कोठे तरी थांबले पाहिजे. या मंडळींना त्यांच्या हक्काबरोबरच त्यांच्या जबाबदारीची जाणीव देखील झाली पाहिजे असे माझे स्पष्ट मत आहे.

-----

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, दि. 10 डिसेंबर रोजी पिंपरी चिंचवड येथील घरे नियमित करण्याच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांना आम्ही भेटलो होतो. अतिक्रमण हा शब्द आपण घरासाठी वापरतो. पिंपरी-चिंचवड येथील जी घरे आहे त्यातील 90 टक्के घरे ज्या शेतकऱ्यांच्या स्वत:च्या मालकीच्या जमिनी आहेत, सात-बाराचा उतारा ज्यांच्या नावाने आहे तेथेच या लोकांनी बांधकामे केलेली आहेत. या ठिकाणी प्राधिकरणाने काही लोकांच्या जमिनी घेतल्या परंतु त्यांना जमिनीचा परतावा दिला नाही. ज्या प्रकारे मुंबईतील सिडकोच्या संदर्भात वर्षानुवर्षे लोकांच्या तक्रारी आहेत तशीच परिस्थिती पिंपरी-चिंचवड येथेही आहे. त्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांनी आम्हाला असे आश्वासन दिले होते की, एमआरटीपी ॲक्ट, महाराष्ट्र लँड रेव्हेन्यू कोड आणि व्हीलेज पंचायत कायदा या तिघांची अमेंडमेंट करुन मार्च 2013 पर्यंतची जी बांधकामे लेआऊट प्रमाणे आहेत त्या पध्दतीने नियमित करण्यासाठी आम्ही कायदा बदलू. आज अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. हजारो लोक वेगवेगळ्या पध्दतीने आंदोलन करीत आहेत. अतिक्रमण हा शब्द पाचवीला पुजलेला शाप आहे असे मला वाटते. आमचे म्हणणे असे आहे की, घर बांधणीच्या संदर्भात मोठया मोहिमा घेतल्या असत्या तर या लोकांवर अशा पध्दतीने घरे बांधण्याची वेळ आली नसती. आज पिंपरी-चिंचवड मधील लोक जात्यात असले तरी पुण्याजवळची अनेक गावे ग्रामपंचायतीमधून शहरामध्ये येत आहेत. त्यामुळे ही घरे अनाधिकृत ठरवली जात आहेत. त्यामुळे आमची नगरविकास मंत्रालयाला विनंती आहे. एका बाजूला घरांच्या संदर्भात ग्रामपंचायतींना परवानगी देता येणार नाही यासंदर्भात आपण सन 2008 मध्ये निर्णय घेतला. ज्यांना बांधकामे करावयाची असतात त्यांना जिल्हाधिकाऱ्यांकडे जावे लागते. दुसरीकडे स्वत:च्या जागेवर बांधण्यात आलेल्या हजारो घरांना पिंपरी-चिंचवडमध्ये शास्ती कर लावला जात आहे. त्यामुळे माझी दुसरी मागणी अशी आहे की, मार्च 2013 पर्यंतची घरे नियमित करण्यासाठीचे आश्वासन आम्हाला माननीय मुख्यमंत्री महोदयांनी दिले आहे. एमआरटीपी कायदा, महाराष्ट्र लँड रेव्हेन्यू कोड आणि व्हीलेज पंचायत कायदा बदलण्याच्या संदर्भात काय प्रगती झालेली आहे त्याबद्दल आम्हाला सभागृहात माहिती दिली जाण्याची आवश्यकता आहे. या विषयाच्या संदर्भात तीन आमदारांनी राजीनामे दिले असे बोलले जाते परंतु आमदारांनी राजीनामे दिले किंवा नाही, दिले यापेक्षा लोकांचे प्रश्न सुटले पाहिजेत यादृष्टीने आपण पावले उचलली पाहिजेत. या लोकांना

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे.....

जो शास्ती कर लावण्यात आलेला आहे तो थांबवण्यात यावा अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, माझी तिसरी मागणी अशी आहे की, एमआरडीएची स्थापना करण्याच्या संदर्भात मंद गतीने काम सुरु आहे. पनवेल नगरपालिकेची पनवेल महानगरपालिका करण्यात यावी यासंदर्भात त्यांनी 2007 मध्ये ठराव केला आहे. इतक्या मोठया प्रमाणात नागरीकरण होत असतांना नगरपालिकेचे महानगरपालिका करण्याचे निर्णय घेतले नसल्यामुळे ठिकठिकाणी शेतकरी विरुध्द नगरपालिका असे संघर्ष झालेले दिसतात. त्यामुळे पनवेल महानगरपालिका करण्याच्या निमित्ताने आपण सकारात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. स्वाधीन क्षत्रिय समितीने केलेल्या शिफारसी नेटवर आहेत. परंतु त्या शिफारसी स्वीकारल्या की, नाकारल्या याची माहिती मिळण्याची आवश्यकता आहे. कस्तुरीरंगन व विजय केळकर समितीचाही विषय तसाच आहे. मानव विकास अहवालाचा विषय सुध्दा तसाच आहे. अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत अशा महत्वाच्या अहवालावर सभागृहात चर्चा होत नाही याचे दु:ख आहे. स्वाधीन क्षत्रिय समितीच्या शिफारसी शासनाने स्वीकारल्या असतील तर त्या कोणत्या स्वीकारल्या आहेत ?

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

सभापती महोदय, मी शेवटचा मुद्दा मांडते. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी विभागीय स्तरावर काही बैठका घेतल्या. आपण नगरविकास विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत पुणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक,कोल्हापूर अशा ठिकाणी विभागीय बैठका घेतल्या पाहिजेत जेणेकरुन अनेक प्रश्नांच्या संदर्भात त्यांना मंत्रालयात यावे लागणार नाही आणि त्यांचा वेळ देखील वाचेल. नगरविकास विभागाने अशी मोहीम घेऊन सर्व विभागातील महानगरपालिकांचा आढावा विभागीय स्तरावर घ्यावा. औरंगाबादमध्ये गुंठेवारीचा प्रश्न आहे, सोलापूरमध्ये हद्दवाढीचा प्रश्न आहे, कोल्हापूरमधील पंचगंगेचा प्रश्न आहे इत्यादी प्रश्नांच्या संदर्भात आपणास लवकर निर्णय घेता येईल.

सभापती महोदय, आपण उल्हासनगर संदर्भात चांगली भूमिका घेतली त्याबद्दल मी आपले स्वागत करते. पिंपरी-चिंचवड मधील बांधकामे नियमित करण्यासंदर्भात लोकांचा प्रतिसाद मिळावा त्यादृष्टीने आमचे सहकार्य राहील, एवढे बोलून माझे भाषण पूर्ण करते.

----------

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त ): सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी नियम 260 अन्वये मुंबई-नागपूर व इतर शहरांच्या संदर्भात जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, आज मुंबई, नागपूर आणि इतर शहरांमध्ये मोठ्या प्रमाणावर नागरीकरण वाढत आहे. त्यादृष्टीने या प्रस्तावाला खूप महत्व आहे. आपणास मुंबईतील कॅम्पाकोला इमारतीचे उदाहरण माहीत आहे. मी भाषण करताना काही सन्माननीय सदस्य मध्येच बोलत असल्यामुळे माझ्या भाषणात अडथळा निर्माण होत आहे.

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपणास कोणीही डिस्टर्ब करीत नाही. आपण एकचित्ताने भाषण करावे.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, मी भाषण करताना कोणी मध्ये मध्ये बोलत राहिले तर मला नीट भाषण करता येत नाही. तेव्हा आपण त्यांना तशा सूचना द्याव्यात.

सभापती महोदय, हा फार महत्वाचा विषय आहे. आपण आम्हाला पाच मिनिटे वेळ दिल्यास तेवढ्या वेळेमध्ये आम्ही आमचे मुद्दे कसे मांडणार तेव्हा आपण मला वेळ वाढवून द्यावा अशी विनंती आहे. त्या दिवशी देखील मला जादूटोणा विरोधी विधेयकावर बोलू दिले नाही. अगोदरच्या वक्त्यांना दोन-तीन तास बोलू दिले. परंतु मला दहा मिनिटे देखील बोलू दिले नाही.

सभापती महोदय, मुंबई शहरात मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे होत आहेत त्याची सखोल चौकशी केली पाहिजे. आज मुंबई शहरात किंवा मोठ्या शहरांमध्ये घरांच्या किंमती गगनाला भिडल्या आहेत. नोकरी करणाऱ्या मध्यमवर्गीयांना देखील मुंबईत घर विकत घेणे अशक्य झाले आहे. या सर्वांचा फायदा घेऊन शहरामध्ये अनेक ठिकाणी अनधिकृत झोपड्या वसत आहेत. त्यासाठी वॉर्ड ऑफीसर, पोलीस विभागाचे सहकार्य घेऊन हे सर्व प्रकार सुरु आहेत.

सभापती महोदय, मुंबई प्रमाणे नागपूर शहराची देखील अशीच दुर्दशा होत आहे. नागपूर शहरामध्ये भाजप पक्षाची सत्ता आहे. मुंबई महानगरपालिकेमध्ये शिवसेना आणि भाजप पक्षाची सत्ता आहे. मुंबई महानगरपालिकेचे बजेट 31 हजार कोटी रुपयांचे आहे. मुंबई महानगरपालिकेचे इतके मोठे बजेट असून देखील शहरातील लोकांना मूलभूत सुविधा पुरविण्यात आलेल्या नाहीत.

..3..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण....

सभापती महोदय, मुंबई शहरातील 65 टक्के लोकसंख्या झोपडपट्टीत राहते. त्यांच्याकडून पाणीपट्टी वसूल करण्यात येते. तसेच सिव्हरेज टॅक्स देखील घेतला जातो. असे असताना त्यांच्यासाठी शौचालयाची व्यवस्था केलेली नाही. शौचालय ही मूलभूत सुविधा असतानाही ती दिलेली नाही.

सभापती महोदय, एमएमआरडीएने मुंबई शहरात 250 शौचालये बांधण्याचा एक चांगला प्रोजेक्ट आणला होता. परंतु मुंबई महानगरपालिकेने तो रिजेक्ट करुन एमएमआरडीएने यामध्ये लुडबूड करु नये असे सांगितले. त्यानंतर हा प्रोजेक्ट मुंबई महानगरपालिका आणि एमएमएआरडीए या दोघांनीही राबविला नाही. त्यामुळे झोपडपट्टीतील लोकांना रस्त्यावर शौचासाठी बसावे लागत आहे. तीच अवस्था कचऱ्याची झालेली आहे.

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, जी सुलभ शौचालये बांधण्यात आली त्यामध्ये किती भ्रष्टाचार झाला हे आपणास माहीत आहे काय ?

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, मला याची कल्पना आहे. प्रशासकीय अधिकारी आणि स्थानिक नगरसेवक यांच्या संगनमताने हे सर्व होत असते. तेव्हा या प्रकरणाच्या मुळाशी जाऊन चौकशी केली पाहिजे.

सभापती महोदय, नागपूर शहरामध्ये जेएनएनयुआरएम अंतर्गत 24 x 7 योजना राबविण्यात आली होती. तसेच येथील नागरिकांना 24 तास पाणी मिळेल अशी योजना आणली होती. परंतु ज्या कंपनीला हे काम दिले होते त्या कंपनीने हे काम केले नाही.

सभापती महोदय, टी.चंद्रशेखर हे आयुक्त असताना त्यांनी नागपूर शहराचा चांगल्या प्रकारे विकास केला होता. नागपूर महानगरपालिकेमध्ये भाजपाची सत्ता आल्यानंतर त्यांनी नागपूर शहरासाठी स्टार बस नावाची योजना आणून त्यासाठी 510 बस खरेदी केल्या, परंतु यातील 50 टक्के बसेस निकामी झालेल्या आहेत.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ D/ KTG/ पूर्वी श्री.अजित... 11:15

श्रीमती विद्या चव्हाण....

मध्य प्रदेशची एक कंपनी काळ्या यादीत टाकलेली असताना सुध्दा त्या कंपनीला नागपूर महापालिकेच्या माध्यमातून काम देण्यात आले आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी हे सुध्दा लक्षात ठेवले पाहिजे की, नागपूर महापालिकेमध्ये त्यांच्या पक्षाची सत्ता आहे. तरी सुध्दा या संदर्भात महापालिकेकडून काहीही कार्यवाही होत नाही.

महोदय, नागपूर महापालिकेप्रमाणेच मुंबई महापालिकेमध्ये प्रचंड प्रमाणावर भ्रष्टाचार इ ाालेला आहे. मुंबई महापालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामाचा बोलका फोटो मी सोबत आणलेला आहे. तो फोटो आपण पहावा. अनधिकृत बांधकाम होत असलेल्या ठिकाणी स्थानिक नगरसेवक बसलेले आहेत आणि बाजूलाच एका खुर्चीवर पोलीस अधिकारी बसलेले आहेत. मुळात या अनधिकृत बांधकामाबाबतची तक्रार 11 तारखेला केली असताना त्या संदर्भात अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई झाली नाही. मुंबई महापालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामाबाबतची अशी अनेक उदाहरणे मी देऊ शकते.

सभापती महोदय, मुंबईमध्ये आदिवासींच्या अनेक जमिनी बळकावण्यात आल्या आहेत. पोलीस अधिकाऱ्यांच्या समक्ष अनधिकृत बांधकाम सुरु आहे. तरी सुध्दा त्या अनुषंगाने कारवाई होत नाही. मुंबई महापालिकेच्या आयुक्तांकडे अनधिकृत बांधकामांबाबत लेखी तक्रार करुनही त्या संदर्भात कारवाई होत नाही.

महोदय, मुंबई महानगरपालिकेमध्ये स्टँडींग कमिटी आहे. त्या ठिकाणी टक्केवारीने पैसे कमविले जातात. अनधिकृत बांधकामे वाढविण्यासाठी या स्टँडींग कमिटीच्या माध्यमातून...

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, कोणत्याही महानगरपालिकांमध्ये स्टँडींग कमिटी ही अंडरस्टँडींग कमिटी म्हणूनच गृहीत धरली जाते.

श्रीमती विद्या चव्हाण : महोदय, आपण सुध्दा स्टँडींग कमिटीबाबत खुलेआमपणे सांगत आहात. मी या निमित्ताने विचारु इच्छिते की, महापालिकेकडून लोकांकडून कशासाठी कर गोळा केला जातो ? गरिबांकडे पैसे नसतील तर ते ज्या ठिकाणी घर बांधत असतील त्या ठिकाणी त्यांना बांधू द्यावयास पाहिजे. शासन लोकांना घर देऊ शकत नसेल, महापालिका घर देऊ शकत नसेल, महापालिकेतील लोकप्रतिनिधी आणि अधिकारी अशा प्रकारे खुलेआम भ्रष्टाचार करीत असतील तर ते योग्य नाही.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी आता खाली बसावे. आता सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी आपल्या भाषणास सुरुवात करावी.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, माझ्या भाषणाचा समारोप करण्यापूर्वी मी मंत्री महोदयांना सांगू इच्छिते की, एमपीडीए ॲक्ट अंतर्गत किती लोकांवर कारवाई केली या बाबतची माहिती त्यांनी द्यावी.

महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले मनापासून आभार मानते व वेळेची मर्यादा लक्षात घेता माझे भाषण पूर्ण करते.

धन्यवाद.

------------

**<u>सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांचे वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन</u>**

**उप सभापती** : मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांचा आज वाढदिवस आहे. त्यांचा वाढदिवस मध्यंतराच्या सुटीच्या वेळी माझ्या दालनात साजरा करण्यात येईल. माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी सन्माननीय सदस्यांचा वाढदिवस साजरा करण्यासाठी माझ्या दालनात यावे.

-----------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे व इतर सन्माननीय सदस्यांनी म.वि.प. नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावाला समर्थन देऊन, त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे, किंबहुना मुंबई हा देशाचा कणा समजला जातो. मुंबईच्या माध्यमातून केंद्र सरकारला करोडो रुपयांचा टॅक्स मिळतो. परंतु दिलेल्या टॅक्सच्या तुलनेत केंद्र सरकारकडून मुंबईला काय मिळते, हा संशोधनाचा विषय आहे.

महोदय, सातत्याने एमएमआरडीए कडून मुंबई महापालिकेच्या हक्कांवर गदा आणली जाते. अनेकदा मुंबईकरांना अमुक रस्ता कोणाचा आहे असा प्रश्न पडतो. एमएमआरडीएचा रस्ता खराब झाल्यानंतर सुध्दा महापालिकेकडे बोट दाखविले जाते. एमएमआरडीएने केलेले रस्ते खराब झाले तरी त्या संदर्भात मुंबई महापालिकेकडे बोट दाखविले जाते. उदाहरणार्थ एका बाजूचा रस्ता एमएमआरडीएने बनविलेला असतो व दुसऱ्या बाजूचा रस्ता महानगरपालिकेने बनविलेला असतो. परंतु या दोन्ही बाजूच्या मधल्या भागाची जबाबदारी नेमकी कोणाची असा प्रश्न रहिवाशांना पडतो. त्यामुळे या संदर्भात माननीय मंत्र्यांकडून स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे. असा प्रसंग उद्‌भवल्यास कोणता रस्ता महापालिकेचा आणि कोणता रस्ता एमएमआरडीएचा आहे हे माननीय मंत्री महोदयांनी सांगावे.

महोदय, धारावीच्या पुनर्विकासाचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, धारावीचा पुनर्विकास नक्की कधी होणार आहे ? धारावीच्या पुनर्विकासाबाबत सभागृहामध्ये अनेक प्रश्न चर्चेला आले होते. या विषयी अनेक बैठका झाल्या आहेत. अनेक वेळा माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, धारावीचा पुनर्विकास करण्यासाठी निविदा मागविल्या आहेत. परंतु अद्यापपर्यंत धारावीचा पुनर्विकास झाला नाही. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, धारावीचा पुनर्विकास केल्यास तेथील रहिवाशांना किती स्क्वेअर फुटची घरे मिळणार आहेत ? महोदय, या निमित्ताने शिवसेनेची मागणी आहे की, धारावी येथील रहिवाशांना पुनर्विकासामध्ये कमीत कमी 400 स्क्वेअर फुटची घरे मिळाली पाहिजेत. आतापर्यंत या अनुषंगाने तीन वेळा निविदा मागविल्या होत्या. परंतु त्यातून काहीच निष्पन्न झाले नाही.

नंतर श्री.कांबळे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

तेथे छोटे-मोठे उद्योगधंदे करणारे लोक असून ज्यांची रोजीरोटी त्या उद्योगधंद्यांवर चालली आहे त्यांचे काय होणार आहे ? आपण त्या उद्योगधांना समाविष्ट करून घेणार आहात का, याबाबत शासनाची नेमकी भूमिका काय आहे ? जेएनएनयुआरएम ही योजना शहराच्या मूलभूत गरजा लक्षात घेऊन समोर आली आहे. पाणीपुरवठा, गटार नाले, वाहतूक, पूर-पाणी, रस्ते, पूल, उड्डाणे यासाठी एक ठराविक रक्कम प्रत्येक हेडसाठी राखून ठेवली जाते. भारत सरकारने 12,205 कोटी रूपयांच्या 85 प्रकल्पांना मंजुरी दिली. केंद्र शासनाचा हिस्सा 5341 कोटी रूपयांचा आहे तर राज्य शासनाचा हिस्सा 2029 कोटी रूपयांचा आहे. दोन्ही हिस्से वेगवेगळे आहेत. नेमके काय झाले आहे ? प्रकल्प राबविणाऱ्या संस्थांचा हिस्सा 4835 कोटी रूपयांचा आहे. कोणकोणते प्रकल्प सुरू झाले आहेत आणि कधी सुरू झाले आहेत ? माझी माहिती आहे की, राज्य शासनाने आणि त्याच्या संस्थांनी आपला हिस्सा अजूनपर्यंत वर्ग केलेला नाही. त्यामुळे या जेएनएनयुआरएम योजनेच्या विविध प्रकल्पांचे काय झाले आहे, हे मला विचारायचे आहे.

सभापती महोदय, माझा दुसरा महत्वाचा मुद्दा मोनो व मेट्रो रेलच्या संदर्भात आहे. आपण 500 मीटरच्या भागात सर्वांगीण विकास करण्यासाठी 4 एफएसआय देणार आहोत, त्या धोरणाचे काय झाले ? 500 मीटरच्या परिसराचा सर्वांगीण विकास करायचा आहे म्हणजे नेमके काय, हा आमच्या मनात प्रश्न आहे. मेट्रो, मोनो रेलवर "रिलायन्स" असे लिहिले आहे. आपण मेट्रो रेल, मोनो रेल्वे रिलायन्सला विकून टाकली आहे का ? खाजगीकरण केले आहे, हे बरोबर आहे. राज्य शासनाचा त्यामध्ये हिस्सा आहे की नाही ? आपण पूल, उड्डाणपूल हे देखील बीओटीवर दिले आहेत. पण त्यावर कोणाचे नाव नाही. येथे रिलायन्स मेट्रो असे लिहिले आहे. आपण पहिल्यांदा हे नाव काढून टाकावे. शेडवर पण अशा प्रकारे नावे आहेत.

**उप सभापती** : ही गंभीर बाब आहे.

डॉ दीपक सावंत : सभापती महोदय, या संदर्भातील फोटो आहेत. ट्रायल घेतली त्यावेळी देखील विविध दूरचित्रवाहिन्यांवरून हे दिसत होते. मोनो, मेट्रो रेलच्या पुलांखालील जागांचे, कारशेडसाठी दिलेल्या जागांचे काय करणार आहात, त्या जागा कोणाला आंदण देणार आहेत की

..2

डॉ. दीपक सावंत ....

परत घेणार आहात ? सभापती महोदय, डम्पिंग ग्राऊंडचा एक विषय महत्त्वाचा आहे. मुंबईमध्ये डम्पिंग ग्राऊंडची मोठी समस्या आहे. प्रत्येक वसाहत म्हणते की, आमच्या शेजारी डम्पिंग ग्राऊंड नको. गोवंडी असेल, दहिसर असेल डम्म्पिंग ग्राऊंडची, कचऱ्याची समस्या आहे. आपण याबाबत देखील विचार करावा. आपणाकडून या मुद्यांची उत्तरे मिळावीत, हीच अपेक्षा आहे. मला बोलण्यास वेळ दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे.

----

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उदय सामंत (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे यांनी नियम 260 अन्वयेचा जो प्रस्ताव मांडला आहे आणि त्या प्रस्तावावरील चर्चेत सन्माननीय सदस्य ॲड. अनिल परब, सर्वश्री दिवाकर रावते, रामनाथ मोते, डॉ. नीलम गोऱ्हे, श्रीमती विद्या चव्हाण, डॉ. दीपक सावंत यांनी सहभाग घेतला. शासनाला त्यांनी नागरीकरणाच्या बाबतीत अतिशय चांगल्या सूचना केल्या आहेत. शासन त्यांच्या सूचनांचा अभ्यास करून नक्कीच विचार करील, असे मी सभागृहाला अभिवचन देतो.

मला सांगण्यास आनंद होत आहे की, 2 महिन्यांपूर्वी केंद्र शासनाच्या नगरविकास खात्याचे मंत्री श्री. कमलनाथ साहेबांनी दिल्लीत एक वर्कशॉप आयोजित केले होते. 20 वर्षानंतर देशातील प्रत्येक शहरातील नागरीकरण वाढणार आहे, त्यासाठी इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट करणे आवश्यक आहे, सुविधा पुरविणे आवश्यक आहे, त्यामुळे त्या संदर्भात राज्ये कशा रितीने आपली भूमिका बजाविणार आहेत, या संदर्भात हे वर्कशॉप घेतले होते.

( नंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उदय सामंत.....

त्यामध्ये जागतिक बँकेचे अधिकारी, नाबार्डचे अधिकारी उपस्थित होते. त्या बैठकीत त्यांनी प्रत्येक राज्याला गाईडलाईन्स दिलेल्या आहेत. ज्या ज्या राज्यांमध्ये झोपडपट्टयांच्या पुनर्विकासाची कामे, एमएमआरडीएची रस्त्यांची कामे, सिडकोची कामे सुरु आहेत त्यासाठी केंद्र शासनाने गाईड लाईन्स दिलेल्या आहेत. आघाडी शासन सुध्दा अतिशय डोळसपणे व सकारात्मकपणे या नागरीकरणाकडे बघत आहे, हे मला आनंदाने सांगावयाचे आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी हे अधिवेशन विदर्भात सुरु असल्यामुळे नागपूरपासून या विषयाला सुरुवात केलेली आहे. वाणिज्य बांधकामांचा निर्देशांक वाढविण्याच्या संदर्भात बदल करण्यात आल्याचा त्यांनी दाखला दिलेला आहे. एनआयटीचे 80 ले-आऊट नियमित करण्याच्या संदर्भातील निर्णय असतील ते शासनाकडे प्रलंबित आहेत. त्याबाबत लवकरात लवकर निर्णय घेतला जाईल. परंतु त्यांनी काही सर्व्हे नंबर्सचा उल्लेख करुन म्हटले आहे की, ते अचानकपणे नियमित झालेले आहेत. त्याचाही नीट तपास केला जाईल. शेवटी एनआयटी असेल, नागपूर महानगरपालिका असेल, ते त्यांच्या क्षेत्रातील आरक्षणे बदलण्याचा निर्णय घेत असतात किंवा त्याचे प्रस्ताव शासन स्तरावर येत असतात. पण खालच्या स्तरावर आरक्षणे बदलत असताना नक्की काय झाले आहे तसेच त्यांनी नागपूरच्या संदर्भात जे जे उल्लेख केले आहेत त्याचा निश्चितपणे तपास केला जाईल.

सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी अकोला महानगरपालिकेचा सगळ्यात महत्वाचा मुद्दा मांडलेला आहे. त्या महानगरपालिकेत राजेंद्र धनबहाद्दूर नावाचा कर्मचारी होता. त्याला सहाय्यक आयुक्त म्हणून पदोन्नती देण्यात आली. अशा प्रकारे पदोन्नती देता येत नाही असे कोर्टाने म्हटलेले आहे. म्हणून ती पदोन्नती रद्द करण्यात आली. तेथील प्रभारी आयुक्तांनी हायकोर्टाच्या गाईडलाईन्स असतानाही धनबहाद्दूर यांना सहाय्यक आयुक्तपदी पदोन्नती दिलेली आहे. ही अतिशय गंभीर बाब आहे. वैयक्तिक नस्तीही गहाळ झालेली आहे. शिक्षकांना सहावा वेतन आयोगाचे पैसे द्यावयाचे होते. तो पैसाही अन्यत्र वाटप केला आहे. त्याबाबतही सविस्तर चौकशी केली जाईल. तेथे नियमित आयुक्तांना नेमण्याबाबत लवकरात लवकर कार्यवाही केली जाईल.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

श्री.उदय सामंत.....

सभापती महोदय, ठाणे क्लस्टर, पिंपरी-चिंचवडच्या क्लस्टरचा महत्वाचा विषय त्यांनी मांडलेला आहे. सत्ताधारी पक्षातील काही आमदारांनी राजीनामे दिले होते असेही त्यांनी नमूद केले आहे. मी स्वत: पिंपरी-चिंचवड भागात जाऊन आलो आहे. त्यामुळे आमच्या आमदारांनी नाटक केलेले नाही. शिवसेना-भाजपाने मोर्चा काढला होता हे देखील खरे आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या क्षेत्रात जे लोक अनधिकृतपणे राहत आहेत, पक्षाच्या पलीकडे जाऊन विचार करण्याची गरज असल्यामुळे तेथील लोकांवर अन्याय होणार नाही यादृष्टीकोनातून एमआरटीपी ॲक्ट असेल, पंचायत समितीच्या कायद्यातील बदल असेल, ते करण्यासाठी शासन सकारात्मक आहे, ही बाब विचाराधीन आहे. मी आपल्यामार्फत पिंपरी-चिंचवडच्या लोकांना कळवू इच्छितो की, त्या लोकांवर अन्याय होणार नाही, या भूमिकेतून शासन लवकरात लवकर निर्णय घेईल. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे व अन्य सन्माननीय सदस्यांनीही हा मुद्दा मांडला होता. त्यामुळे या मुद्याकडे शासन सकारात्मक दृष्टीकोनातून पाहील.

सभापती महोदय, क्लास्टरच्या बाबतीत तेथील दोन्ही खासदार श्री.आनंद परांजपे, श्री.संजीव नाईक हे ठाण्यामध्ये उपोषणाला बसले होते हे आपल्यालाही माहीत आहे. तेथील सर्व लोकांची क्लस्टर डेव्हलपमेंट झाले पाहिजे अशी मागणी आहे. त्याबाबतचे धोरण अंतिम टप्प्यात आलेले आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी त्याबाबत चर्चा करुन घोषणा केलेली आहे की, मुंबईचा निर्णय झाल्यानंतर तांत्रिकदृष्ट्या सक्षम असे ठाणे व तेथील परिसरातील क्लस्टर डेव्हलपमेंटचे धोरण लवकरात लवकर आखले जाईल.

सन्माननीय सदस्य ॲड. अनिल परब, श्री. दिवाकर रावते, डॉ.दीपक सावंत यांनी एसआरएबाबत मुद्दे मांडलेले आहेत. म्हाडाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांसोबत बैठक झाली होती असे ते म्हणाले आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांनी म्हाडाचे भविष्यातील धोरण ठरविले जाईल असे सांगितले होते. याबाबतची कार्यवाही होईल की नाही असा सन्माननीय सदस्यांमध्ये संभ्रम निर्माण झालेला आहे. मी स्वत: याबाबत पुढाकार घेईन. मुंबईतील सर्वच लोकप्रतिनिधींबरोबर चर्चा करुन हे अधिवेशन संपल्यानंतर एक महिन्याच्या आत माननीय मुख्यमंत्र्यांसोबत बैठकीचे आयोजन केले जाईल.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उदय सामंत...

जेणेकरुन म्हाडाच्या वसाहतीमध्ये राहाणा-या लोकांमध्ये जे काही संभ्रमाचे वातावरण आहे आणि त्या बाबत सर्वपक्षीय लोक या सदनामध्ये त्यांचे म्हणणे मांडत असताना महाराष्ट्र शासन कशा पध्दतीने तेथील लोकांना न्याय देणार आहे हे मुख्यमंत्र्या समवेत बैठक घेऊन जाहीर केले जाईल असा आशावाद मी व्यक्त करतो.

माननीय विरोधी पक्षनेत्यांनी दोन महत्वाचे मुद्दे या ठिकाणी मांडले. ठाणे परिसरामध्ये हिरानंदानीच्या रोडाज प्रकल्पाचे बांधकाम कांदळवन भागात चालू आहे असे त्यांनी सांगितले. या बाबतीत वन खात्याने, महानगरपालिकेने लक्ष घालणे गरजेचे आहे. घाटकोपरच्या बाबतीत त्यांनी सांगितले की, 100 एकर जमीन दिलेली असताना फक्त 46 एकर जमीनच हस्तांतरित झालेली आहे. बाकीच्या जमिनीबाबत त्यांच्यासहीत सर्वांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. वन खात्याचा राज्यमंत्री म्हणून सभागृहाला मी सांगू इच्छितो की, कांदळवनाचे संरक्षण करण्यासाठी वन खात्याने एक कमिटी गठीत केलेली आहे आणि एक भरारी पथक देखील निर्माण केलेले आहे. ही चर्चा विधानसभेमध्ये झाली होती. हा प्रश्न घाटकोपर, मुलुंड आणि ठाण्याशी संबंधित असला तरी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातला हा विषय आहे. मालवणी पासून मुलुंड पर्यंत म्हणजे जेथे जेथे कांदळवन आहे त्याबाबत काल चर्चा झाली. त्या चर्चेमध्ये सर्वपक्षीय सदस्यांनी सहभाग घेतला होता. त्यावेळी असा निर्णय घेतलेला आहे की, जे भरारी पथक आम्ही निर्माण केलेले आहे त्या भरारी पथकाने कांदळवनाचे फेर सर्वेक्षण सॅटेलाईटच्या माध्यमातून करावे किंवा नागपूरची जी संस्था आहे तशा प्रकारची संस्था मुंबईमध्ये असेल तर त्याना बरोबर घेऊन हे सर्वेक्षण करावे.` कांदळवनासंबंधी सुप्रिम कोर्टाचा निर्णय असताना देखील अतिक्रमणे झालेली आहेत, माती टाकण्याचे काम झालेले आहे, काही लोकांनी बांधकाम करण्याचा प्रयत्न केलेला आहे. या सर्वांची सविस्तर चौकशी केली जाईल. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जमीन हस्तांतरित केलेली असल्याचे सांगितले. ही जमीन कशा पध्दतीने हस्तांतरित केलेली आहे याची देखील सखोल चौकशी केली जाईल.

सभापती महोदय, मध्यंतरी एका लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने माननीय विरोधी पक्षनेत्यांनी मैला वाहून नेण्याच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला होता. आजही जुन्या पध्दतीने मग ते पुरुष





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असतील किंवा महिला असतील मैला हाताने उचलतात आणि त्यामुळे रोगराई पसरण्याची शक्यता असते असे त्यांनी सांगितले. मी सफाई कामगारांना दिलासा देऊ इच्छितो की, अशा पध्दतीने पूर्वीच्या पध्दतीनुसार हाताने मैला उचलण्याचे काम सुरु असेल तर ते काम कशा पध्दतीने बंद करता येईल या बाबतीत देखील धोरणात्मक निर्णय महाराष्ट्र शासन घेईल. सफाई कामगार मग तो महानगरपालिकेतील असेल, नगरपालिकेतील असेल, नगरपंचायतीमधील असेल किंवा अ, ब, क, ड या नगरपालिकेतील असेल, तो अतिशय महत्वाचा घटक आहे. त्यांना किती वेतन दिले जाते हे सर्व लोकप्रतिनिधींना माहीत असले पाहिजे. नगरपालिकेमध्ये कॉण्ट्रॅक्ट सिस्टिम आहे. त्यांनी कॉण्ट्रॅक्टरला काम द्यायचे आणि त्याने सफाई कामगारांचे पेमेण्ट करायचे अशी सिस्टिम आहे. यासंदर्भात भविष्यामध्ये महाराष्ट्र शासन असा निर्णय घेईल की त्यांचे जे मिनिमम वेज कायद्याखाली वेतन आहे ते त्यांच्या अकौण्टमध्ये जमा होईल. म्हणजे कॉण्ट्रॅक्टर त्यांना 100 रु.देतो की, 200 रु. देतो की 50 रुपये देतो की मिनिमम वेजेस ॲक्ट अंतर्गत 246 रुपये वेतन देतो हे देखील कळले पाहिजे. सफाई कामगारांना न्याय मिळाला पाहिजे म्हणून भविष्यामध्ये महाराष्ट्र शासन अशा प्रकारचे धोरण अवलंबिणार आहे.

सभापती महोदय, विक्रोळी येथील आगीचा या ठिकाणी उल्लेख करण्यात आला. अनेक सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केल्याप्रमाणे स्ट्रक्चरल ऑडिट हे अतिशय महत्वाचे आहे. 30 वर्षाच्या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट महानगरपालिकेने करायचे, नगरपालिकेने करायचे की संबंधित संस्थेने करायचे याबाबतीत संभ्रमावस्था आहे. अनेक सोसायटया स्ट्रक्चरल ऑडिट करुन घेत नाहीत. इमारत दुर्घटनाग्रस्त झाल्यानंतर स्ट्रक्चरल ऑडिट झाले नव्हते अशा प्रकारचा मुद्दा पुढे येतो. म्हणून नगरपंचायती पासून महानगरपालिकेपर्यंत हे स्ट्रक्चरल ऑडिट अनिवार्य करण्यात येईल, त्यावर नियंत्रण ठेवण्याचे काम महानगरपालिकेचे आयुक्त आणि नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांना करावेच लागेल अशा पध्दतीच्या सूचना देखील शासना मार्फत संबंधित अधिकाऱ्यांकडे निश्तिपणे जातील.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अनधिकृत बांधकामाचा मुद्दा या ठिकाणी उपस्थित केला. नगरपंचायती पासून मुंबई महानगरपालिकेपर्यंत कोणत्या शहरामध्ये, कोणत्या गावामध्ये

..3..



MSS/ D/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 11:30

श्री. उदय सामंत...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

किती अनधिकृत बांधकामे आहेत याचे सर्वेक्षण करणे गरजेचे आहे. हे सर्वेक्षण सीओ, आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर करु शकतो. यासाठी तीन महिन्याचा, सहा महिन्याचा किंवा वर्षभराचा कालबध्द कार्यक्रम आखला पाहिजे. या बाबतीत एक निर्णय घेणे आवश्यक आहे. मुंबई महानगरपालिकेपासून ते नगरपंचायती पर्यंत हे आदेश जातील आणि त्या ठिकाणी 30 वर्षे पूर्ण झालेल्या, 50 वर्षे पूर्ण झालेल्या इमारती किती आहेत, 100 वर्षे पूर्ण झालेल्या इमारती किती आहेत, किती इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट झालेले आहे याचा संपूर्ण डाटा गोळा केला जाईल. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये अशा प्रकारच्या किती इमारती आहेत याचे ॲनलिसिस करुन ती माहिती संकलित करण्याचा प्रयत्न करु आणि तशा सूचना संबंधित खात्याला देऊ.

सभापती महोदय, एअर पोर्टच्या संदर्भात पुनर्वसन करीत असताना ज्या कंपन्यांना टीडीआर दिलेला आहे तो कशा पध्दतीने दिलेला आहे, तो आधी का देण्यात आला, त्यामधील दोन कंपन्या का स्प्लिट झाल्या याची देखील सविस्तर तपासणी करणे गरजेचे आहे. हा तपास करुन त्याची माहिती जनतेसमोर ठेवली जाईल. कारण टीडीआर दिल्यानंतर कंपन्या स्प्लिट झाल्या असे माननीय विरोधी पक्षनेत्यांचे म्हणणे आहे आणि त्या बाबतीत देखील अतिशय चांगल्या पध्दतीने तपास केला जाईल.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उदय सामंत....

या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आणि डॉ.दीपक सावंत यांनी सांगितले की, जवाहरलाल नेहरु योजने अंतर्गत जे प्रकल्प चालू आहेत, त्यासाठी निश्चित किती पैसे देण्यात आलेले आहेत. आपण सध्या नागपूर येथे आहोत, नागपूरमध्ये देखील 1100 कोटी रुपयांची कामे या प्रकल्पांतर्गत करीत आहोत आणि यात 19 प्रकल्प आहेत. 10 प्रकल्प पूर्ण झालेले आहेत आणि 9 प्रकल्पांची कामे पूर्णत्वाकडे जात आहेत. महाराष्ट्राचा पूर्ण डेटा उपलब्ध आहे. माझ्या अंदाजाप्रमाणे 12,000 ते 12500 कोटी रुपयांपर्यंत 84 प्रकल्प प्रस्तावित होते आणि आता त्या प्रकल्पांची कामे सुरु झालेली आहेत. हे देखील फंडींग केंद्र शासन आणि महाराष्ट्र शासन यांच्यामार्फत त्या त्या नगरपालिका आणि महानगरपालिकांना देत आहोत.

डॉ.दीपक सावंत : यामधील संस्थांचा जो भाग आहे, तो त्यांनी परिपूर्ण केलेला नाही अशी माझी माहिती आहे.

श्री.उदय सामंत : संस्थांनी अशा पध्दतीचे प्रस्ताव किंवा त्यांचे भाग परिपूर्ण केले नसतील तर त्यासंबंधात देखील सूचना त्यांना दिल्या जातील. परंतु महाराष्ट्राचे नागरीकरण होत असताना ज्या नगरपालिका आहेत, त्यांच्याकडे देखील शासन डोळसपणे बघते आहे. वैशिष्टपूर्ण निधी असेल, रस्त्याचा निधी असेल किंवा 13 व्या वित्त आयोगातून येणारा निधी असेल, तो निधी त्या त्या नगरपालिकांना देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. या वर्षी देखील रस्ते अनुदानाचा निधी नगरपालिकेपासून ते नगरपंचायतींपर्यंत येत्या 20 दिवसात वितरित होईल अशा पध्दतीची भूमिका महाराष्ट्र शासनाने घेतलेली आहे. या ठिकाणी ज्या सन्माननीय सदस्यांनी सूचना केलेल्या आहेत, त्या सूचनांचा निश्चितपणे विचार केला जाईल.

सभापती महोदय, मोनो रेलच्या ठिकाणी फक्त रिलायन्स कंपनीचे नाव आहे, महाराष्ट्र शासनाचे नाव कोठेही दिसून येत नाही या बाबतीत एक मुद्दा उपस्थित केला गेला. या बाबतीत मी माझी भूमिका सांगत आहे. आपणही या बाबतीत सूचना केलेली आहे. त्या ठिकाणी रिलायन्सचे नाव आहे, तेथे शासनाचे नाव दिसून येत नाही. या बाबतीत त्यांना आजच्या आज सूचना देण्यात येतील की, त्या ठिकाणी महाराष्ट्र शासनाचे नाव असले पाहिजे. महाराष्ट्र शासन पुढाकार घेऊन

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ KTG/

श्री.उदय सामंत....

मोनो रेल सुरु करीत आहे. यासंबंधीच्या सूचना रिलायन्स कंपनीला दिल्या जातील. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या ठिकाणी ज्या सूचना केल्या आहेत, त्या सूचनाच्या अनुषंगाने तपास करणे गरजेचे आहे. या बाबतीत जो काही तपास होईल, त्या संदर्भात आपल्याशी चर्चा करुनच योग्य तो निर्णय घेतला जाईल.

महोदय, या ठिकाणी लोकप्रतिनिधी बाबतचा दुसराही प्रश्न उपस्थित केला गेला. त्या बाबतीत मी सांगू इच्छितो की, दहिसर येथील कांदळवन येथील एका नगरसेविकेला जागेचे अतिक्रमण केलेल्या लोकांनी दमदाटी केली आहे. त्या कोणत्या पक्षाच्या आहेत, ते न पाहता, त्या एक लोकप्रतिनिधी आहेत, असा दृष्टीकोन समोर ठेवून शासन कामकाज करील. हेरिटेजच्या बाबतीत देखील मुद्दा उपस्थित केला गेला. तो विषय देखील अतिशय महत्वाचा आहे. हेरिटेजच्या बाबतीत विधानसभेमध्ये सविस्तर चर्चा झालेली आहे. मुंबईतील 188 हेरिटेज इमारतीपुरता हा विषय नाही. यात बृहन्मुंबई महापालिकेतील सगळेच भाग येतात. फेज-1 आणि फेज-2 मध्ये शिवाजी पार्क नसताना आता नव्याने शिवाजी पार्कचा समावेश करण्यात आलेला आहे. 188 मध्ये याचा देखील समावेश आहे. या बाबतीत समितीने काय ॲनलिसिस करुन शिवाजी पार्क यामध्ये आणले, यासबंधी तपास करण्याच्या सूचना कालच मी विधानसभेत दिलेल्या आहेत.

यानंतर श्री.भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उदय सामंत........

मी विधानसभेत तसे आश्वासन दिलेले आहे. हेरिटेजमुळे मुंबईकरांच्या जनजीवनावर परिणाम होणार नाही अशा प्रकारची भूमिका शासन नक्की घेईल. या संदर्भात एक छाननी समिती नेमली आहे. छाननी झाल्यानंतर सगळे प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे येणार आहेत. त्यावर महाराष्ट्र शासन मुंबईकरांवर अन्याय करणार नाही एवढे आपल्या माध्यमातून मला सांगावयाचे आहे.

**उप सभापती** : सभागृहाने या प्रस्तावावर विचार केला आहे. सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता सुरु होईल.

(सभागृहाची बैठक सकाळी 11.41 ते दुपारी 12.00 पर्यंत स्थगित झाली.)

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगिती नंतर)

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**सभापती** : आता अल्पसूचना क्रमांक 48844 घेण्यात येईल.

(प्रेस येथे सोबतचा अल्पसूचना क्रमांक 48844 छापावा)

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अल्प सूचना क्रमांक 48844...

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, उत्तरामध्ये मानवी हक्क आयोगावर अध्यक्ष व 2 सदस्यांची नेमणूक करण्यात आली असल्याचे व 13 हजार केसेस प्रलंबित असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच विशेष पोलीस महानिरीक्षकाचे पद रिक्त असून सदर पद भरण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे असे देखील नमूद करण्यात आले आहे. तेव्हा 13 हजार तक्रारींचा निपटारा किती दिवसात पूर्ण होणार आहे तसेच विशेष पोलीस महानिरीक्षकाचे पद किती दिवसात भरण्यात येणार आहे ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, ट्रान्सफरच्या वेळी विशेष पोलीस निरीक्षकाचे पद भरले जाईल. मध्यंतरीच्या काळात कोर्टाकडून दीड वर्षात कोणाचीही नावे न आल्यामुळे शासनाने समिती स्थापन केली. ही फार मोठी कमिटी आहे. सदर कमिटी ही माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झाली असून त्या समितीमध्ये मी स्वत:, विधान परिषदेचे माननीय सभापती, विधान सभेचे माननीय अध्यक्ष आणि विधान परिषदेचे माननीय विरोधी पक्षनेते देखील आहेत. सुरूवातीला आम्ही उच्च न्यायालयाकडून नावे मागितली होती. त्यांनी एकच नाव दिले होते. त्यामुळे सिलेक्शन करायला स्कोप नव्हता. त्यामुळे आपण जाहिरात दिली. तसेच हायकोर्टाकडून नावे देखील मागविली. आपली जी उच्चाधिकार समिती आहे त्या समितीने ही नावे निश्चित केली आहेत. येथे कार्यरत असलेले हायकोर्टातील निवृत्त जज्ज हे काम सोडून गेले आहेत. तसेच, दोन जण सेवानिवृत्त झाल्यामुळे बराच काळ मानवी हक्क आयोग कार्यरत नव्हता. आता आम्ही अध्यक्षांची नेमणूक केली आहे. पोलीस दलातील एक अधिकारी देखील हजर झालेला आहे. अजूनही एक जज्ज हजर झालेले नाहीत. आम्ही त्यांची ऑर्डर काढलेली आहे. आम्ही त्यांना विचारणार आहोत की, आपण हजर होणार आहात काय ? ते जर हजर झाले नाहीत तर माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सुचविलेल्या नावाचा विचार करता येईल काय किंवा पुन्हा जहिरात काढावी लागेल काय हे तपासून बघण्यात येईल. एकदा आयोग गठित झाल्यानंतर केसेसचा निपटारा निश्चितपणाने होईल. आता नुकतीच कामाला सुरूवात झाली असून 299 केसेस काढण्यात आल्या आहेत. त्यांनी याच स्पीडने काम केले तर वर्षभरात केसेस निघतील. आम्ही त्यांना अशाही सूचना केल्या आहेत की, ज्या महत्त्वाच्या केसेस आहेत त्या त्यांनी प्राधान्याने घ्याव्यात. पोलीस महानिरीक्षकाचे पद लवकर भरले जाईल. आयोग आता कार्यरत झाला आहे. प्रकरणे सुद्धा लवकरच निकाली निघतील.

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मांडवे दिगर (ता.भुसावळ, जि. जळगांव) येथील सूर नदीवर पूल बांधण्याबाबत करावयाची कार्यवाही**

**(1) * 46318 श्री.मनीष जैन , डॉ.सुधीर तांबे , श्री.संजय दत्त , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.अमरनाथ राजूरकर** : सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मांडवे दिगर (ता.भुसावळ, जि. जळगांव) येथील सूर नदीवर पुल नसल्यामुळे सामान्य नागरिकांना खोल पाण्यातून जीव धोक्यात घालून वाट काढावी लागत असल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या भागातील नागरिकांना लोकशाही दिनी जिल्हाधिकारी जळगांव तसेच पालकमंत्री महोदय यांनी नदीवर पूल न बांधल्यास जलसमाधी आंदोलन करण्याबाबतचे निवेदनही दिले असल्याची बाब निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, शासनाने शेतकऱ्यांचे मागणीनुसार सूर नदीवर पूल बांधण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेंद्र मुळक,श्री. सुनिल तटकरे यांच्याकरिता** : (1) होय.

(2) होय.

(3) उक्त पुलाच्या बांधकामाच्या अंदाजपत्रकाची महामंडळ स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.मनीष जैन : सभापती महोदय, मांडवे दिगर, ता.भुसावळ, जि.जळगाव येथील सूर नदीवर पूल बांधण्यासंबंधीचा प्रश्न आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून 66 वर्षे झाली आहेत. येथील लोकांची जमीन पाण्याखाली आलेली आहे. शेतकऱ्यांना जाण्या-येण्याकरिता पूल आणि रस्ता नाही. शेतामध्ये काम करण्यासाठी रोज 300 शेतकऱ्यांना पाण्यातून जावे लागते.

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. :46318......

श्री. मनीष जैन ....

येथील शेतकऱ्यांना पाण्यातून मार्गक्रमण करण्यासाठी टयूबवर बसून, हाताने तार धरुन जावे लागते. परंतु शेतकऱ्याने शेत माल पिकवल्यानंतर तो मार्केटमध्ये कसा आणावयाचा हा मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. उत्तरमध्ये म्हटले आहे की, पुलाच्या बांधकामाच्या अंदाजपत्रकाची महामंडळ स्तरावर कार्यवाही सुरु आहे. सभापती महोदय, 40 दिवसापूर्वी प्रश्न दिलेला असतांनाही अद्यापि कोणतीही कार्यवाही झालेली नाही. या ठिकाणच्या शेतकऱ्यांचे प्रचंड हाल होत आहेत. त्यामुळे यासंदर्भात माझे प्रश्न असे आहेत की, या ठिकाणची जमीन पाण्याखाली जाणार आहे याचा अंदाज अधिकाऱ्यांना आला नव्हता काय, शासन स्तरावर पुलाचे बांधकाम किती दिवसात पूर्ण होणार आहे ? या ठिकाणची 50 एकर जमीन पाण्याखाली गेली असल्यामुळे या जमिनीचे भूसंपादन करुन नुकसान भरपाई दिली जाणार आहे काय, तसेच यामध्ये पिकाचे नुकसान झाले असेल तर पिकाची नुकसान भरपाई दिली जाणार आहे काय ?

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मनीष जैन यांनी या प्रश्नाच्या संदर्भात स्पेसिफिक प्रश्न विचारले आहेत. तापी नदीच्या वागूर नदीवर हे धरण बांधण्यात आलेले आहे. या ठिकाणच्या धरणाच्या बॅक वॉटरमध्ये मांडवे दिगर गाव असून बॅक वॉटरमुळे येथील जुना रस्ता पाण्याखाली गेला आहे. या भागात पूल बांधण्याचा निर्णय घेण्यात आलेला असून तांत्रिक मंजुरी देखील देण्यात आली आहे. या पुलाची निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कार्यारंभ आदेश दिले जातील व एक वर्षाच्या आत हा पूल बांधण्यात येईल.

डॉ. सुधीर तांबे : सभापती महोदय, वाघूर प्रकल्पाचे हे बॅक वॉटर आहे. तारखेडा व मांडवे दिगर ही गावे यामध्ये जोडली गेली आहेत. या पुलाचे काम लवकरात लवकर केले जाईल अशी माहिती माननीय मंत्री महोदयांनी या ठिकाणी दिलेली आहे. या ठिकाणी मोठया प्रमाणात अपघात होत असतात. त्यामुळे मला माननीय मंत्री महोदयांना असा प्रश्न विचारावयाचा आहे की, या ठिकाणची 50 एकर जमीन बुडीताखाली गेली असल्यामुळे या ठिकाणच्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई दिली जाणार आहे काय, तसेच हे काम युध्द पातळीवर होईल काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, हा पूल बांधण्यासाठी अंदाजे 1.28 कोटी रुपयांचा निधी लागणार असून प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. पुलाची निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून निविदा प्रकाशित केली जाईल. निविदा उघडल्यानंतर 45 दिवसाचा कालावधी नंतर कार्यारंभ आदेश दिला जाईल. पुलाच्या संदर्भातील महामंडळाकडे निधी असल्यामुळे निधीचा प्रश्न येणार नाही. या भागातील जमिनीचे भूसंपादन करण्याबाबत विनंती करण्यात आली असल्यामुळे तशा प्रकारचे आदेश दिले जातील. पाहणी केल्यानंतर जमिनीचे भूसंपादन करण्याची आवश्यकता वाटली तर त्या प्रमाणे जमीन भूसंपादित केली जाईल.

श्री. मनीष जैन : सभापती महोदय, या ठिकाणी एकंदर 800 एकर जमीन आहे. एका वर्षात पुलाचे काम होईल असे उत्तर मंत्री महोदयांनी दिलेले आहे. याच मंत्री महोदयांकडे वीज खात्याचाही कारभार असल्यामुळे मी मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, या ठिकाणच्या शेतकऱ्यानी विजेची डीमांड नोट भरलेली असतांना त्यांना कनेक्शन देण्यात आले नाही त्यामुळे यासंदर्भात माननीय मंत्री महोदय, उत्तर देतील काय ?

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, या ठिकाणच्या शेतकऱ्यांना वीज कनेक्शन देण्याच्या संदर्भात चिफ इंजिनिअरला कळविले जाईल. या ठिकाणी इन्फ्रास्ट्रक्चर असेल तर या शेतकऱ्यांना वीज कनेक्शन देण्याची व्यवस्था केली जाईल.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**खामगांव (जि.बुलढाणा) शहर व तालुक्यातील भागात विजेच्या खांबावरुन**
**अनधिकृत केबल टाकणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(२) * ४६७६०   श्री.पांडुरंग फुंडकर , डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलढाणा) शहर व तालुक्यातील भागात विजेच्या खांबावरुन अनधिकृतपणे टाकलेल्या स्थानिक महाराणा केबल नेटवर्कच्या केबल बाबत विधान परिषद सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी दिनांक ०७ फेब्रुवारी, २०१३ रोजी वा त्यासुमारास मा. उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेकडे पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केबल काढण्यासंबंधी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, केबल न काढणाऱ्या व केबल नेटवर्कच्या मालकास प्रोत्साहन देण्याचा गंभीर प्रकार करणाऱ्या महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ कंपनी खामगांव, जि.बुलढाणा येथील अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेंद्र मुळेक, श्री.अजित पवार यांचे करिता:** (१) होय.

(२) खामगाव (जि.बुलढाणा) येथील शहर व तालुक्यातील भागात विजेच्या खांबावरून अनधिकृत टाकलेल्या स्थानिक केबल नेटवर्कच्या केबल काढून टाकण्यात आल्या आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ D/ ST/ पूर्वी श्री.जुन्नरे.. 12:10

ता.प्र.क्र.46760...

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, लेखी उत्तरामध्ये नमूद केलेले आहे की, "खामगाव (जि.बुलढाणा) येथील शहर व तालुक्यातील भागात विजेच्या खांबावरुन अनधिकृत टाकलेल्या स्थानिक केबल नेटवर्कच्या केबल काढून टाकण्यात आल्या आहेत."

सभापती महोदय, मार्च 2013 च्या अर्थसंकल्पीय अधिवेशात मी याच विषयावर लक्षवेधी सूचना दिली होती. त्या लक्षवेधी सूचनेच्या वेळी माननीय उप मुख्यमंत्री महोदयांनी उत्तर दिले होते की, "कार्यकारी अभियंता, खामगाव यांनी संबंधितांना सदर केबल काढून टाकण्याच्या सूचना दिल्या असून त्यानुसार अनधिकृतपणे टाकलेल्या केबल वायर्स पूर्णपणे काढून टाकण्यात आलेल्या आहेत. तसेच खामगाव विभागा अंतर्गत कोणी अशाप्रकारे इलेक्ट्रीक पोलवर केबल वायर्स टाकल्यास किंवा आढळल्यास केबल वायर्स त्वरित काढून संबंधित केबल नेटवर्क मालकाविरुध्द कायद्यानुसार कारवाई करण्याच्या सूचना सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना देण्यात आलेल्या आहेत."

सभापती महोदय, माझा मंत्री महोदयांना पहिला प्रश्न आहे की, ते आपल्या उत्तरावर ठाम आहेत आहे काय ? त्यांना त्यांच्या उत्तरामध्ये काही दुरुस्ती करायची आहे काय ? कारण माननीय उप मुख्यमंत्री महोदयांनी उत्तर दिल्यानंतर वर्तमानपत्रात "एमसीएल खेड्यामध्ये पोहोचविण्यासाठी विद्युत खांबाचा सर्रास वापर" अशी बातमी आली. अधिकारी जे उत्तर लिहून देतात तेच उत्तर माननीय मंत्री महोदय येथे वाचून दाखवितात. तेव्हा माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तरात दुरुस्ती केली नाही तर मला त्यांच्यावर हक्कभंगाचा प्रस्ताव दाखल करावा लागेल. मी त्या तालुक्यामध्ये राहतो. त्या ठिकाणी रोज दौरा करीत असतो. त्या ठिकाणी आजही विजेच्या खांबावर नेटवर्कच्या केबल टाकलेल्या दिसत आहेत. केबल वायर्स काढून टकाण्यात आलेल्या नाहीत. फक्त पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. कार्यकारी अभियंता कारवाई करण्यासंबंधी उप अभियंत्याला पत्र लिहितात, उप अभियंता त्याच्या खालच्या अधिकाऱ्याला तसे पत्र लिहितो. प्रत्येक पत्रामध्ये असे नमूद केलेले असते की, "संदर्भानुसार आपणास कळविण्यात येते की, खामगाव ग्रामीण उप विभागात येणारे गावात विद्युत खांबावरील टीव्ही केबल वायर काढून टाकण्याच्या सूचना संबंधित वितरण केंद्राच्या कनिष्ठ अभियंत्यांना देण्यात आलेल्या आहेत." असे खालचा अधिकारी वरच्या अधिकाऱ्याला लिहून पाठवितो. तो अधिकारी त्याच्या वरच्या अधिकाऱ्याला लिहून पाठवितो. प्रत्यक्षात ही केबल वायर्स काढण्यात आलेली नसते.

..2..

ता.प्र.क्र.46760...

श्री.पांडुरंग फुंडकर..

सभापती महोदय, मी येथे जबाबदारीने सांगतो की, आजही त्या विजेच्या खांबावरील नेटवर्क केबल काढून टाकण्यात आलेल्या नाहीत. त्या तशाच लटकत आहेत. मी आपणाकडे त्याचे फोटो दाखवितो. ज्या अधिकाऱ्यांनी केबल काढण्यास जाणूनबुजून टाळाटाळ केलेली आहे आणि केबल मालकाला पाठीशी घालण्याचा प्रयत्न संगनमताने केलेला आहे, त्या अधिकाऱ्यावर आणि केबल मालकावर शासन काय कारवाई करणार आहे ?

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी मार्च महिन्यात पत्र दिले होते. त्यानुसार कार्यकारी अभियंत्यांना निदेश देण्यात आले होते. सन्माननीय सदस्यांनी जो रुट सांगितला होता त्या मार्गावरील केबल काढण्या संदर्भातील कारवाई करण्यास सांगितले होते. त्या भागातील सर्व केबल्स काढण्यात आलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य नव्याने काही तक्रार करीत आहेत, त्या ठिकाणी नव्याने काही केबल्स दिसत असतील तर...

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी या ठिकाणी असत्य सांगत असेन तर मी माझ्या सदस्यत्वाचा राजीनामा देण्यास तयार आहे. माननीय मंत्री महोदयांनी येथे चुकीचे उत्तर देऊ नये. आजही त्या ठिकाणी नेटवर्क केबल टाकलेली आहे. आजही वर्तमानपत्रात तशा बातम्या येत आहेत.

**सभापती** : मी सन्माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर हे या सदनातील ज्येष्ठ सदस्य आहेत. ते अत्यंत गांभीर्याने आपला मुद्दा पुन्हा पुन्हा मांडत आहेत. आपण दिलेले उत्तर अधिकृत असले तरी त्या उत्तरामध्ये आपणास काही दुरुस्ती करायची आहे काय असे त्यांनी आपणास सुरुवातीलाच विचारले होते. परंतु अशी काही दुरुस्ती करावी लागत नाही असे आपले मत आहे. तेव्हा आपणास त्यांना अचूक उत्तर कसे देता येईल हे आपण पहावे.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर हे या सदनाचे ज्येष्ठ सदस्य आहेत. त्यांनी ज्या रुटचा उल्लेख करुन माझ्याकडे पत्र दिले होते त्या मार्गावरील विजेच्या खांबावरील नेटवर्क केबल्स काढण्याच्या सूचना संबंधितांना दिल्या होत्या. अशा प्रकारची



अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ D/ ST/ पूर्वी श्री.जुन्नरे.. 12:10

ता.प्र.क्र.46760...

श्री.राजेंद्र मुळक...

कारवाई व्हावी अशी आमच्या विभागाची देखील इच्छा आहे. ही बातमी वाचल्यानंतर आमच्या इन्फ्रास्ट्रक्चरवर अशा प्रकारच्या केबल्स दिसत असतील तर त्या काढून टाकण्याच्या

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.46760....

श्री.राजेंद्र मुळक.....

आणि संबंधित एजन्सीवर कारवाई करावी, अशा प्रकारची सूचना अधिकाऱ्यांना देण्यात येईल. या निमित्ताने मी सांगतो की, जे अधिकारी यामध्ये दोषी असतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

श्रीमती शोभा फडणवीस : महोदय, विजेच्या खांबावरुन केबल चालकांनी अनधिकृत केबल्स टाकलेल्या आहेत. अनधिकृत केबल चालकांनी वापरलेल्या विजेचा खर्च सर्वसामान्य माणसाच्या देयकात लावला जातो. त्या भागात 1170 केबल ऑपरेटर आहेत. विभागाच्या माध्यमातून वारंवार सूचना देऊन सुध्दा विजेच्या खांबावरुन केबल काढले जात नसतील तर ते योग्य नाही. वारंवार सूचना देऊन सुध्दा ज्या अधिकाऱ्यांनी अनधिकृत केबल काढले नाहीत त्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल काय ? माझ्या माहितीनुसार त्या भागात 25 केबल ऑपरेटर्स आहेत. त्यांनी 3500 सब केबल ऑपरेटर्स नेमलेले आहेत. त्यांच्याकडून शासनाला करमणूक कर मिळत नाही. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन त्यांच्याकडून करमणूक कर वसूल करण्यात येईल काय, तसेच नंबर दोनचे काम करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल काय ?

श्री.राजेंद्र मुळक : महोदय, ज्या अधिकाऱ्यांनी केबल हटविल्या नाहीत त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई केली जाईल. या ठिकाणी कोणालाही पाठीशी घालण्याचा प्रश्न नाही. आमच्या विभागाच्या इन्फ्रास्ट्रक्चरवरुन ज्यांनी केबल सप्लाय घेतला असेल त्या केबल काढण्याच्या सूचना देण्यात येतील. शिवाय केबल मालकावर जी काही कारवाई करण्याची आवश्यकता आहे ती सुध्दा करण्यात येईल.

महोदय, सन्माननीय सदस्यांनी तेथील केबल ऑपरेटर्सनी सब-केबल ऑपरेटर्स नेमल्याचे सांगितले आहे. मुळात हा विषय या प्रश्नाशी भिन्न आहे. या विषयी तपशीलवार माहिती घेण्यात येईल. करमणूक शुल्क आकारावयाचे असेल किंवा अधिभार लावायचा असेल तर तो नियमानुसार लावण्यात येईल. शिवाय त्यांच्यावर कारवाई करण्याची आवश्यकता असेल तर ती सुध्दा करण्यात येईल.

श्री.चंद्रकांत पाटील : महोदय, विजेच्या खांबावरुन अनधिकृत केबल टाकणाऱ्या केबल ऑपरेटरचे नाव काय आहे ? कनिष्ठ स्तरावरील अधिकारी चुकीचे रिपोर्टींग करतात असे निदर्शनास आल्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांना स्पॉटवर पाठवून त्यांच्याकडून चौकशी करण्यात येईल काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.46760....

श्री.राजेंद्र मुळक : महोदय, त्या केबल ऑपरेटरचे नाव दिलीप किरण पवार आहे. त्याची महाराणा केबल्स नावाची कंपनी आहे. या विषयी आमच्या विभागाने कारवाई केली आहे. आवश्यकता असेल तर मुख्य अभियंता यांना व्यक्तिशः या विषयी माहिती घेण्यास सांगितले जाईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : महोदय, केवळ कागदोपत्री केबल काढून टाकण्याचे आदेश देण्यात आले. परंतु प्रत्यक्षात केबल काढलेले नाही. त्यामुळे मी विचारु इच्छितो की, विधिमंडळाला अशा प्रकारे चुकीची माहिती देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल काय ?

श्री.राजेंद्र मुळक : महोदय, मी मघाशीच सांगितले आहे की, असा प्रकार झाल्याचे आढळल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल. यापुढे आमच्या इन्फ्रास्ट्रक्चरवरुन अशा प्रकारे केबल वाहिनी जाणार नाही हे जाणीवपूर्वक सांगतो. या पुढे असा प्रकार घडला तर कायदेशीररित्या कडक कारवाई केली जाईल.

-------------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**प्रश्नोत्तराच्या यादीतील अनुक्रमांक 3, 55 व 91 हे तारांकित प्रश्न**

**एकत्रित चर्चेला घेण्याबाबत**

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीतील अनुक्रमांक 3, 55 आणि 91 हे तिन्ही प्रश्न एकाच विषयाशी संबंधित आहेत. माझी विनंती आहे की, हे तिन्ही प्रश्न क्लब करुन ते एकत्रितरित्या चर्चेला घेण्यात यावेत.

**सभापती** : मी माननीय मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीतील उपरोक्त अनुक्रमांकाच्या तिन्ही प्रश्नांचा विषय सारखाच असेल तर ते एकत्रितरित्या चर्चेस घेण्यास आपली अनुमती आहे काय ?

श्री.सुरेश शेट्टी : महोदय, उपरोक्त अनुक्रमांकाचे तिन्ही प्रश्न एकत्रितरित्या चर्चेला घेण्यास माझी हरकत नाही.

**सभापती** : ठीक आहे. आता प्रश्नोत्तराच्या यादीतील ता.प्र.क्र.45156, ता.प्र.क्र.46810 आणि ता.प्र.क्र.48160 हे तिन्ही प्रश्न एकत्रितरित्या चर्चेला घेण्यात येतील.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेची योग्य अंमलबजावणी न करणाऱ्या आणि पेशंटची दिशाभूल करणाऱ्या नऊ रुग्णालयांवर कारवाई करण्याबाबत**

**(३) * ४५१५६ श्री.संजय दत्त ,श्री.चरणसिंग सप्रा ,श्री.एम.एम.शेख , श्री. शरद रणपिसे , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.अमरनाथ राजूरकर , श्री.मनीष जैन :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेची योग्य अंमलबजावणी न करणाऱ्या आणि पेशंटची दिशाभूल करणाऱ्या नऊ रुग्णालयांवर राज्यभरात कारवाई करण्यात आली असून राज्यातील एकूण १४ रुग्णालयांवर अकार्यक्षम म्हणून आरोप केल्याचे माहे सप्टेंबर, २०१३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर नऊ रुग्णालयांवर शासनाने केलेल्या कारवाईचा तपशील काय आहे व राज्यातील अनेक रुग्णालये राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेची योग्य अंमलबजावणी करीत नसल्याने, त्यांची चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, दुर्लक्ष करणाऱ्या रुग्णालयांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुरेश शेट्टी :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
४ रुग्णालयांच्या आर्थिक अनियमिततेसाठी निलंबन करण्यात आले होते व यापैकी २ रुग्णालयांनी पूर्तता केल्याने त्यांचे निलंबन रद्द करण्यात आले आहे.
(३) राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेअंतर्गत अंगीकरण ही ऐच्छिक बाब असून त्याबाबत एखाद्या रुग्णालयाने सहभागी होण्यास नकार दिल्यास कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

..5..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यात राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना लागू करण्याबाबत**

**(५५) * ४६८१० डॉ.दीपक सावंत , डॉ.नीलम गोऱ्हे , श्री.विनायक राऊत , ॲड.अनिल परब , श्री.धनंजय मुंडे , श्री.अमरसिंह पंडित , श्री.अनिल भोसले , श्री.विक्रम काळे , श्री.सतीश चव्हाण , श्री.जयवंतराव जाधव , श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सध्या आठ जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येणारी राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना संपूर्ण राज्यात लागू करण्याबाबत माहे ऑक्टोबर, २०१३ च्या दुसऱ्या आठवड्यापासून करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेचा राज्यातील २ कोटी ४ लाख गरीब कुटुंबांना लाभ होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेचे स्वरुप काय आहे व या योजनेवर किती निधी खर्च होण्याची अपेक्षा आहे, त्याची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय,

(४) अद्यापही या योजनेची अंमलबजावणी केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुरेश शेट्टी :** (१) हे अंशत: खरे आहे.

राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना राज्यातील आठ जिल्ह्यांत पहिल्या टप्प्यात दि.२ जुलै, २०१२ पासून कार्यान्वित असून योजनेचा दुसरा टप्पा दि.२१ नोव्हेंबर, २०१३ पासून उर्वरित २७ जिल्ह्यांत लागू करण्यात आलेली आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

राज्यातील सर्व ३५ जिल्ह्यांतील २ कोटी ११ लाख २८ हजार २२७ कुटुंबे या योजनेचे लाभार्थी आहेत.

(३) राज्यातील गरीब व अल्प उत्पन्न गटातील कुटुंबांतील व्यक्तींवर गंभीर आजारपणात मोफत उपचार पुरविण्याकरिता कुटुंबाचा शासनाकडून विमा उतरविला जातो. योजनेतंर्गत अंगीकृत करण्यात आलेल्या रुग्णालयांमधून पात्र लाभार्थी कुटुंबातील व्यक्तींवर ९७१ शस्त्रक्रिया / उपचार पध्दतीस अधीन राहून शस्त्रक्रिया / उपचार केले जातात. पात्र लाभार्थी कुटुंबांस शासनाकडून आरोग्य पत्र नि:शुल्क पुरविले जाते.

योजनेच्या पहिल्या व दुसऱ्या टप्प्याकरीता ३१ मार्च, २०१४ अखेरपर्यंत ५४२ कोटी रु. खर्च अपेक्षित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेबाबत

**(९१) * ४८१६०** **अॅड. निरंजन डावखरे** : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने सुरु केलेली राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना पहिल्या टप्प्यात राज्यातील केवळ आठच जिल्ह्यात सुरु करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, ज्या ठिकाणी ही योजना सुरु करण्यात आली आहे तेथील काही धर्मादाय व खाजगी रुग्णालयांनी या योजनेत सहभागी होण्यास नकार दिला असल्याचे मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांनी सभागृहात उत्तर दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात ही योजना राज्यातील सर्व जिल्ह्यात माहे ऑक्टोबर, २०१३ च्या दुसऱ्या आठवड्यापासून लागू करण्यात येईल, तसेच या योजनेत सहभागी होण्यास नकार दिलेल्या रुग्णालयात शासनामार्फत "आरोग्य मित्र" सल्लागाराची नेमणूक करण्यात येईल, असेही मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांनी दिनांक १४ ऑगस्ट, २०१३ रोजी वा त्या सुमारास जाहीर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, माहे ऑक्टोबर, २०१३ हा महिना संपला तरी सदर योजना राज्यातील उर्वरित जिल्ह्यात अद्याप सुरु करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सर्व जिल्ह्यांमध्ये अद्याप सुरु न होण्याची कारणे काय आहेत,
(६) असल्यास, प्रश्न भाग (५) बाबत व आरोग्य मित्र सल्लागार नेमणुकीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.सुरेश शेट्टी :** (१) सदर योजना दिनांक २१ नोव्हेंबर, २०१३ पासून संपूर्ण राज्यात सुरू झाली आहे.
(२) होय.
(३) दिनांक २१ नोव्हेंबर, २०१३ पासून राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना दुसऱ्या टप्प्यात उर्वरित २७ जिल्ह्यात सुरू करण्यात आली आहे.

बृहन्मुंबईतील धर्मादाय रूग्णालयांचे संगणकाद्वारे संनियंत्रण ऑनलाईन रिअलटाईम सुरू करण्यास तसेच सदर रूग्णालयामध्ये आरोग्य मित्रांची नेमणूक करण्यास दिनांक २२ ऑक्टोबर, २०१३ च्या शासन निर्णयान्वये मंजुरी देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) बृहन्मुंबईतील धर्मादाय रूग्णालयांमध्ये आरोग्य मित्र नियुक्तीबाबतची कार्यवाही सुरू आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.45156, 46810 व 48160......

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, राजीव गांधी जीवनदायी योजना ही अत्यंत महत्त्वाची योजना असून ती लोकाभिमुख योजना आहे. या योजनेची राज्यात अंमलबजावणी सुरु केल्याबद्दल निश्चितपणे माननीय मुख्यमंत्री आणि मंत्री महोदय अभिनंदनास पात्र आहेत. महोदय, या प्रश्नाचा रोख टीकात्मक नसून सकारात्मक आहे. या योजनेची अंमलबजावणी चांगल्याप्रकारे व्हावी, किंबहुना या योजनेतील कमतरता दूर व्हाव्यात हीच हा प्रश्न विचारण्यामागील भूमिका आहे.

महोदय, या योजनेत नमूद केलेले आजार आणि शस्त्रक्रिया करण्याचे पॅकेज प्रॅक्टीकली नाही. उपचाराचे जे दर ठरविलेले आहेत ते कमी आहेत.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**ता.प्र.क्र. 45156, 46810, 48160 ....**</u>

श्री. संजय दत्त ....

काही हॉस्पिटल्स सोडली तर शंभर टक्के रिएम्बर्समेंट हॉस्पिटल्संना मिळत नाही. तसेच, यामध्ये पेपरवर्क खूप करावे लागते. परिणामी, बरीचशी हॉस्पिटल्स या योजनेला जॉईंट करीत नाहीत किंवा जॉईंट केलेली हॉस्पिटल्स सोडण्याच्या मार्गावर आहेत. माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, योजनेमध्ये असणाऱ्या कमतरता दूर करण्यासाठी शासन काय करणार आहे ? गोरगरिबांना या योजनेचा फायदा मिळावा, ही निश्चितच सर्वांची भावना आहे. त्यामुळे या योजनेचे कवरेज वाढवावे. जेणेकरून, जास्तीत जास्त लोकांना या योजनेचा फायदा मिळेल. अजून जास्त हॉस्पिटल्स या योजनेमध्ये यावीत यासाठी शासन कोणते प्रयत्न करणार आहे, तसेच, या योजनेशी संबंधित अनियमिततेमध्ये काही जण सापडलेले आहेत, त्यापासून धडा घेऊन पुढे तसे रिपिट होऊ नये याबाबत शासन काय करणार आहे ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदयांनी विचारलेले प्रश्न मूळ प्रश्नाशी संबंधित नाहीत. मूळ प्रश्न वेगळा आहे. सन्माननीय सदस्यांनी जनरल प्रश्न विचारले असले तरी मी उत्तर देतो.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, मूळ प्रश्नाशी संबंधित नाहीत म्हणजे काय ? आम्ही योजनेसंबंधी प्रश्न विचारले की क्रिकेट मॅचबद्दल प्रश्न विचारले ? आम्ही योजनेसंबंधीच प्रश्न विचारले आहेत.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जास्त रागवू नये. सन्माननीय सदस्यांचा प्रश्न कम्प्लेंट संदर्भात होता. किती हॉस्पिटल्स डिसइमपॅनेल केली आहेत, या संदर्भातही प्रश्न विचारला आहे. आपल्या प्रश्नांना उत्तर देण्याचा मी प्रयत्न करतो. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, जी हॉस्पिटल्स इमपॅनेल झाली आहेत त्यांना आपण प्रत्येक प्रोसिजरसाठी फिक्स केलेले रेट फार कमी आहेत.

सभापती महोदय, आपण योजना राबविण्याचा निर्णय घेतला. टेंडर काढण्याच्या अगोदर डॉक्टरांची एक उच्चस्तरीय समिती नेमली. त्या समितीमध्ये वैद्यकीय शिक्षण खात्याचे डॉक्टर्स, जेजे हॉस्पिटल आणि दुसरे हॉस्पिटल यांचे डॉक्टर्स, मुंबई मनपाच्या हॉस्पिटल्सचे एक्सपर्ट होते.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>ता.प्र.क्र. 45156, 46810, 48160 ....</u>**

श्री. सुरेश शेट्टी ....

प्रायव्हेट हॉस्पिटलच्या स्पेशॅलिस्ट डॉक्टर्संचाही त्यामध्ये सहयोग होता. केरळमध्ये किती रेट देतात, तामिळनाडूमध्ये किती रेट देतात, आंध्रप्रदेशमध्ये किती रेट देतात, ते सर्व रिपोर्ट तपासून सर्वांनी मिळून 972 सर्जरीसाठी एक पॅकेज तयार केले आणि ते रेट टेंडरमध्ये दिले होते. काही लोकांचे म्हणणे आहे की, रेट कमी आहेत, काही लोकांचे म्हणणे आहे की, रेट जास्त आहेत.

सभापती महोदय, आता बेसिक मुद्दा असा उपस्थित होतो की, आपण जे रेट ठरविले आहेत त्या रेटमध्ये राज्यातील खाजगी हॉस्पिटल्स काम करू शकतात का ? शासकीय रूग्णालयांचा संबंध येत नाही. कारण त्यांना आपण पैसे देतो. आपण शासकीय रूग्णालयांमध्ये बीपीएलसाठी ऑपरेशन फ्री करीत होतो. आता 1 लाख रूपये उत्पन्न मर्यादेपर्यंतच्या रूग्णांचे ऑपरेशन करतो आणि सोसायटीमार्फत शासकीय हॉस्पिटल्सना पैसे देतो. आता 33 ते 35 टक्के क्लेम झाले आहेत, ते पैसे शासकीय हॉस्पिटल्स आणि मनपाच्या हॉस्पिटल्सकडे गेले आहेत. आता प्रश्न खाजगी रूग्णालयांचा उद्‌भवतो. जुन्या जीवनदायी योजनेमध्ये सिव्हिल सर्जन डीडी सॅंक्शन करायचे. प्रत्येक हॉस्पिटलमध्ये प्रत्येक विभागात त्याच प्रोसिजरचे वेगवेगळे रेट होते. आता आपण एकच नियम ठरविला आहे. केंद्र सरकारने आता एन्जिओप्लास्टीचे रेट 60 हजार रूपये ठरविले आहेत. आपण एन्जिओप्लास्टीसाठी 60 हजार रूपये जाहीर केल्यानंतर केंद्र शासनाने त्यासाठी 60 हजार रूपये ठरविले. प्रत्येक अधिवेशनात सन्माननीय सदस्य स्टेंटचा मुद्दा चर्चेला आणतात. सुरूवातीला स्टेंटचे 40 हजार रूपये होते, मात्र 50 हजार रूपये लावायचे. आता सुध्दा काही लोक शासकीय हॉस्पिटलमध्ये खाजगी लाभार्थ्यासाठी स्टेंटसाठी 1 लाख 10 हजार रूपये लावतात. केंद्र सरकारने सांगितले आहे की, ड्रग ॲल्युडिंग स्टेंटला 25 हजार रूपयांपेक्षा एक रूपयाही जास्त द्यायचा नाही आणि ऑर्डीनरी स्टेंटला 10 ते 15 हजार रूपये द्यायचे. काही रूग्णालयांना जास्त पैसे पाहिजे असतील तर या योजनेत त्यांचा समावेश नको. हॉस्पिटल्स इमपॅनेल करण्याच्या बाबत मर्यादा आहे. ज्यांना इंटरेस्ट नाही त्यांना आम्ही हात जोडून सांगतो की, तुम्ही येऊ नका. कारण आमच्याकडे खूप हॉस्पिटल्स आहेत.

( नंतर श्री. खंदारे ....

अशुध्दित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

NTK/ D/ ST/ पूर्वी श्री.कांबळे 12:25

ता.प्र.क्र.45156, 46810 व 48160.... श्री.सुरेश शेट्टी....

परंतु आंध्र प्रदेश सरकारने एक वर्षानंतर दराचा आढावा घेतला होता. ही नवीन योजना आहे. आतापर्यंत 8 जिल्ह्यांमध्ये एकूण 1 लाख 15 हजार शस्त्रक्रिया झालेल्या आहेत. ते पैसे पुढील वर्षी रिव्हू करण्यात येतील. त्यामुळे सन्माननीय सदस्यांवर त्याचे निश्चितच प्रेशर येणार आहे. जुन्या जीवनदायी योजनेमध्ये 1.5 लाख रुपये मिळत होते त्याऐवजी 60-70 हजार रुपये मिळणार आहेत. अनेक लोक आमदारांकडे जाऊन आम्हाला हे परवडत नाही, खूप पेपर वर्क आहे असे सांगत असतात. मी सर्व सन्माननीय सदस्यांना माहिती देऊ इच्छितो की, या विभागाच्या वरळी येथील नियंत्रण कक्षामध्ये आपण यावे. कॉल सेंटरमध्ये यावे, ही पेपरलेस स्कीम आहे. ऑन लाईन डायग्नोसिस केले जाते. लाईन ऑफ ॲक्शनला ॲप्रूव्हल घेतले जाते. कोठेही धावपळ करण्याची गरज नाही, सिव्हील सर्जनकडे जाण्याची गरज नाही. डायरेक्टरकडे जाण्याची, मंत्र्यांकडे जाण्याची गरज नाही. इतकी ही सोपी योजना आहे, तरीही लोकांना त्याची अडचण वाटत आहे. नवीन योजना असल्यामुळे सुरुवातीला काही अडचणी येतात. मी काल आमच्या अधिकाऱ्यांची व नागपूर येथील रुग्णालयांच्या अधिकाऱ्यांची बैठक घेतली आहे. त्यांना आम्ही सांगण्याचा प्रयत्न करीत आहोत. जे पेशन्टस् इम्पॅनल हॉस्पिटल्समध्ये येणार आहेत, जे रुग्ण इम्पॅनल होणार नाहीत त्यांचेच नुकसान होणार आहे. अल्टिमेटली त्यांची फ्री शस्त्रक्रिया करतो. त्यांना कमी पैसे दिले जातात हे मला मान्य आहे. शासनाचा मूळ हेतू असा आहे की, या रुग्णालयांमध्ये केवळ 2 शस्त्रक्रिया केल्या जातात, दिवसातून 10 तास ऑपरेशन थिएटर बंद असते, त्यामुळे त्यांनी 10 शस्त्रक्रिया कराव्यात, 24 तास ओ.टी.वापरावे. त्यातून त्यांनी कमी नफा मिळवावा, पण जास्त लोकांची मदत करावी अशी ही योजना आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, ज्यांना या योजनेत सामील व्हायचे आहे त्यांनी व्हावे, ज्यांना नको असेल त्यांनी सामील होऊ नये असे मंत्री महोदयांनी सरळ सांगून टाकले आहे. या योजनेमागचा शासनाचा एक उदात्त हेतू असा होता की, जे गरीब लोक आहेत ते या पंचतारांकित हॉस्पिटलमध्ये उपचार करण्यासाठी पात्र ठरावेत. परंतु मंत्री महोदयांच्या आजच्या स्टेटमेण्टमुळे बेसिक हेतूलाच छेद दिला जात आहे असे माझे मत आहे. हे गरीब नागरिक या भारतात, या राज्यात राहत असल्यामुळे त्यांना सुध्दा हिंदुजामध्ये, नानावटी, नागपूरच्या लाईफ केअर

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/

ता.प्र.क्र.45156, 46810 व 48160....                         डॉ.दीपक सावंत.....

हॉस्पिटलमध्ये उपचार केला पाहिजे असे वाटत असते. ही योजना राज्य शासनाची आहे. आज लोकमत या दैनिकामध्ये एक बातमी आलेली आहे. त्यामध्ये या योजनेचे तीन तेरा वाजल्याची ही बातमी आहे. हे दैनिक कोणाचे आहे हे सर्वांना माहीत आहे. शासनाने या हॉस्पिटल्सचे वर्गीकरण केले आहे हे खरे आहे का ? अ गटातील हॉस्पिटल्सना 100 टक्के रिफण्ड दिला जातो, ब गटातील हॉस्पिटल्सना 75 टक्के देतो. मल्टि स्पेशॅलिटी हॉस्टिल्सला ही स्कीम लागू आहे, सिंगल स्पेशॅलिटी हॉस्पिटलला लागू नाही. हे खरे आहे काय ? शासकीय रुग्णालयामध्ये स्टेण्टची योजना चांगल्या प्रकारे सुरु आहे. कारण शासकीय रुग्णालयामधील ओव्हरहेड एक्सपेंडिचर हा राज्य शासन करीत असते. तेथील कर्मचारी वर्ग, नर्सिंग स्टाफ, प्रशासकीय कर्मचारी वर्ग, लाईट बिल यावरील सर्व खर्च शासनाकडून केला जातो. खाजगी रुग्णालयावर या सर्व खर्चाचा बोजा पडत असतो. 4 पेशण्टचे 5 पेशण्ट झाले तर खर्च वाढतो. त्यामुळे त्यांना ते परवडत नाही असे त्यांचे म्हणणे आहे. आम्हाला पैसे वेळवर मिळत नाहीत अशी सर्व रुग्णालयांची तक्रार आहे. याबाबत शासन कोणती उपाययोजना करणार आहे ?

श्री.सुरेश शेट्टी : प्रत्येक हॉस्पिटल्सचे ए, बी, सी असे ग्रेडेशन केले जाते हे खरे आहे. प्रत्येक ग्रेडसाठी काही निकष तयार केलेले आहेत. त्या हॉस्पिटलमध्ये किती बेड असावेत, शस्त्रक्रियांची साधने किती आहेत, मनुष्यबळ किती आहे, किती व कशा सुविधा आहेत, मेडिकल प्रोटोकॉल फॉलो केला जातो का हे सर्व निकष ठरविले असून ते ऑनलाईनवर आहेत. इन्सपेक्शन टीम जाते त्यांच्या निरीक्षणानुसार ग्रेड ठरविली जाते.

नंतर श्री.शिगम.......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ ST/ 12:30

ता.प्र.क्र.45156, 46810 व 48160.... श्री. सुरेश शेट्टी...

सिंगल स्पेशॅलिटी हॉस्पिट असेल, पिडिॲट्रीक्स असेल, नेफ्रॉलाजी असेल, कॅन्सर असेल, ऑफ्थल्मॉलॉजी असेल यांना आपण इम्पॅनल्ड करतो आणि शंभर टक्के प्रतिपूर्ती करतो. काही ठिकाणी कार्डियाक सुपरस्पेशॅलिटी असेल आणि अँकॉलॉजी असेल आणि त्यांच्याकडे सर्व प्रकारची इक्विपमेंटस आणि डॉक्टर्स असतील तर त्यांना आपण शंभर टक्के प्रतिपूर्ती करतो. परंतु काही "बी" ग्रेडची देखील हॉस्पिटल्स असतात. बुलढाणा जिल्हयातील सन्माननीय सदस्यांनी अशी मागणी केली की, यामध्ये 50 बेडच्या हॉस्पिटल बरोबर 30 बेडच्या हॉस्पिटलचा देखील समावेश करावा. आता बुलढाणा जिल्ह्यामध्ये 50 बेडचे एकच हॉस्पिटल आहे. 200 बेडचे खाजगी हॉस्पिटल नाही. तीच परिस्थिती गडचिरोली आणि नंदूरबार या जिल्ह्यांची आहे. म्हणून 50 ऐवजी 30 बेडच्या हॉस्पिटलचा समावेश करण्याचा निर्णय आम्ही घेतला. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांना देखील 30 बेडच्या हॉस्पिटलमध्ये काय इक्विपमेण्टस् असतील, काय मॅनपॉवर असेल, काय मेडिकल प्रोटोकॉल असेल हे माहीत आहे. 30बेडच्या हॉस्पिटलमध्ये छोटी-मोठी ऑपरेशन्स होतात. त्या ठिकाणी मेजर ऑपरेशन्स होत नाहीत. ती हॉस्पिटल्स देखील आम्हाला शंभर टक्के प्रतिपूर्ती पाहिजे असे सांगतात. पण ते शक्य नाही. जेथे क्वॉलिटी सर्जरी होते अशा हॉस्पिटल्सना आपण शंभर टक्के प्रतिपूर्ती करतो. मिरा-भाईंदर येथे एक हजार बेडचे हॉस्पिटल आहे. ते हॉस्पिटल इम्पॅनल करुन घेण्यात आलेले आहे. त्या हॉस्पिटलमध्ये मुंबई उपनगर आणि पालघर मधील रुग्ण येतात. ते त्या हॉस्पिटलमध्ये ऑपरेशन करु शकतात. सेव्हन हिल्स हॉस्पिटमध्ये धुळे, नांदेड, सोलापूर येथून रुग्ण येतात. त्याठिकाणी चांगले कार्डियाक युनिट आहे. हिंदुजा, लिलावती अशी चांगली हॉस्पिटल्स आहेत. पण आम्ही कोणाला जबरदस्ती करु शकत नाही. परंतु जी चांगली हॉस्पिटल्स आहेत त्यांना इम्पॅनल करण्यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत. आता जी काही हॉस्पिटल्स इम्पॅनल्ड झालेली आहेत त्यामध्ये देखील चांगली हॉस्पिटल्स आहेत. कोणत्याही जिल्हयातील रुग्ण कोणत्याही जिल्ह्यातील हॉस्पिटलमध्ये जाऊन ऑपरेशन करुन घेऊ शकतो. नागपूरमधील सव्वालाख लहान मुलांचे कार्डिॲक्टचे ऑपरेशन मुंबईतील जे.जे. हॉस्पिटलमध्ये करण्यात आले. त्या लहान मुलांबरोबर त्यांच्या कुटंबीयांना देखील आणले होते. त्याचप्रमाणे सोलापूरचे रुग्ण मुंबईला येतात किंवा पुण्याला जातात. या योजनेमध्ये आपल्या पसंतीच्या हॉस्पिटलमध्ये जाऊन रुग्ण ऑपरेशन करुन घेऊ शकतो.

..2..

MSS/ D/ ST/ 12:30

ता.प्र.क्र.45156, 46810 व 48160....

श्री. निरंजन डावखरे : मी प्रथम शासनाचे आणि मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. ही अतिशय लोकाभिमुख अशी योजना सुरु केलेली आहे तिचा उपयोग लोकांना व्हावा या दृष्टीने सन्माननीय सदस्य या योजनेबाबत सूचना करीत आहेत. माझ्या प्रश्नाला उत्तर देताना आपण सांगितले की या योजनेमध्ये मोठी हॉस्पिटल्स येत नाहीत. ज्यांना शासनाने सबसिडी दिलेली आहे, वेगवेगळया सवलती दिलेल्या आहेत आणि जी या योजनेमध्ये सहभागी होऊ इच्छित नाहीत अशा हॉस्पिटल्सवर आपण कारवाई करणार आहात काय ? ब-याचशा हेल्प लाईन्स प्रसार माध्यमांद्वारे आणि वृत्तपत्राच्या माध्यमातून दिलेल्या असल्या तरी त्या हेल्प लाईन्स सुरु नाहीत. उदा. सिव्हिल हॉस्पिटलचा मोबाईल क्रमांक 8275089108, त्याच बरोबर सूरज हॉस्पिटल आणि शुश्रूषा हार्ट केअर सेंटर, ठाणे यांचे जे नंबर दिलेले आहेत त्या नंबरवर फोन केला तर नो-रिस्पॉन्स येतो. ठाण्याच्या मिलेनियम हॉस्पिटलमध्ये ही योजना लागू आहे. परंतु या योजनेशी आमचा काही संबंध नाही असे मिलेनियम हॉस्पिटल सांगते. अशा हॉस्पिटलवर आपण कारवाई करणार काय ? तसेच ज्या हेल्प लाईन्स बंद आहेत त्या सुरु करण्यात येतील काय ? प्रश्न क्रमांक 3च्या संदर्भात असे उत्तर देण्यात आलेले आहे की, 22 ऑक्टोबर 2003च्या शासन निर्णयाद्वारे आरोग्य मित्र मंजूर केलेले आहेत. आरोग्य मित्र लोकांना उपलब्ध होत नाहीत आणि त्यांच्याकडून योग्य ती माहिती मिळत नाही. म्हणून अधिक आरोग्य मित्र नेमून त्यांची नावे प्रसार माध्यामाच्या द्वारे, वृत्तपत्राच्या द्वारे प्रसिध्द करण्यात येतील काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सन्माननीय सदस्यांनी तीन प्रश्न विचारले. त्यांचा पहिला प्रश्न हेल्प लाईन संबंधी आहे. मुंबईमधील हेल्पलाईन 10 डिजिटसच्या आहेत. पूर्वी 8 जिल्ह्यातून कॉल्स येत होते. आता संपूर्ण राज्यातून कॉल्स येण्यास सुरुवात झालेली आहे. कॉल्सची संख्या खूप वाढलेली आहे. कॉल सेंटर अपग्रेड करण्याचे काम चालू आहे. हे काम 10-15 दिवसात पूर्ण होईल.

सन्माननीय सदस्यांनी मिलेनियम हॉस्पिटलचा उल्लेख केला. मिलेनियम हॉस्पिटलने इम्पॅनलमेण्ट रिक्वेस्ट आमच्याकडे पाठविली होती.

...नंतर श्री. गिते...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ ST/ प्रथम श्री.शिगम 12:35

ता.प्र.क्र.45156,46810,48160.....

श्री.सुरेश शेट्टी...

त्यांना आपण इम्पॅनल केले होते, परंतु त्यांना वारंवार सांगूनही ते आपल्या चुका सुधारत नव्हते. म्हणून ठाण्याचे मिलेनियम हॉस्पिटला डीसइम्पॅनल्ड केले. या ठिकाणी आरोग्य मित्रासंबंधी प्रश्न विचारण्यात आले, प्रत्येक हॉस्पिटलमध्ये आपण आरोग्य मित्रांना बेसिक ट्रेनिंग देऊन बसवित आहोत. परंतु आता असे झाले आहे की, ज्या हॉस्पिटलमध्ये रुग्ण जास्त संख्येने जातात त्यासंदर्भात आम्ही असा निर्णय घेतला आहे की, 1 आरोग्य मित्रा ऐवजी 2 आरोग्य मित्र बसविणार आहोत. आरोग्य मित्रांची नावे प्रसिध्द केली तर ते खूप अडचणीचे होईल. परंतु प्रत्येक हॉस्पिटलला आरोग्य मित्रासाठी स्वतंत्र डेस्क निर्माण केले तर सोयीचे होईल. जीवनदायी योजनेसाठी प्रत्येक हॉस्पिटलला रजिस्टर डेस्क स्वतंत्र निर्माण केलेले आहेत. मुंबईत सेवन हिल्स, जे.जे हॉस्पिटल, के.एम.हॉस्पिटल, नायर हॉस्पिटल येथे जास्त आरोग्य मित्र नेमण्याची प्रोसेस आम्ही सुरु केलेली आहे.

प्रा. सुरेश नवले : ही योजना दिनांक 1 एप्रिल, 2013 पूर्वीचे रेशन कार्ड ज्यांच्याकडे आहेत, त्यांनाच लागू आहे काय, या योजनेच्या नियमावलीत काही बदल केलेला आहे काय ?

श्री.सुरेश शेट्टी : आम्ही ही योजना राबविण्याचा निर्णय घेतला त्यावेळी अन्न व नागरी पुरवठा विभागाकडे रेशनकार्डचा जो डेटा होता, तो घेतलेला आहे. पांढरे रेशन कार्ड सोडून इतर रेशनकार्डचा डेटा आम्ही आमच्या सर्व्हरमध्ये फीड केलेला आहे. अन्न व नागरी पुरवठा विभागामध्ये दिनांक 1 एप्रिल, 2013 पर्यंत डेटा उपलब्ध होता, तो संपूर्ण डेटा आमच्या सर्व्हरमध्ये फीड करण्यात आलेला आहे. त्या डेटातील सर्व कार्डधारकांना या योजनेचा लाभ देण्यात येत आहे. या योजनेच्या नियमावलीत काहीही बदल करण्यात आलेले नाहीत. सध्या कार्ड वाटप करण्याचे काम आम्ही सुरु केलेले आहे, ई सेवा केद्र, संग्राम केंद्र आणि दिनांक 15 एप्रिल, 2013 पासून 12 हजार पोस्ट ऑफिसेस आहेत तेथे कार्ड उपलब्ध होणार आहेत. मी आपल्याला सांगू इच्छितो की, ते कार्ड नसले तरी रेशन कार्ड दाखवून ते लोक या योजनेचा लाभ घेऊ शकतात. जे कार्ड जुने आहेत, त्या कार्डवर कार्डधारकांची नावे दिसून येत नाही. काही लोकांनी कार्ड घरात ठेवून दिले होते, ते कार्ड वापरत नव्हते. त्या लोकांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी कार्ड बाहेर काढले. ग्रामीण व शहरी भागासाठी नवीन जी.आर.काढलेला आहे. ग्रामीण आणि

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.45156,46810,48160..... श्री.सुरेश शेट्टी....

शहरी भागात पाच ते सहा लोकांना कॉम्पीटंट ॲथॉरिटी म्हणून नेमले आहेत. यात तहसीलदार, इतर राजपत्रित अधिकारी नेमले आहेत. रेशन कार्ड रेक्टीफाय करुन ते त्यांना योजनेसंबंधी कार्ड उपलब्ध करुन देतील.

श्री.चंद्रकांत पाटील : शासनाने आपल्या उत्तरात असे म्हटले आहे की, या योजनेचा लाभ देण्यासाठी चांगल्या हॉस्पिटलला आम्ही आवाहन करु शकतो, परंतु त्यांना सक्ती करु शकत नाही. मला वाटते की, या राज्यात सामान्य माणसाला आवश्यक असलेल्या सुविधा देण्यासाठी या मोठया रुग्णालयांना सक्ती करावी लागेल. तशी सक्ती त्या रुग्णालयांना करण्यात येईल काय, पेशंटवर उपचार करण्यासाठी काही रक्क्म शासन देणार आहे, परंतु प्रत्यक्षात जो खर्च झाला असेल त्यातील जादा झालेला खर्च तो पेशंट देण्यास तयार असेल तर त्या बाबतीत काही व्हाया मेडिया काढता येऊ शकतो काय ? यात 971 आजारांचा समावेश केलेला आहे, पॅरिलिसेस सारखा जो खूप कॉमन आजार आहे, तसेच इतरही कॉमन आजार आहेत, त्या आजारांचा या योजनेत समावेश करण्यात येईल काय?

श्री.सुरेश शेट्टी : मी सभागृहाला सांगू इच्छितो की, आपल्या राज्यात आरोग्याच्या बाबतीत दोन प्रकारच्या योजना आहेत. राजीव गांधी जीवनदायी योजना ज्या धर्मादाय हॉस्पिटलना शासनाने जमीन, वीज,पाणी, कस्टम डयूटी, सेल टॅक्स त्यांच्या बाबतीत सेपरेट अहवाल करतो, अशा प्रकारच्या ज्या रुग्णालयांनी घेतलेल्या आहेत, त्यांना आर्थिकदृष्टया कमकुवत घटकातील रुग्णांसाठी 20 खाटा आरक्षित ठेवाव्याच लागतात. जीवनदायी योजनेसाठी पूर्वी 50 हजार रुपयांची मदत देण्यात येत होती, त्यात वाढ करुन ती रक्कम 1 लाख रुपये करण्यात आली आहे.

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ ST/ 12:40

ता.प्र.क्र.45156,46810, 48160.......... श्री.सुरेश शेट्टी......

आता मुंबईतील सर्व हॉस्पिटल्सची आपण तपासणी केली आहे. त्यातील 11 हॉस्पिटल्स लोकांना लाभ देत असल्याचे आढळून आले आहे, इतर देत नाहीत. पुण्यामधील संख्या बरी आहे. पुण्यातील चार हॉस्पिटल्सवर चॅरिटी कमिशनर यांनी कारवाई केली आहे. पुण्यामधील लोकप्रतिनिधी जेवढा रस घेऊन काम करतात, प्रत्येक हॉस्पिटलवर लक्ष ठेवून काम करीत आहेत तसे मुंबईच्या आमदारांनी केले तर खूप लोकांना फायदा होईल. ज्या कॉम्प्लिकेटेड केसेस आहेत त्या चॅरिटी हॉस्पिटलमध्ये योजनेंतर्गत पाठविल्या आहेत आणि इतर सर्वांना राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेमध्ये कव्हर करु शकतो.

सभापती महोदय, माननीय सदस्यांनी सांगितले की, पेशंटकडून ॲडिशनल पैसे घेण्यात यावे. मूळ प्रश्नाच्या अनुषंगाने सांगू इच्छितो की, एका रुग्णालयाने प्रि ऑथोरायझेशन 35 हजार रुपये प्रोसेससाठी घेतले आणि प्रोसेस केली नाही. दुसऱ्या रुग्णालयाने प्रि ऑथोरायझेशन 30 हजार रुपये प्रोसेससाठी घेतले आणि प्रोसेस केली नाही. सुश्रुषा आणि झेनिथ या रुग्णालयांनी ऑपरेशन केले नाही. पैसे घेतले आणि बॅण्डेज बांधून पेशंटला घरी पाठविले. या चारही रुग्णालयांवर कारवाई केली आहे. 1 लाख रुपये राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेतून दिले जातात. उर्वरित रक्कम पेशंटकडून घ्यायची असा निर्णय झाला तर योजना असफल होईल. पेशंटकडून भरपूर पैसे उकळले जातील. जून्या जीवनदायी आरोग्य योजनेचे जे झाले तेच नवीन जीवनदायी आरोग्य योजनेमध्ये घडेल अशी मला शंका वाटते.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, महाराष्ट्रातील किती रुग्णालयांना रिइम्बर्समेंट दिले गेले आहे? स्टेंटकरिता 15 हजार रुपये मिळतात. आज मेडिकेटेड स्टेंटची गरज आहे. त्याची किंमत वाढवून देणे व्यवहार्य आहे. ज्यांना स्टेंट बसवायचा आहे किंवा अँजिओग्राफी करायची आहे त्यांची अपेक्षा असते की, आपले आयुष्य आणखी 5 ते 10 वर्षे वाढावे. थोडे अधिक पैसे दिले गेले तर जास्त लोकांना फायदा मिळू शकतो. यासाठी स्टेंटची किंमत वाढवून देणार आहात काय?

सभापती महोदय, केसरी कार्ड संदर्भातील निर्णय अन्न व नागरी पुरवठा विभागाकडून घेतला जातो की आरोग्य विभागाकडून घेतला जातो? ते कार्ड खरे आहे की बोगस आहे हे कोण निश्चित करणार आहे? नागपूर येथे शकुंतला भगत केस समोर आली आहे. नेमका लाभार्थी कोण आहे हे कोण ठरविणार आहे? आरोग्य दूत कोणाकडून नेमण्यात येतात?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.45156, 46810, 48160..........

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, शेवटच्या प्रश्नाचे प्रथम उत्तर देऊ इच्छितो. माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी केसरी कार्डबाबत प्रश्न विचारला आहे. केशरी कार्ड देण्याबाबतचा निर्णय अन्न व नागरी पुरवठा विभागाकडून घेतला जातो. अन्न व नागरी पुरवठा विभागातील शिधापत्रिकासंबंधीचे संपूर्ण राज्याचे डिजिटायझेशनचे काम केंद्र सरकारच्या एनआयसी या संस्थेकडून झालेले आहे. आम्ही एनआयसी या संस्थेकडून डेटा गोळा केला आहे. त्यांच्याकडून व्हेरिफिकेशनचे काम सुरु असून 3 ते 4 जिल्हयांचे व्हेरिफिकेशन पूर्ण झाले आहे. व्हेरिफिकेशन करताना 10 ते 15 वर्षापूर्वी इश्यू केलेल्या शिधापत्रिका असल्यामुळे लाभार्थी निकषामध्ये बसतो की नाही हे ते व्हेरिफाय करतात. अन्यथा व्हेरिफिकेशनमधून नाव काढण्याची प्रक्रिया सुरु होते. ती प्रक्रिया झाल्यानंतर म्हणजे व्हेरिफिकेशननंतर डेटा येईल, तो आमच्या सर्व्हरवर घेणार आहोत. त्यानुसार लाभार्थी ठरविणार आहोत. शकुंतला भगत केसबद्दल सांगितले आहे. त्यांच्याकडे केशरी कार्ड होते. केशरी कार्ड घेऊन आल्यानंतर ट्रिटमेंट दिली जाते.

नंतर 2इ.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.45156, 46810, 48160....

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझ्या माहिती प्रमाणे ती केशरी कार्डासाठी पात्र नव्हती.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, आता अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या मार्फत व्हेरिफिकेशन सुरू आहे. त्यात त्यांना आढळून आहे की, ही केस त्यात बसत नाही तर मग नक्की तिला अपात्र ठरविण्यात येईल. येथे दुसरा प्रश्न क्लेम विषयी विचारण्यात आला आहे. ऑनलाईन सिस्टीमद्वारे मुख्यालयाला क्लेम सादर केल्या नंतर 15 दिवसामध्ये पेमेंट करण्यात येते. क्लेम वेळेत नाही आला तर पेमेंट मिळण्यास विलंब लागतो. 2 जुलै 2012 ते 1 जुलै 2013 या कालावधीमध्ये एकूण 72540 शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. या शस्त्रक्रियांसाठी एकूण रूपये 197कोटी इतका खर्च आला आहे. या शस्त्रक्रियांसाठी आपण 167 कोटी रूपयांचा प्रीमियम भरलेला आहे. म्हणजे पहिल्या टप्प्यामध्ये विमा कंपन्यांचे 30 कोटी रूपयांचे नुकसान झाले आहे. जुलै 2013 पासून 15 डिसेंबर 2013 पर्यंत 249 शस्त्रक्रिया करण्यात आल्या असून यासाठी 95 कोटींचा खर्च आला आहे. त्यासाठी आपण रूपये 87.19 इतक्या रकमेचा प्रीमियम दिलेला आहे. आम्ही प्रीमियम पोटी रूपये 690 कोटी भरलेले आहेत. ऑनलाईन सिस्टीमद्वारा क्लेम पाठविल्यानंतर सर्व रूग्णालयांना इलेक्ट्रॉनिक सिस्टीमद्वारा 15 दिवसात पेमेंट करण्यात येते. जुन्या जीवनदायी योजनेच्या वेळी सहा महिने ते एक वर्षाचा कालावधी पेमेंट मिळण्यासाठी लागत होता. तेव्हा आपली बजेट प्रोव्हीजन 60 ते 80 कोटी रूपये असायची. आपली तरतूद संपल्यानंतर पुढील आर्थिक वर्षात पैसे देत होतो. आता इलेक्ट्रॉनिक पेमेंट सिस्टीम सुरू केली असल्यामुळे 15 दिवसामध्ये ती रक्कम त्यांच्या खात्यामध्ये जमा होत आहे. जीवनदायी आरोग्य मित्र विमा कंपनी नेमते. त्यांचे ट्रेनिंग मॅन्युअल व सुपरव्हिजन आम्ही करतो.

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना ही क्रांतिकारी योजना आहे. येथे सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त व डॉ.दीपक सावंत यांनी महत्त्वाचा प्रश्न विचारला आहे. गरीब रूग्णांसाठी ही फायदेशीर योजना आहे. सदर योजना राज्यातील सर्व खाजगी रूग्णालयांमध्ये बंधनकारक केली पाहिजे. यासाठी शासन कायदेशीर कारवाई करण्यासाठी एखादा कायदा तयार करणार आहे काय ? ..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.45156, 46810, 48160....

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी खाजगी रूग्णालयांवर सदर योजना राबविण्याचे कम्पलशन करावे असा जो मुद्दा मांडला आहे तो मला तपासून घ्यावा लागेल.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी सविस्तर उत्तर दिल्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. मी येथे एकच स्पेसिफिक मुद्दा मांडणार आहे. जी खाजगी रूग्णालये धर्मादाय खाली नोंदणीकृत झाली आहेत अशा रूग्णालयातील 10टक्के खाटा या गरीब रूग्णांसाठी राखून ठेवणे आवश्यक असताना त्याची अंमलबजावणी होत नाही. यासंबंधी सभागृहात चर्चा देखील झालेली आहे. त्यावर कारवाई देखील होत नाही. याची अंमलबजावणी करण्यासाठी शासन आरोग्य विभागाला नोडल एजन्सी म्हणून नियुक्त करणार आहे काय जेणेकरून त्यात समन्वय होईल. या योजनेची अंमलबजावणी फक्त धर्मादाय आयुक्तांमार्फत होत आहे.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी महत्त्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे. एक वर्षापूर्वी दोन्ही सदनात या संबंधी चर्चा झाली होती. त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी यासंबंधी बैठक घेण्यात येईल असे विधान सभेत आश्वासन दिले होते. त्यानुसार त्यांनी बैठक घेतली व मुख्य सचिवांना मॉनेटरींग करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर 2-3 बैठका झाल्या. मुंबई आणि पुण्यातील काही रूग्णालयांचे इन्स्पेक्शन करण्यात आले. त्यात काय आढळून आले याचा रिपोर्ट आपल्या समोर आहे. हायकोर्टाने मॉनेटरींग कमिटी नेमण्यास सांगितले होते. या मॉनेटरींग कमिटीचे अध्यक्ष, अप्पर मुख्य सचिव, आरोग्य हे होते. या समितीमध्ये सदस्य म्हणून चॅरिटी कमिशनर तसेच, खाजगी रूग्णालयातील सदस्य देखील होते.

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. 45156, 46810, 48160....**

श्री. सुरेश शेट्टी ....
राजीव गांधी जीवनदायी योजनेत आपण प्रत्येक हॉस्पिटलमध्ये जे सॉफ्टवेअर दिले आहे ते सेम सॉफ्टवेअर चॅरीटी कमिशनरच्या अंतर्गत येणाऱ्या हॉस्पिटलला सुध्दा दिले जाणार आहे. किती लोकांना मोफत सुविधा पुरवण्यात आली हे पाहण्यासाठी आरोग्य खात्यामार्फत आरोग्य मित्र प्रत्येक चॅरिटी हॉस्पिटलमध्ये ठेवले जाणार आहेत. त्या मिटींगमध्ये हा ठराव पास झाला परंतु प्रायव्हेट हॉस्पिटलच्या असोसिएशनने हायकोर्ट मध्ये याचिका दाखल केल्यामुळे हा इश्यू हायकोर्टात पेन्डींग असून या केसचा निर्णय लागल्या नंतर आपल्याला जे काही पाऊल उचलावयाचे आहे ते नक्कीच उचलले जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ D/ ST/ प्रथम श्री. भारवि.... 12:50

**औष्णिक विद्युत प्रकल्पांसाठी वापरण्यात येणाऱ्या कोळशाची गुणवत्ता योग्यप्रकारे न तपासणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(४) * ४५२४९ श्री.विनोद तावडे , ॲड.आशिष शेलार , श्री.चंद्रकांत पाटील :** सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वीज निर्मितीसाठी वापरण्यात येणाऱ्या कोळशाच्या उष्मांकामध्ये खाणीच्या ठिकाणी व प्रत्यक्ष विद्युत निर्मिती केंद्रावर मोठी तफावत आढळून आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दोन्ही ठिकाणी कोळशाची गुणवत्ता तपासण्याचे काम संबंधित अधिकाऱ्यानी कंत्राटदारांशी संगनमत केल्यामुळेच कोळशाची गुणवत्ता ढासळली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोळशाची गुणवत्ता योग्यप्रकारे न तपासल्यामुळे महानिर्मितीमार्फत होणारी वीजनिर्मिती मागील काही वर्षाच्या तुलनेत १ मेगावॅटने देखील वाढलेली नाही, हे देखील खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, याप्रकरणी होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेंद्र मुळक, श्री.अजित पवार यांचे करिता :** (१) होय.

(२) नाही.

(३) नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, खाणीच्या ठिकाणी तसेच विद्युत निर्मिती केंद्राच्या ठिकाणी कोळशाच्या उष्मांकामध्ये फरक असतो का असा प्रश्न विचारला असून त्याला "होय" असे उत्तर देण्यात आलेले आहे. कोळशाची गुणवत्ता तपासणारे अधिकारी आपल्याकडे आहेत काय ? ही परस्पर विरोधी गोष्ट आहे. यामध्ये उष्मांकाची चोरी झालेली आहे. परंतु चोरी होऊ नये यासंदर्भात ज्याच्यावर जबाबदारी आहे तो मात्र यामध्ये दोषी नाही असे सांगण्याचा एकंदर प्रयत्न झालेला आहे. त्यामुळे यामध्ये काय गौडबंगाल आहे हे कळत नाही. खरे म्हणजे वीज निर्मिती केंद्रातल्या भ्रष्टाचाराचे मूळ हे कोळशाच्या गुणवत्तेच्या तडजोडीपासून सुरु आहे. १७,७०० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार कोळशामध्ये झालेला आहे. कोळशाची गुणवत्ता तपासणाऱ्या अधिकाऱ्याच्या संदर्भात माझ्या मनात शंका होती त्यामुळे कोळशाची गुणवत्ता तपासण्याच्या कामाची माहिती मी माहितीच्या अधिकारात मागवली असता त्यामध्ये कोळसा कोठून पुरविला जातो, कोळशाची गुणवत्ता कशी तपासली जाते व आतापर्यंत झालेल्या तपासण्यांमध्ये काय आढळून आले याची माहिती देण्यात आलेली आहे. यासंदर्भात महावितरण कंपनीने मला खालील प्रमाणे उत्तर दिलेले आहे.

..३..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.: ४५२४९.....**

**श्री.विनोद तावडे .....**

पुरवठादार कंपनीने कोळसा पुरवल्यानंतर त्याची प्रत तपासण्याची व मोजणी करण्यासाठी स्वतंत्र इन्सपेक्शन एजन्सी नेमलेली आहे. इतर तपासणी पध्दतींचा अभ्यास करुन महानिर्मितीने त्यांच्या नागपूर येथील प्रयोग शाळेत कोळशाची तपासणी करण्याचा निर्णय घेतला आहे. महानिर्मितीने तपासणी करण्यासाठी दोन आंतरराष्ट्रीय संस्थांच्या प्रतिनिधींची नेमणूक केलेली आहे. या संस्था कोळशाच्या प्रतवारीची प्रचलित मापदंडानुसार बीआयएस तपासणी व पृथक्करण करतात व यावर महानिर्मिती अधिकाऱ्यांची देखरेख असते. तपासणी व्यवस्थित चालते किंवा कसे यासाठी मुख्य कार्यालयात एक टीम बनविण्यात आली असून ही टीम औष्णिक केंद्राला अचानक भेट देऊन पाहणी करते. पुरवठादाराने पुरवलेला कोळसा ८० ते ९० टक्के या रेंजमध्ये असतो. करारानुसार कोळशाचा उष्मांक ५,८०० ते ६३०० किलो कॅलरीज पर ग्रॅम या दरम्यान असतो. पुरवठा करारातील शर्तीनुसार गुणवत्ता नसल्यास कठोर दंडात्मक कारवाई करण्यात येते. असे उत्तर दिल्यानंतर महानिर्मिती कंपनी किती पारदर्शी व कार्यक्षम आहे असे आपल्याला वाटत असेल परंतु या ठिकाणी कोळशाची गुणवत्ता निकृष्ट असल्याचे जाणवलेच नाही. आजच्या उत्तरात कोळशाच्या उष्मांकामध्ये फरक असतो हे आपण मान्य केले असून हा दुटप्पीपणा आहे. या प्रकरणास सरकारचे व मंत्र्यांचे संरक्षण लाभलेले आहे. खरे म्हणजे वेस्टर्न कोल फिल्डने नागपूर बेंच समोर एक प्रतिज्ञापत्र सादर केले असून त्यात असे म्हटले आहे की, "आमचा आणि सरकारचा एक अधिकारी गुणवत्ता तपासण्याचे काम करतो". आपली गुणवत्ता चांगली नव्हती तर कोळशाची गुणवत्ता तपासण्याची जबाबदारी महाजनकोच्या ज्या अधिकाऱ्यावर होती त्यांनी कोल कंट्रोलरकडे तक्रार का दाखल केली नाही ? गेल्या ८ वर्षात एकच तक्रार आलेली आहे. WCF ने न्यायालयात दिलेल्या शपथपत्रात महाजनको व वेकोलीचे अधिकारी संयुक्तरित्या तपासणी करतात असा उल्लेख आहे. वेकोलीच्या शपथ पत्राबद्दल ऊर्जा खात्याचा विश्वास नसेल तर या प्रकरणाचा तपास आपण सीबीआय मार्फत करणार का ? WCF आणि आपल्या अधिकाऱ्याने प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे.

यानंतर श्री.अजित.....

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.45249....

श्री.विनोद तावडे...

ते जर अमान्य असेल तर वेस्टर्न कोल फिल्ड ही केंद्र सरकारची कंपनी आहे तेव्हा त्यांची सी.बी.आय.चौकशी करण्यात येईल काय ?

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, आपणास वीज निर्मितीसाठी पुरविण्यात येणारा कोळसा निर्मिती केंद्रात लोडींगएन्ड आणि अनलोडींगएन्ड या दोन भागामध्ये येतो. त्या कोळशाचा दर्जा तपासण्या संदर्भातील हा प्रश्न आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी दुसरा प्रश्न उष्माकांच्या संदर्भात विचारलेला आहे. सध्या आपणास वेस्टर्न कोल फील्ड, महानदी कोलफील्ड,साऊथ ईस्टर्न कोलफील्ड आणि सिंग्रनीज कोल फील्डमधून कोळसा पुरविण्यात येतो. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी येथे सांगितले की, त्यांनी माहितीच्या अधिकाराखाली माहिती घेतलेली आहे. मी त्यांना त्या व्यतिरिक्त अधिकची माहिती देतो. सन 2009ची कोल सप्लाय ॲग्रीमेन्ट आहे त्यानुसार कोळसा खदानीमध्ये लोडींगएन्डवर त्याचे गुणवत्ता विश्लेषण व दर्जा निश्चिती ही कोळसा कंपन्यांच्या अधिपत्याखाली केली जाते. कोळसा खदानीमध्ये केलेली गुणवत्ता पेटन्टसाठी ग्राह्य धरली जाते. त्यावेळी दोन्ही विभागाचे अधिकारी उपस्थित असतात व त्या अधिकाऱ्यांच्या माध्यमातून त्याची तपासली केली जाते.

सभापती महोदय, कोळसा हा नॅचरल रिर्सोसेस आहे. सद्य:परिस्थिीमध्ये जगभर आणि प्रामुख्याने आपल्या देशात कोळशाचा तुटवडा आहे. आपल्याला ज्या दर्जाच्या कोळशाची आवश्यकता आहे त्या दर्जाचा कोळसा आपणास मिळत नाही. दिवसेंदिवस कोळशाचा दर्जा खालावत चालला आहे ही वस्तुस्थिती आहे. आपली जी जनरेशन कपॅसिटी आहे त्यातील 80 टक्के कॅपॅसिटी ही थर्मल पॉवरवर आहे. आपणास उपलब्ध झालेल्या कोळशानुसार थर्मल प्लान्ट चालवावे लागतात.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितलेली बाब बरोबर आहे. दिवसेंदिवस उष्मांक खालावत चालला आहे हे आम्हाला मान्य आहे. त्या संदर्भात राज्य सरकारने आणि आमच्या कंपन्यांनी कॉम्पीटीशन कमिशन ऑफ इंडियाकडे सातत्याने दाद मागितली आहे. त्या संदर्भात अनेक तक्रारी केल्या. आतापर्यंत 1300 लेखी तक्रारी करण्यात आलेल्या आहेत. शेवटी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.45249....

श्री.राजेंद्र मुळक....

कॉम्पीटीशन कमिशन ऑफ इंडियाने कंपन्यांना 1733 कोटी रुपयांचा दंड करण्याचा निर्णय घेतला आहे.

सभापती महोदय, रॅकने कोळसा येतो. त्यांनतर तो अनलोड होतो. आपले चौवीस तास जनरेशन सुरु असते. त्या दरम्यान त्या कोळशाचा उष्मांक व गुणवत्ता किती आहे हे चेक करावे लागते. त्यानंतर बॉयलरच्या माध्यमातून जनरेशन करणे असा दिवसभर कार्यक्रम सुरु असतो. आपणास गुणवत्ता तपासल्यानंतर हा सर्व घटनाक्रम करायचा असतो. आपल्या पॉवर प्लान्टमध्ये 15-15 दिवसांपूर्वी कोळसा येतो अशी परिस्थिती नाही. रोजच्या रोज रॅक येतात आणि त्या एक्झॉस्ट होतात. दुसऱ्या दिवशी दुसरी रॅक येते आणि एक्झॉस्ट होते अशी प्रक्रिया सुरु असते. आपण सात-आठ टक्के इम्पोर्टेड कोल घेतो. त्या कोळशातून जो उष्मांक प्राप्त होतो त्यातून तो मीट करण्याचा प्रयत्न करतो. आपणास कॉम्पीटीशन कमिशन ऑफ इंडियाने दाद दिलेली आहे. त्यानुसार भविष्यामध्ये या दोन्ही रिसिव्हींगएन्डवर नवीन प्रणाली विकसित करणे आणि अधिक जास्त प्रमाणात गुणवत्ता चेक करणे यासाठी आम्ही एक बैठक घेतली होती. त्या बैठकीमध्ये काही नव्याने मापदंड ठरविण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. येणा-या काळामध्ये एक निश्चित स्वरुपाचा मापदंड तयार करण्यात येईल. मी पुन्हा एकदा सांगू इच्छितो की, आपणास आवश्यकतेनुसार कोळसा प्राप्त होत नाही. कोळशाची गुणवत्ता निश्चित स्वरुपात कमी झालेली आहे, कारण कोल फील्डमधून मायनिंग होते. (अडथळा) मी वास्तविकता काय आहे ते सांगत आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ D/ ST/ KTG/ पूर्वी श्री.अजित... 13:00
ता.प्र.क्र.45249...

**सभापती** : मला वाटते या संदर्भात शासनाने प्रयत्नांची पराकाष्ठा करणे गरजेचे आहे. माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितलेले नुकसान 1700 कोटी रुपयांचे आहे.

श्री.राजेंद्र मुळक : महोदय, नुकसानीप्रकरणी 1700 कोटी रुपयांचा दंड त्यांच्यावर लावलेला आहे. ही गोष्ट आपण समजून घेणे आवश्यक आहे. मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, आपल्याकडे कोळसा रॅकने येतो. आपल्याकडे 15-15 दिवसांचा, 2-2 महिन्यांचा, 3-3 महिन्यांचा कोळशाचा स्टॉक येत नाही. ही परिस्थिती आपल्याच राज्यात आहे असे नाही. देशातील इतरही राज्यात हीच परिस्थिती आहे. जो कोळसा आपल्याला प्राप्त होतो त्याचा साठा केवळ तीन-चार दिवसांचाच असतो. सध्या आपण पीक सिझनमध्ये आहोत. कारण सध्या विजेचा लोड मोठ्या प्रमाणावर वाढलेला आहे. कृषी पंप आणि इतर बाबींमुळे हा लोड वाढला आहे. आज राज्यात 13000 ते 13500 मे.वॅ. विजेचा लोड वाढला आहे. हँड टु माऊथ म्हणून ही व्यवस्था व्यवस्थित करण्याचा आपण नेहमीच प्रयत्न करीत असतो. कोळशाचा दर्जा कमी होऊ नये याची सुध्दा आम्ही दक्षता घेत असतो.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, कोळशाचा दर्जा नीट नसेल तर कोल कंट्रोलरकडे तक्रार करावयास पाहिजे. वारंवार निकृष्ट दर्जाचा कोळसा मिळत असताना राज्य सरकारने गेल्या 9 वर्षात केवळ एकदाच कोल कंट्रोलरकडे तक्रार केल्याचे प्रतिज्ञापत्रात नमूद केले आहे. या विषयीची माहिती मी सुध्दा कोल कंट्रोलरकडून घेतली आहे. 1700 कोटी रुपये ही कमी रक्कम नाही. राज्याचे नुकसान झाल्यामुळे कोल कंट्रोलरने कोळसा कंपन्यांवर दंड ठोकला आहे. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, रोजच कोळशाच्या रॅकमध्ये कमी दर्जाचा कोळसा येत असताना, गेल्या 9 वर्षात कोल कंट्रोलरकडे केवळ एकदाच तक्रार का करण्यात आली ?

श्री.राजेंद्र मुळक : महोदय, राज्य सरकार कोल कंट्रोलरच्या सातत्याने संपर्कात असते. त्यांच्याकडे लेखी तक्रार सुध्दा करीत असतो. कोल कंट्रोलरकडे तक्रार केल्यानंतर सुध्दा कोळशाचा दर्जा सुधारत नव्हता. त्यामुळे आपण कॉम्पीटीशन कमिशन ऑफ इंडिया यांच्याकडे दाद मागितली. कॉम्पीटीशन कमिशन ऑफ इंडिया ही ॲपेक्स बॉडी आहे. या विषयी त्यांच्याकडे दाद मागितल्यामुळे त्यांनी हा दंड ठोठावला आहे. हा दंड ठोठावल्यानंतर कोळसा कंपन्यांकडून जो कोळसा येतो त्यामध्ये सुसूत्रता येण्यास सुरुवात झाली आहे.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.45249...

श्री.राजेंद्र मुळक....

महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छितो की, आपल्या राज्यात कोळसा हँड टू माऊथ येत आहे. हे नॅचरल रिर्सोसेस आहेत. मायनिंगमधून ज्या दर्जाचा कोळसा निघत आहे तोच कोळसा आपल्याकडे येत आहे. कमी दर्जाचा कोळसा राज्यात येत असल्यामुळे माननीय विरोधी पक्ष नेते या सर्व व्यवहारामध्ये भ्रष्टाचार झाला असे समजत आहेत. यामध्ये कसा भ्रष्टाचार झाला हे त्यांनी सिध्द करुन दाखववावे. मध्य प्रदेश, गुजरात, तामीळनाडू इत्यादी राज्यांतील थर्मल प्लांटसाठी सुध्दा याच दर्जाचा कोळसा जातो. सांगण्याचा उद्देश एवढाच आहे की, आपल्या राज्यात ज्या दर्जाचा कोळसा येत आहे त्याच दर्जाचा कोळसा अन्य राज्यांत सुध्दा जात आहे. मी पुन्हा एकदा सांगू इच्छितो की, मायनिंगमधून जो कोळसा निघत आहे तोच कोळसा आपल्याकडे येत आहे.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे. परंतु माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी मला विनंती केल्यामुळे मी त्यांना एक-दोन मिनिटांत प्रश्न विचारण्यास अनुमती देतो.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले की, आपल्याकडील कोळसा हँड टु माऊथ आहे. वास्तविक पाहता ज्या दर्जाचा कोळसा मिळतो त्या दर्जाच्या किंमतीनुसार पेमेंट केले पाहिजे. परंतु कमी दर्जाचा कोळसा मिळत असताना जादा दर्जाच्या दराने पेमेंट केले जात आहे. हे करण्यामागील कारण काय आहे, हे समजले पाहिजे. या निमित्ताने मी विनंती करतो की, माननीय राज्यमंत्र्यांनी कोल कंट्रोलरकडे केलेल्या तक्रारीच्या प्रती त्यांनी पटलावर ठेवल्या पाहिजेत. मी पुन्हा एकदा विचारु इच्छितो की, कोळसा कंपन्यांकडून कमी दर्जाचा कोळसा मिळत असताना त्यांना जादा दराने पेमेंट का केले जाते ?

श्री.राजेंद्र मुळक : महोदय, आपल्याकडे लिंकेजनुसार कोळसा येतो. महोदय, या कॉलरीजमधून केवळ आपल्याच राज्याला कोळसा मिळतो असे नाही.

नंतर श्री.कांबळे...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक ....

सर्वच राज्यांमध्ये या कॉलरीजमधून कोळसा जातो. आपला उष्मांक ठरलेला आहे, त्या संदर्भात दर महिन्यात ऑडिट करतो आणि त्याच पध्दतीने पेमेंट जाते. पेमेंट एलसीच्या माध्यमातून केले जाते. कोल इंडियाच्या कंपन्या आहेत. भारत सरकारच्या संस्था आहेत. आपण प्रायव्हेट प्लेअरकडून कोळसा घेतो का ? या सर्व डब्ल्यूसीएल माईन्स असतात. या सर्व सरकारच्या कोल फिल्डस् आहेत. आपण चुकीच्या दर्जाचा कोळसा घेतो, असे नाही. हे नॅचरल रिर्सोस आहे. ज्या दर्जाचा कोळसा मायनिंग होत आहे, तोच कंटिन्युअसली येत आहे. आपण तो कोळसा घेत असल्याने नुकसान होत आहे, असे नाही. आपण मागील वर्षी निर्मिती केली त्यापेक्षा यावर्षीच्या युनिटमध्ये वाढ झाली आहे. आपण आयात केलेल्या कोळशाच्या माध्यमातून कॉम्पेनसेट करतो. आपणच नाही तर देशात गुजरात, मध्य प्रदेश आणि इतर राज्ये याच पध्दतीने कॉम्पेनसेट करतात. कोणतेही चुकीचे प्रश्न सांगायचे हे योग्य नाही. सभागृहाची दिशाभूल करणे योग्य नाही. ही आपली सर्वाची जबाबदारी आहे. आपल्या येथे थर्मल प्लँटच्या माध्यमातून 80 टक्के वीज निर्मिती होत आहे. 4-5 वर्षांत आपली क्षमता वाढून 14 हजार मे.वॅ.ची झाली आहे. दरवर्षी आपल्याला अधिकचा कोळसा लागत आहे. कोणत्याही स्वरूपात भ्रष्टाचार झालेला नाही. आज अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. कोणत्याही स्वरूपाचे ताशेरे ओढायचे आणि सभागृहाचा वेळ वाया घालवायचा, हा प्रयत्न सुरू आहे.

श्री. मोहन जोशी : सभापती महोदय, माझी विनंती आहे की, पाचवा प्रश्न पुण्याच्या पाणीपुरवठ्याच्या संबंधी आहे. मघाशी 3 प्रश्न क्लब केले होते.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण अशी प्रथा पाडली तर प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर किमान 10 सन्माननीय सदस्यांना मला परवानगी द्यावी लागेल. मला माफ करा. आपण ते 3 प्रश्न प्रश्नोत्तराच्या तासात चर्चेला घेतले आहेत.

प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



20-12-2013 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) II.2
MSK/ D/ KTG/ पूर्वी श्री. बोर्डे 13:05

**पृ.शी./मु.शी.** : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री. राजेंद्र मुळक (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांचा सन 2012-2013 या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांचा सन 2011-2012 या वर्षाचा वार्षिक लेखा व लेखा परीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने लोकलेखा समितीच्या सन 2001-2002 या वर्षाच्या आठव्या अहवालातील परिच्छेद क्र.1.28 मध्ये समितीने केलेल्या शिफारशींनुसार मंत्रालयीन सर्व विभागांनी सन 2012-2013 या वित्तीय वर्षात केलेल्या पुनर्विनियोजनाबाबतच्या माहितीचे एकत्रित विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : विवरणपत्र सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

----

श्री. राजेंद्र मुळक : मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम, 2005 च्या कलम-6(1) नुसार सन 2013-2014 च्या अर्थसंकल्पाच्या संदर्भात जमा व खर्चाच्या अर्धवार्षिक आढाव्याचे निष्कर्ष दर्शविणारे विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : विवरणपत्र सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

----

( नंतर श्री. खंदारे ....

अशुद्धित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनी मर्यादित, यांचा सन 2009-2010 या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र वित्त आयोगाचा जून, 2006 या वर्षाचा तिसरा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांचा सन 2012-2013 या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचा सन 2011-2012 या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

श्री.सुरेश धस (वस्त्रोद्योग राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ मर्यादित यांचा सन 2012-2013 या वर्षाचा सत्तेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

श्री.सुरेश धस : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्यादित यांचा सन 2012-2013 या वर्षाचा बेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----.

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, मी आपल्याला धन्यवाद देतो. या अधिवेशनामध्ये विविध महामंडळांचे सन 2011-2012, सन 2012-2013 पर्यंतचे वार्षिक अहवाल सादर होत आहेत.

**सभापती** : महामंडळांचे वार्षिक अहवाल सभागृहाला सादर होण्याबाबत थोडीशी प्रगती झाल्याचे मला दिसत आहे. परंतु याबाबत अधिक चांगली प्रगती होणे गरजेचे आहे. त्याबाबत विविध विभागांना तातडीने सूचना देणे आवश्यक आहे. त्याबाबतची कार्यवाही माझ्या कार्यालयाकडून केली जाईल.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, राज्य वित्त आयोगाचे मागील 6-7 वर्षांचे अहवाल सभागृहाला सादर होणे बाकी आहे. त्याबाबत शासनाला आपण निर्देश दिले तर बरे होईल.

**सभापती** : ठीक आहे.

-----

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वयेच्या सूचनांसंबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवणे

सह सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेतील बाब क्रमांक तीनच्या अंतर्गत दाखविण्यात आलेली नियम 93 अन्वयेच्या सूचनासंबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहेत.

( प्रेस : येथे सोबत जोडलेली निवेदने कृपया छापावीत. )

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

4...

**पृ.शी./मु.शी.**: लक्षवेधी सूचनांसंबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवणे

सह सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेतील बाब क्रमांक चार च्या अंतर्गत दाखविण्यात आलेल्या क्रमांक 1 ते 191 लक्षवेधी सूचनासंबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहेत.

( प्रेस : येथे सोबत जोडलेली क्रमांक 1 ते 191 ही निवेदने कृपया छापावीत. )

----

5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचे मुद्दे

**सभापती** : आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"मुंबई शहरातील वरळी येथील पोद्दार आयुर्वेदिक महाविद्यालयाच्या इमारतींच्या दुरुस्तीबाबत केंद्र शासनाच्या आरोग्य विभाग आणि फॅमिली वेल्फेअर विभाग यांनी महाराष्ट्र राज्याच्या मुख्य सचिव यांच्याकडे वारंवार पत्रव्यवहार करुन सुध्दा शासनाकडून इमारत दुरुस्तीसाठी ना हरकत प्रमाणपत्र अद्यापपर्यंत देण्यात आलेला नाही. तसेच केंद्र शासनाकडून 2012-13 मध्ये इमारत दुरुस्तीसाठी साडे तीन कोटी रुपये मंजूर होऊन त्यापैकी दोन कोटी रुपये जमा होणे, परंतु राज्य शासनाचे ना हरकत प्रमाणपत्र न मिळाल्याने व स्टेट आयुषचे डायरेक्टर श्री.कोहली यांच्या मनमानी कारभारामुळे सदरचा निधी परत जाणे, पोद्दार रुग्णालयाच्या नवीन इमारतीसाठी पोद्दार आयुर्वेदिक कॅन्सर इन्स्टिटयूटने हाफकिन इन्स्टिटयूट किंवा अन्य ठिकाणी किंवा जी जागा मोकळी आहे अशी जागा देण्याच्या बाबतीत पाठविण्यात आलेला प्रस्ताव, परंतु त्यास अद्यापही मान्यता देण्यात न येणे, तरी या प्रकरणी शासनाने लक्ष घालून श्री.कोहली यांच्या मनमानी कारभाराची चौकशी करुन कार्यवाही करण्यात यावी अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे विनंती करीत आहे."

नंतर श्री.शिगम.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 13:15

श्री. रामदास कदम...

सभापती महोदय, पोद्दार हॉस्पिटल येथे कॅन्सरचे रिसर्च सेंटर ज्या इमारतीमध्ये आहे त्या इमारतीच्या दुरुस्तीसाठी केन्द्र शासनाकडून 3 कोटी रुपये आलेले आहेत. परंतु शासन ती इमारत दुरुस्त करण्यासाठी परवानगी देत नाही. ती इमारत केव्हाही पडू शकेल. 3 कोटी रुपया पैकी 2 कोटी रुपये केन्द्राकडे परत गेले. कोहली नावाचे जे अधिकारी आहेत ते सर्व प्रस्ताव दाबून ठेवतात. हे कॅन्सरचे अतिशय चांगले रिसर्च सेंटर आहे. हे सेंटर वाचविण्यासाठी शासनाकडून प्रयत्न व्हावेत म्हणून मी हा औचित्याचा मुद्दा दिलेला आहे.

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"राज्य शासनाने ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना किमान वेतन व विशेष भत्त्याचे दर सुधारित करण्याबाबत 30 ऑक्टोबर 2013 रोजी निर्णय घेणे, परंतु चंद्रपूर जिल्हा परिषदेने ग्रामपंचायतीच्या उत्पन्नाची माहिती शासनाला सादर न केल्याने जवळपास जिल्ह्यातील 1500 कर्मचारी नवीन वेतनापासून वंचित राहाणे, त्यामुळे कर्मचा-यांच्या वेतनाचा निर्माण झालेला प्रश्न आणि त्यावर करावयाची कारवाई यासाठी मी हा औचित्याचा मुद्दा या ठिकाणी उपस्थित केलेला आहे.

सभापती महोदय, यामध्ये चंद्रपूर जिल्हा परिषदेकडून हलगर्जीपणा झालेला असल्यामुळे कर्मचाऱ्यांचे फार मोठया प्रमाणावर नुकसान होत आहे. तेव्हा चंद्रपूर जिल्हा परिषदेकडून पुनश्च माहिती मागवून कर्मचा-यांना न्याय द्यावा अशी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनास विनंती करीत आहे.

---

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**कांद्याला भाव मिळण्याबाबत**

(सन्माननीय सदस्य श्री. जयवंतराव जाधव हे गळयात कांद्याची माळ घालून बोलण्याचा प्रयत्न करीत असतात. )

**सभापती** : अशा पध्दतीने सन्माननीय सदस्यांनी गळयात काही घालून सभागृहामध्ये येणे बरोबर नाही.

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय, आपला आदेश मला त्रिवार मान्य आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रथम गळयातील माळ काढून ठेवावी.

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय, मी ही माळ काढून ठेवतो. आम्ही सभागृहाची आदर्श परंपरा राखण्याचा प्रयत्न करतो. कांदा हे नाशिक जिल्ह्याचे नगदी पीक आहे. कांद्याचे भाव वाढले तर देशावर काही तरी मोठे संकट कोसळले अशा प्रकारची भावना व्यक्त होते. नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कांदा विक्रीसाठी नेला त्यावेळी त्या कांद्याला 5 रुपये इतका भाव मिळाला. मी केन्द्र शासनाचे आभार मानतो, केंद्रीय कृषी मंत्री आदरणीय श्री. शरद पवार यांचे आभार मानतो की, त्यांनी एमएसपीच्या संदर्भात निर्णय घेतला. मी या ठिकाणी नम्र विनंती करतो की, उत्पादन आधारित मूल्य धरुन 3000 रुपये इतका हमी भावाने शासनाने कांदा खरेदी करावा. आपण मला बोलण्याची जी संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ KTG/ 13:20

**सभापती** : या ठिकाणी सन्माननीय मंत्री श्री.राजेंद्र दर्डा उपस्थित आहेत. शेतकऱ्यांच्या दृष्टीने हा प्रश्न अत्यंत महत्वाचा आहे. या बाबतीत आपण स्वत: लक्ष घालून पणन मंत्री आणि कृषी मंत्री यांचे देखील लक्ष वेधावे.

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, आपण दिलेल्या निदेशाची नोंद घेतलेली आहे.

-----

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : 11 वी व 12 वी तील शास्त्र शाखेतील गणित, भौतिक शास्त्र आणि रसायन शास्त्र या विषयाची पुस्तके मराठी भाषेतून उपलब्ध नसणे याबाबत श्री.दिवाकर रावते, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

इयत्ता 11 वी व 12 वी तील शास्त्र शाखेतील गणित, भौतिक शास्त्र आणि रसायन शास्त्र इत्यादि विषयाच्या परीक्षा गुजराथी, कन्नड, सिंधी व इंग्रजी भाषेतून देण्याची सोय 1977 पासून या राज्यात अस्तित्वात आहे. राज्यातील महाविद्यालयामध्ये हे विषय मराठीतून शिकविण्याची तसेच परीक्षा घेण्याची सोय उपलब्ध नसणे, त्याचे मुख्य कारण म्हणजे या भाषेची पुस्तके मराठी भाषेतून नसल्याच्या तक्रारी आहेत. म्हणून 11 वी व 12 वी शास्त्र शाखेचे मराठी माध्यम वर्ग प्रत्येक शाळा व महाविद्यालयांमध्ये सुरु करण्याचे, मराठीतून हे विषय शिकविणाऱ्या व्याख्यात्यांना प्रोत्साहन देणे आणि शास्त्र शाखेचे मराठी शिक्षण द्यावयाचे आहे अशा संस्थांना प्रोत्साहन देणे इत्यादी मागण्या मराठी भाषेतील प्राध्यापकांच्या अनेक संस्थांनी शासनाकडे केलेल्या आहेत. मराठी राज्यभाषा असल्यामुळे या प्रकरणी राज्य शासनाने तातडीने निर्णय घ्यावा अशी मी या विशेष उल्लेखाव्दारे माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो.

श्री.राजेंद्र दर्डा : नोंद घेतो.

------

3....





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांनी सेवानिवृत्त
योजना लागू करण्याची केलेली मागणी या बाबत
श्री. दिवाकर रावते,वि.प.स.यांनी दिलेली
विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांनी दिनांक 16.11.2004 आणि दिनांक 13.12.2005 रोजी दोन जाहिराती प्रसिध्द करुन कनिष्ठ विद्यालयातील शिक्षकांच्या पदांची भरती करण्याचे ठरविले. सदर उमेदवारांची चाळणी परीक्षा होऊन जून, 2006 मध्ये प्रत्यक्षात भरती झाली. तथापि दरम्यानच्या काळात दिनांक 20.10. 2005 रोजीच्या वित्त विभागाच्या शासन निर्णयानुसार परिभाषिक अंशदान निवृत्ती योजना लागू केल्यामुळे अमरावती आदिवासी विकास विभागाच्या अपर आयुक्त कार्यालयातील जून 2006 मध्ये भरती झालेल्या शिक्षकांचे आर्थिक नुकसान झाले आहे. सदर कर्मचाऱ्यांना अंशदान निवृत्ती योजना लागू करण्याऐवजी सेवानिवृत्ती योजना लागू करण्याची मागणी माननीय आदिवासी विकास मंत्री व आयुक्त, आदिवासी विकास यांच्याकडे केली आहे. या बाबतीत उचित कार्यवाही करण्यात यावी अशी मी या विशेष उल्लेखाव्दारे सन्माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो. धन्यवाद.

--------------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचे मुद्दे

( पुढे चालू )

श्री.सतीश चव्हाण : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने औचित्याचा मुद्दा मांडतो.

औरंगाबाद शहरातील रस्त्यांची अवस्था अतिशय वाईट असून या बाबतीत नागरिकांनी वेळोवेळी संबंधितांकडे निवेदने दिली आहेत. आंदोलने केली, परंतु पैसे नसल्याचे कारण सांगत महापालिकेने हा प्रश्न सोडविलेला नाही. दुसरीकडे स्मृती वन, संत सृष्टी, जॉयन्स क्लबचे अधिवेशन यावर महापालिका कोटयवधी रुपये खर्च करीत आहे. स्मृती वन, संत सृष्टी,जॉयन्स क्लब याचे अधिवेशनावर महापालिका कोटयावधी रुपये खर्च करीत असल्याने त्याचा निषेध म्हणून नागरिक आजपासून "नो टॅक्स आंदोलन" सुरु करीत आहे. याबाबतीत शासनाने गंभीर दखल घेऊन कार्यवाही करावी अशी माझी नम्र विनंती आहे.

सभापती महोदय, माननीय श्री.राजेंद्र दर्डा हे मंत्री असून ते औरंगाबाद येथून नेतृत्व करीत आहेत. त्यांना या बाबतीत आपण सूचना अथवा निदेश द्यावेत अशीही माझी आपणास विनंती आहे.

श्री.राजेंद्र दर्डा : सन्माननीय सदस्यांनी औरंगाबाद शहरातील रस्ते व रस्त्यांवरील खड्डयांचा उल्लेख केला, ती वस्तुस्थिती आहे. औरंगाबाद महानगरपालिका रस्ते व त्यावरील खड्डे भरण्याच्या कामावर खर्च करण्याऐवजी दुसऱ्याच कामांवर पैसे खर्च करीत असेल तर ती बाब योग्य नाही. शासनाच्या माध्यमातून संबंधित महापालिकेला निर्देश देण्यात येतील.

--------

5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक राऊत : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने औचित्याचा मुद्दा मांडतो.

सिंधुदुर्ग जिल्हयाची निर्मिती दिनांक 1 मे, 1981 रोजी झाली असून या जिल्हयाचे गॅझ ेटियर अद्यापी प्रसिध्द झालेले नाही. ब्रिटीश कालखंडात म्हणजे 1888 साली प्रसिध्द झालेल्या रत्नागिरी-सावंतवाडी डिस्ट्रीक्ट गॅझेटियर आणि 1962 मध्ये प्रसिध्द झालेल्या रत्नागिरी जिल्हा गॅझेटियरमध्ये सिंधुदुर्ग जिल्हयाचा भौगोलिक तपशील नोंदविला आहे. तथापि सिंधुदुर्ग जिल्हयाचे स्वतंत्र गॅझेटियर प्रसिध्द करणे आवश्यक आहे. सिधुदुर्ग जिल्हयाचे स्वतंत्र गॅझेटियर प्रसिध्द करण्यासाठी शासनाने कार्यवाही करावी, अशी मी औचित्याच्या मुद्याव्दारे विनंती करीत आहे. धन्यवाद.

--------------------

6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ KTG/

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने औचित्याचा मुद्दा मांडतो.

महाराष्ट्र राज्यात स्वातंत्र्यप्राप्ती नंतर अनेक क्षेत्रात प्रगती करण्यात येणे, मात्र आरोग्याच्या दृष्टीने एस.टी.स्टॅन्ड, रेल्वे स्टेशन, भाजी मंडी व इतर सार्वजनिक ठिकाणी नागरिकांच्या सोयीसाठी शासनाने सुलभ शौचालयांची उभारणी करण्यात येणे. मात्र स्वच्छतेअभावी सदर ठिकाणी मोठ्या प्रमाणात दुर्गंधी येत असल्याने नागरिकांना विविध रोगांची लागण होत असणे, याबाबत संत गाडगेबाबा पुण्यतिथीचे औचित्य साधून सदर शौचालयांमध्ये स्वच्छता राखण्याबाबत शासनाने ठोस पावले उचलावीत अशी मी या औचित्याच्या मुद्याव्दारे विनंती करतो.

----------------

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सरोगसी मदरचा मुद्दा मी उपस्थित करु इच्छिते. आज मुंबई शहरात आणि अन्य मोठया शहरांमध्ये ज्यांना मूलबाळ नाही अशांना तात्पुरत्या स्वरुपात सरोगसी मातांकडून मातृत्व प्राप्त करुन दिले जाते. दोन महिला या बाळासाठी तयार होतात. एक स्वत: जन्म देणारी आणि नंतर सांभाळ करणारी असते. त्यामुळे सरोगसी मदरची पध्दत मोठया प्रमाणात मुंबई शहरात सुरु होत आहे. शेकडो रुपयांचा व्यवहार सुध्दा त्यामध्ये होतो. अशा प्रकारे वारंवार सरोगसी मदर होणाऱ्या स्त्रिया आहेत. ही मुले कशा प्रकारे नेली जातात, त्यांचे कोणत्या पध्दतीने संगोपन केले जाते या संदर्भात कोणतीही नियमावली नाही. या संदर्भात वर्षभरापूर्वी सभागृहात चर्चा झाली. परंतु प्रत्यक्षात राज्य सरकारने कोणतीही दखल घेतली नाही. केंद्र सरकारने देखील दखल घेतली नाही.

सरकारने या संदर्भात दिनांक 31.8.2013 रोजी एक समिती नेमली असल्याचे वाचनात आले आहे. या समितीचा अद्याप अहवाल आलेला नाही. वेगळ्या पध्दतीने स्त्री देहाच्या व्यापारीकरणातून होणारा उपयोग जसा आहे तसेच ज्यांना मूलबाळ नाही त्यांना आधार देणारा सुध्दा आहे. या संदर्भात दोन बाजू आहेत. सरोगसी मदर किंवा गर्भाशय तात्पुरत्या स्वरुपात मातृत्वासाठी वापरण्यात येणारी ही पध्दत या बाबतीत नियमावली आणि दक्षता याबाबत सरकारने त्वरित लक्ष घालावे अशी मी या ठिकाणी मागणी करते.

---------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, शासनाच्या दोन विभागांचा कसा उफराटा कारभार सुरु आहे हे मी निदर्शनास आणू इच्छितो. येत्या नवीन वर्षाचे स्वागत करताना जनतेला विशेषत: तरुणाईला दारुच्या मोहाला बळी पडू नये असे आवाहन शासनाच्या सामाजिक न्याय विभागाकडून कलर जाहिरातीद्वारे वृत्तपत्रातून प्रसिध्द केले आहे.

गेले कित्येक दिवस हे सुरु आहे की, नवीन वर्षाच्या पूर्वसंध्येला दारु पिऊ नका, व्यसनापासून दूर रहा. त्याच वेळेला राज्य उत्पादन शुल्क विभागाने नवीन वर्षाच्या पूर्वसंध्येला दारु विक्रीसाठी पहाटे 5.00 वाजेपर्यंत बार सुरु ठेवण्यास अनुमती द्यावी व दारु विक्रीतून डबघाईस आलेल्या राज्याच्या आर्थिक व्यवस्थेला अधिकाधिक महसूल उत्पादन शुल्कातून मिळवून द्यावा असा फतवा काढला आहे. म्हणजे शासनाचे नेमके धोरण काय आहे? दारु जास्तीत जास्त पिऊन शासनाचा महसूल वाढवावा की तरुणाईला व्यसनापासून दूर ठेवावे.

राज्य सरकारने गुटखा बंदी जाहीर करुन 100 कोटी रुपयांच्या महसुलावर पाणी सोडले आहे. नवीन वर्षाच्या पूर्वसंध्येला दारुचे बार पहाटे 5.00 वाजेपर्यंत सुरु ठेवण्याबाबत शासनाचे धोरण आहे की नाही हे नक्की करावे. तरुणाईला व्यसनापासून दूर ठेवणे महत्वाचे आहे की पहाटे 5.00 वाजेपर्यंत बार सुरु ठेवण्यास परवानगी देऊन जास्तीत जास्त महसूल गोळा करायचा, या संदर्भात आपण शासनाला निर्देश द्यावेत अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे विनंती करतो.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, मुस्लिम समाजातील सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक सद्य:स्थितीचा अभ्यास व पाहणी करून शासनास उपाययोजना सुचविण्यासाठी डॉ.मेहमुद रेहमान यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. डॉ.रेहमान भारतीय प्रशासन सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी होते. या समितीने आपला अंतिम अहवाल ऑक्टोबर 2013 मध्ये शासनाला सुपूर्द केला आहे. सदर अभ्यास गटाने अहवालात केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने राज्य अल्पसंख्याक आयोगाने तातडीने अभिप्राय प्राप्त करून घेऊन अहवालाच्या शिफारशी कार्यान्वित करण्याबाबत अल्पसंख्याक समाजाकडून होत असलेल्या मागणीकडे वेळीच लक्ष देऊन याबाबत तातडीने उपाययोजना करण्यात यावी. अल्पसंख्याक समाजाच्या दृष्टीने हा महत्त्वाचा अहवाल आहे. तेव्हा या अहवालाच्या शिफारशी शासनाने त्वरित अंमलात आणाव्यात अशी मी आपल्या मार्फत शासनाला विनंती करतो.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, औचित्याच्या मुद्याद्वारे मी सभागृहाचे लक्ष एका महत्त्वाच्या बाबीकडे वेधू इच्छितो. देशातील 32 राज्यांपैकी 27 राज्यात शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय 60 वर्षे आहे. भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांचे निवृत्तीचे वय 60 वर्षे आहे. 1984 साली केंद्र शासनाचे धोरण राज्यांनी अवलंबावे असे केंद्र शासनाने सर्व राज्यांना सांगितले आहे. हे धोरण 32 पैकी 27 राज्यांनी अंमलात आणले आहे. पुरोगामी महाराष्ट्राने हे अद्यापि अंमलात आणलेले नाही.

**सभापती** : माझ्या माहिती प्रमाणे आपण हा विषय काल मांडला होता.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मी काल शून्य प्रहरात या विषयाला स्पर्श केला होता. हा विषय त्या मोर्च्याशी संबंधित होता. माझी आपल्याकडून अशी अपेक्षा आहे की, याचा इफेक्ट आपण डिसेंबर पासून द्यावा. यासंबंधी बाहेर फारसा चांगला संदेश जात नाही. आपण तत्वत: निर्णय घेतला आहे. मी मुख्यमंत्र्यांना भेटलो आहे. कर्मचाऱ्यांच्या प्रतिनिधींना भेटलो आहे. उपमुख्यमंत्र्यांना भेटलो आहे. वित्त विभागामुळे हा प्रस्ताव अडला आहे अशी माझी माहिती आहे. तेव्हा डिसेंबर पासून तात्काळ अंमलबजावणी करण्यासंबंधीचे निदेश आपण द्यावेत अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : माननीय मंत्री श्रीमती वर्षा गायकवाड यांनी याची नोंद घ्यावी व संबंधित विभागाच्या लक्षात ही बाब आणून द्यावी.

श्रीमती वर्षा गायकवाड : होय.

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे

सभापती महोदय, मराठी भाषेसंबंधातील औचित्य मी येथे मांडत आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे अध्यक्ष म्हणून काम करणारे श्री.मधु मंगेश कर्णिक यांनी चार महिन्यापूर्वी राजीनामा दिलेला आहे. त्यांच्या जागी शासनाने अजून पर्यंत नवीन नेमणूक केलेली नाही. मराठी भाषेच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ हे महत्त्वाचे आहे. त्यामुळे येथील अध्यक्षांची नेमणूक शासनाने त्वरित करावी अशी मागणी मी करतो.

त्याच बरोबर श्री.पु.ल.देशपांडे यांच्या नावाने सुरू केलेल्या पु.ल.देशपांडे कला अकादमी वर गेल्या चार वर्षापासून संचालकाची नेमणूक न केल्याने त्याचा कारभार प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे देण्यात आला आहे. तेव्हा यावरील संचालकांची नियुक्ती देखील तातडीने करावी अशी मागणी मी औचित्याच्या मुद्याद्वारे करतो.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य चित्रपट पुरस्कार सोहळा दरवर्षी होतो. चित्रपटसृष्टीला 100 वर्षे पूर्ण झाली आहेत. तेव्हा तो सोहळा श्री.दादासाहेब फाळके यांच्या नाशिकमध्ये घ्यावा अशी देखील मी शासनाला विंनती करतो.

यानंतर श्री.जुन्नरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. निरंजन डावखरे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सिंधुदुर्ग जिल्हयातील हिर्लोक हायस्कूल, ता.कुडाळ व ओरस हायस्कूल ता.कुडाळ आणि सांगली हायस्कूल या तिन्ही शाळांच्या जादा तुकडयांना शासनाने सन 2003 मध्ये मान्यता देण्यात येणे, तसेच या शाळांना सन 2010-2011 मध्ये 80 टक्के व सन 2011-2012 मध्ये 100 टक्के अनुदानावर या तिन्ही शाळा घोषित करण्यात येणे, तथापी दोन वर्षाचा कालावधी होऊनही या शाळेतील शिक्षकांना अद्याप वेतन देण्यात आलेले नाही. परिणामी या शिक्षकांवर उपासमारीची पाळी येणे ही बाब लक्षात घेता उपरोक्त तिन्ही शाळांना तातडीने अनुदान उपलब्ध करण्यात येऊन शिक्षकांचे वेतन अदा करण्यात यावे एवढीच मागणी औचित्याच्या मुद्यामार्फत मी शासनास करीत आहे.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : नागपूर दुग्ध योजनेतील रोजंदारी कामगारांवर होत असलेला अन्याय याबाबत डॉ.दीपक सावंत, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

नागपूर दुग्ध योजनेमध्ये सर्व रोजंदार कामगारांनी 240 दिवसापेक्षा जास्त काम केलेले आहे. सदरहू कामगारांना 20 एप्रिल, 2002 ते मार्च, 2006 या कालावधीत दैनिक भत्त्याची थकबाकी देण्यात आलेली नाही. दिनांक 1 जानेवारी, 2006 पासून सहावा वेतन आयोग लागू झालेला आहे. सदरहू कामगारांना नियमित सेवेत देखील सामावून घेण्यात आलेले नाही. त्यामुळे त्यांनी 9 डिसेंबर, 2013 पासून उपोषणाला सुरुवात केली होती. सदर दूध योजना बंद करुन दिल्ली येथील मदर डेअरीला हस्तांतरीत करण्यात येणार आहे अशा बातम्या आहेत. या कामगारांचा हस्तांतरणालाही विरोध आहे. हस्तांतरणामुळे अनेक कामगार बेघर होण्याची भिती निर्माण झालेली आहे. त्यामुळे मी विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे शासनास विनंती करतो कामगारांच्या न्याय्य मागण्यांचा विचार करुन योग्य तो निर्णय घ्यावा अशी विनंती आहे.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.:औचित्याचे मुद्दे**

**(पुढे चालू....)**

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, महिलांवरील अत्याचाराच्या वाढत्या घटना व त्यामुळे जनतेमध्ये निर्माण झालेला असंतोष याची दखल घेऊन शासनाने कडक कायदे केलेले आहेत. शासनाने जलदगती न्यायालयाची स्थापना देखील केलेली आहे. परंतु महिलांवरील अत्याचाराचे मूळ समाजमानसामध्ये असून महिलांवरील अत्याचार रोखायचे असतील तर समाजमानस बदलणे हे खूप महत्वाचे आहे. दोन पुरुषांच्या भांडणामध्ये महिलांचा उल्लेख केला जातो. अवमानकारक पध्दतीने लिंगवाचक अपशब्द शिव्यांना दखलपात्र गुन्हा ठरवण्याची आवश्यकता आहे. महिलांचा अपमान होईल अशा सरसकट शिव्या दिल्या जातात. त्यामुळे महिलांच्या संदर्भात समाजात एकंदरित हीन भावना निर्माण होते. त्याचेच प्रतिबिंब समाजावर पडत असते व त्यामुळे लिंगवाचक अपशब्दांना, शिव्यांना दखलपात्र गुन्हा ठरावावा असा मी औचित्याच्या माध्यमातून मुद्दा मांडते.

----

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, राज्यामध्ये जवळपास 1.5 कोटी मेंढया व 40 लाख शेळया आहेत. राज्यातील लाखो धनगर समाज उदरनिर्वाहासाठी शेळया-मेंढयांना चरण्यासाठी डोंगर परिसरात रानोमाळ भटकंती करीत असतो. राज्यातील डोंगर परिसरातील जमीन मोठया प्रमाणात वन विभागाकडे वनीकरणासाठी दिलेली आहे. राज्यातील आरक्षित चराऊ कुरण व गायरान यावर मोठया प्रमाणात अतिक्रमण झालेले आहे. यामुळे राज्यातील मेंढपाळांना शेळया-मेंढया चरण्यासाठी चराऊ कुरण उपलब्ध नाही. भुकेलेल्या शेळया मेंढया शेतकऱ्यांच्या रानामध्ये चरण्यासाठी गेल्यास मेंढपाळांना मारहाण करणे, धमकावणे, शेळया-मेंढया डांबून ठेवणे, प्रसंगी जंगलामध्ये भटकंती करत रात्री वास्तव्यास असलेल्या मेंढपाळांच्या कुटुंबावर हल्ले होणे, दरोडे पडणे, मेंढपाळांच्या महिलांवर अत्याचार करुन त्यांच्यावर बलात्कार होणे, काही मेंढपाळांची हत्या होणे इत्यादी भयंकर प्रसंगाना मेंढपाळांना सामोरे जावे लागत आहे.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे...

तेव्हा चराऊ कुरणांचा प्रश्न अतिशय गंभीर झालेला आहे. काल धनगर समाजाचा ऐतिहासिक मोर्चा नागपूर शहराने पाहिला. नागपूरमधील मागील 25 वर्षाचा रेकॉर्ड ब्रेक करणारा हा मोर्चा होता. या मोर्चाची आरक्षणाच्या बरोबर चराऊ कुरण उपलब्ध करुन द्यावे अशी देखील प्रमुख मागणी होती. या सर्व बाबींचा विचार करुन राज्यातील मेंढपाळांच्या मेंढ्या व शेळ्यांसाठी चराऊ कुरणे उपलब्ध करुन द्यावीत अशी मागणी मी औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री संजय दत्त : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, मुंबईत 26/11 ची घटना घडल्यानंतर पोलीस सक्षमीकरणाची चर्चा वारंवार होत असली तरी आजघडीला राज्यातील केवळ एक टक्का पोलिसांसाठी बुलेटप्रुफ जॅकेट असल्याची धक्कादायक माहिती पुढे आली आहे. राज्यातील दोन लाखांहून अधिक पोलिसांसाठी केवळ 2 हजार बुलेटप्रुफ जॅकेटस् उपलब्ध आहेत. राज्य शासनाच्या घोषणेनुसार नव्याने पाच हजार जॅकेटस मिळाली तरी एकूण मनुष्यबळाच्या तुलनेत त्यांचे प्रमाण अत्यंत नगण्य असल्याचे स्पष्ट होते. 26/11 च्या वेळी शहीद झालेले एटीएसचे तत्कालीन प्रमुख हेमंत करकरे यांनी हल्ल्यावेळी वापरलेल्या बुलेटप्रुफ जॅकेटच्या दर्जावरुन खात्याची मोठी नाचक्की झाली होती. आजतागायत गेल्या पाच वर्षामध्ये केवळ दोन वेळा 2011 साली 2 हजार जॅकेटसची खरेदी केली गेली. त्यानंतर जॅकेटच्या दर्जाबाबत पोलीस मुख्यालयातील समिती व गृह विभागामध्ये मतभेद झाल्याने 10 वेळा टेंडर काढूनही खरेदी होऊ शकली नाही. राज्यात पोलिसांची संख्या पाहता बुलेटप्रुफ जॅकेटचा दर्जा व वैधता पडताळल्यानंतर जास्तीत जास्त पोलिसांच्या संख्येनुसार बुलेटप्रुफ जॅकेट खरेदी करण्यात यावी अशी मागणी मी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनास करीत आहे.

--------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

राज्यातील कायम शब्द काढलेल्या सुमारे 1212 माध्यमिक शाळांची जुजबी त्रुटी काढण्याची प्रक्रिया सध्या सुरु आहे. प्रत्यक्षात गेल्या दहा वर्षापासून राबत असलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नोकरीतून कमी करुन अनुशेष भरण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे. यातून शेकडो शिक्षकांच्या नोकऱ्या जात असून सरकार विरोधी अनेक खटले उभे राहत आहेत. त्याच बरोबर गेली 10 वर्षे राबत असलेल्या शिक्षकांना सेवा संरक्षण देण्याच्या संदर्भात चर्चा चालू असताना या जुजबी त्रुटीच्या नावाखाली शिक्षकांना नोकरीतून कमी करणे हे अन्यायकारक आहे. तेव्हा या शिक्षकांना संरक्षण देण्याच्या दृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी यासाठी मी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाचे लक्ष वेधत आहे.

------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल भोसले : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

राज्यात 8500 बेरोजगार संस्था असून सुमारे दीड लाख सुशिक्षित बेरोजगार आहेत. शासन धोरणानुसार बेरोजगार संस्थांना 16.50 टक्के कामाचे कंत्राट व संस्थांचे वर्गीकरण विना निविदा कामाची मर्यादा 15 लाख इतकी निश्चित केली आहे. असे असताना शासनाच्या विविध विभागामार्फत, कामाचे ठेके सुशिक्षित बेरोजगार संस्थांना न देता मर्जीतील ठराविक कंत्राटदारांना दिले जातात याबाबत विधानमंडळामध्ये वारंवार चर्चा होऊन एक महिन्यात निर्णय घेण्यात येईल असे सभागृहात वेळोवेळी आश्वासित देखील करण्यात आले आहे. सद्य:स्थितीत शासकीय विभागामध्ये ब-याच बेरोजगार संस्था काम करीत आहेत. परंतु कामाचे कंत्राट शासन धोरणानुसार 16.50 टक्के या पध्दतीने सुशिक्षित बेरोजगार संस्थांना न देता, केंद्रीय पध्दतीने निविदा काढून ते काम एकाच कंपनीला दिले जाते व त्या निविदेतील अटी व शर्ती देखील शासनाच्या संबंधित विभाग व कंत्राटदार यांच्या संमतीने ठरविल्या जातात. त्यामुळे शासनाचे धोरण असतानाही बेरोजगार संस्थांना कामे मिळत नसल्याने या संस्था सध्या बेकार स्थितीत आहेत. तरी या बाबत शासनाच्या धोरणानुसार बेरोजगार संस्थांना कामे देण्याबाबत शासनाने लक्ष घालून योग्य कार्यवाही करावी अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

--------

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी**. : मुंबई शहरातील आंबेडकर नगर, परेल (सायन).एफ-नॉर्थ विभागातील खाजगी जमिनीवरची एसआरए योजना मुंबई महानगरपालिकेच्या सभागृहाची परवानगी न घेता जी-नॉर्थ विभागातील मुंबई महानगरपालिकेच्या जमिनीवर एकत्रीकरण करण्यात येणे याबाबत श्री रामदास कदम, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.रामदास कदम ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

मुंबई शहरातील आंबेडकर नगर, परेल (सायन) एफ / नॉर्थ विभागातील खाजगी जमिनीवरची एसआरए योजना मुंबई महानगरपालिकेच्या सभागृहाची परवानगी न घेता जी-नॉर्थ विभागातील मुंबई महानगरपालिकेच्या जमिनीवर एकत्रीकरण करण्यात येणे, यामध्ये जवळपास 2 हजार स्वे.मीटर जमीन लाटण्यात येणे,

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

सदर बाब महानगरपालिकेच्या नगररचना विभागाने झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील अधिकाऱ्यांना कळविणे, सदरची फाईल गहाळ करण्यात येणे, सदर योजनेतील विक्रीचा भाग इंडियाबुल्स कंपनीला करोडो रुपयांना विकण्यात येणे, दाभोळकरवाडी, शिवडी येथील जवळपास 34 हजार चौ.मी. मुंबई महानगरपालिकेची जमीन एस.आर.ए. योजना करुन 70 टक्के कन्सेंट मिळत नसल्यामुळे शेजारील जमीन एकत्र करणे, तसेच जवळपास 700-800 झोपडपट्टीधारकांना अपात्र ठरवून रस्त्यावर आणणे व सदर योजनेतील सेल कॉम्पोनंट एल अँड टी कंपनीला 600 कोटी रुपयांना विकण्यात येणे, सत्यम सिनेमा, वरळी सदर योजनेमध्ये 90 फूट रस्ता 40 फूट करुन एस.आर.ए. योजना करण्यात येणे, यामध्येही महानगरपालिकेचे नुकसान होणे, गोपाळनगर, वरळी मुंबई महानगरपालिकेच्या जवळपास 32 हजार चौरस मीटर जमिनीवर एसआरए योजना राबवून तेथे विक्रीसाठी 4 चौरस मीटर सदनिका बनविण्यात येत आहे. यामध्ये महानगरपालिकेचे नुकसान होणे, या सर्व योजनेमध्ये महानगरपालिकेचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होत असल्याने या प्रकरणी शासनाने तातडीने चौकशी करुन संबंधितांवर कडक कारवाई करण्यात यावी, अशी मी विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे विनंती करीत आहे.

या बाबत मी माननीय मुख्यमंत्री, माननीय नगर विकास राज्यमंत्री श्री.उदय सामंत, मुख्य सचिव, आयुक्त यांना पत्र लिहिले आहे. मुंबई महापालिकेच्या माध्यमातून एवढा मोठा भ्रष्टाचार झाला असून, त्या संदर्भातील फाईल्स गहाळ झाल्या आहेत. या संदर्भातील निवेदन मी काल माननीय मंत्र्यांना दिलेले आहे. त्यामुळे या प्रकरणी तातडीची कार्यवाही व्हावी अशी मी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून विनंती करतो.

----------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : नर्सिंग कॉलेजमध्ये सी.ई.टी. परीक्षेनंतर झालेले प्रवेश नियमित करणे, या बाबत श्री.चंद्रकांत पाटील वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

महोदय, नर्सिंग कॉलेजमध्ये सी.ई.टी. परीक्षेनंतर मोठ्या प्रमाणावर जागा रिक्त राहतात. रिक्त राहिलेल्या जागांची जाहिरात देऊन ते प्रवेश करु शकतो असा उच्च न्यायालयाने निर्णय दिलेला आहे. त्यानुसार 640 विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आले. त्यांची पहिल्या वर्षी परीक्षा झाली. परंतु नाशिक आरोग्य विद्यापीठ त्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशाला परवानगी देत नसल्यामुळे परीक्षेचा निकाल लागत नाही. त्यामुळे एका विद्यार्थ्याने आत्महत्या केली आहे. माननीय मंत्र्यांनी आश्वासन दिले होते की, या अधिवेशनात या संदर्भातील शासन निर्णय निर्गमित करण्यात येईल. आज अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी माननीय मंत्र्यांना विनंती करतो की, त्यांनी या विषयी शासन निर्णय निर्गमित केला तर 640 विद्यार्थ्यांचे प्रवेश नियमानुसार होतील.

---------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात 25 सप्टेंबर, 1930 मध्ये झालेल्या चिरनेर जंगल सत्याग्रहातील हुतात्म्याच्या स्मारकांची झालेली दयनीय अवस्था, या बाबत श्री.सुभाष चव्हाण वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात दि.25 सप्टेंबर, 1930 मध्ये झालेल्या चिरनेर जंगल सत्यागृहातील हुतात्म्यांच्या स्मृती कायम तेवत राहण्यासाठी उरण परिसरात हुतात्म्यांच्या मूळ गावी शासनाने उभारलेल्या आठ हुतात्म्यांच्या स्मारकांपैकी एक-दोन स्मारकांचा अपवाद वगळता उर्वरित स्मारकांची अवस्था अतिशय दयनीय झालेली आहे. संबंधित विभागाच्या अक्षम्य दुर्लक्षपणामुळे या स्मारकांचा वापर मुतारी, शौचालय व शेतीची अवजारे ठेवण्यासाठी करण्यात येत असल्याचे आढळून आले आहे. या स्मारकांचा उकिरडा करण्यात आलेला आहे. दरवर्षी 25 सप्टेंबर रोजी चिरनेर येथे स्मृती दिन साजरा केला जातो. बंदुकीच्या फैरी झाडून हुतात्म्यांना मानवंदनाही देण्यात येते. विविध कार्यक्रमांमध्ये स्मारकांच्या देखभालीसाठी व विकास कामासाठी निधी देण्याची आश्वासने देण्यात येतात. परंतु कार्यक्रम संपताच दिलेली आश्वासने विसरली जातात. अशाप्रकारे हा कार्यक्रम करुन व देखावा निर्माण करुन हुतात्म्यांच्या नातेवाईकांच्या जखमेवर मीठ चोळण्यात येत आहे. अशा या अतिशय गंभीर व महत्त्वाच्या विषयावर मी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

---------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु.शी.** : चंद्रपूर वन परिक्षेत्र कार्यालय व जिल्हा परिषद कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी महिला कर्मचाऱ्यांची केलेली छेडखानी, या बाबत श्रीमती शोभा फडणवीस वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

महोदय, चंद्रपूर जिल्ह्यातील मूल येथे बफर झोन वनपरिक्षेत्र कार्यालयातील एका महिला वन कर्मचाऱ्याची त्याच कार्यालयातील वन अधिकाऱ्याकडून छेडखानी होत असल्याची तक्रार चंद्रपूर येथील वनसंरक्षक कार्यालयात सदर महिला कर्मचाऱ्याने करणे, परंतु सदर प्रकरणाची अद्यापही चौकशी न होणे, सदर महिलेला रजेवर जाण्याचा सल्ला देऊन सदर प्रकरण दाबण्याचा चाललेला प्रकार, त्यातच चंद्रपूर जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत एका ग्रामपंचायतीतील ग्रामसेविकेला बदली प्रकरणी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांच्याकडूनही छेडखानीचा घडलेला प्रकार, विदर्भात महिलावर छेडखानीचे वाढते प्रमाण, त्यामुळे सदर प्रकरणाची योग्य चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची नागरिकांकडून होत असलेली मागणी, परिणामी महिला वर्गामध्ये पसरलेली संतापाची लाट, शासनाचे याकडे होत असलेले दुर्लक्ष, शासनाने यावर त्वरित करावयाची कार्यवाही, त्याकरिता वरील विषयाच्या संदर्भात मी ही विशेष उल्लेखाची सूचना उपस्थित करीत आहे. माझी विनंती आहे की, या प्रकरणी शासनाने न्याय द्यावा.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी**. : अप्रशिक्षित प्राथमिक शिक्षकांना सेवानिवृत्ती वेतन मिळत नसणे, या बाबत श्री.रामनाथ मोते वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

महोदय, या विषयाचे औचित्य दिनांक 17 डिसेंबर, 2013 रोजी होते. या बाबत मी आपणांस पत्र दिले होते. परंतु त्या वेळी मला संधी मिळाली नाही. परंतु आज तो विषय मांडण्यास संधी दिल्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो.

महोदय, साधारणत: सेवानिवृत्तीनंतर शिक्षकांना पेन्शन मिळते. परंतु दिनांक 30 जून, 1972 नंतर सेवेत लागलेल्या अप्रशिक्षित प्राथमिक शिक्षकांना सेवानिवृत्ती वेतन मिळत नाही. त्यांना सेवानिृत्ती वेतनापासून वंचित ठेवले आहे. या शिक्षकांनी शिकविलेले विद्यार्थी आज आमदार, खासदार, मंत्री, डॉक्टर, इंजिनियर आहेत. हे शिक्षक सेवानिवृत्तीच्या वेळी केवळ अप्रशिक्षित असल्यामुळे त्यांना सेवानिवृत्ती वेतन मिळत नाही.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ....

ते रोजगार हमीच्या कामावर जात आहेत. मी हा विषय सभागृहात उपस्थित केला होता. आपण स्वत: अत्यंत कळकळीने हा विषय लक्षात घेऊन शासनाला निर्देश दिले होते की, हा सेवानिवृत्त शिक्षकांचा प्रश्न आहे, 25-30 वर्षे सेवा केलेल्यांचा अत्यंत महत्त्वाचा विषय आहे, शासनाने तातडीने याची दखल घ्यावी आणि योग्य ती कार्यवाही करावी. परंतु, अद्यापही काहीही झालेले नाही. माझी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती आहे की, आपण या शिक्षकांना सेवानिवृत्ती वेतन देण्याच्या संदर्भात विचार करावा. कारण काही जिल्ह्यात दिनांक 30 जून, 1972 नंतर आलेल्यांनाही सेवानिवृत्त वेतन मिळते. मात्र यांना मिळत नाही. हा भेद दूर व्हावा, अशी विनंती आहे.

----

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : नागपूर शहर व उपनगरांत तीन आसनी ऑटो रिक्षांच्या परवान्याचे नूतनीकरण करण्याची मुदत वाढविण्याबाबत श्री. मोहन जोशी, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. मोहन जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

विदर्भ ऑटोरिक्षा चालक फेडरेशनने आपल्या विविध मागण्यांसाठी विदर्भातील अकरा जिल्ह्यांतील ऑटोरिक्षा चालकांचा भव्य मोर्चा मागच्या आठवड्यात काढला होता. नागपूर शहर व उपनगरांत तीन आसनी ऑटोरिक्षांचे नवीन परवाने त्वरित सुरू करावेत, ऑटोरिक्षा 16 वर्षांनंतर परवान्यावरून उतरविण्याचा निर्णय त्वरित रद्द करावा, मूळ परवानाधारक व ऑटोरिक्षा चालक यांच्यात झालेल्या परस्पर ऑटोरिक्षा खरेदी विक्रीच्या व्यवहाराला मान्यता देऊन परवाना हस्तांतरण व योग्यता प्रमाणपत्र त्वरित देण्यात यावे, नागपूर शहरात व ग्रामीण क्षेत्रात अवैध प्रवासी वाहनावर त्वरित बंदी आणावी, शाळकरी 10 मुले ऑटोरिक्षातून ने-आण करण्याची परवानगी द्यावी आणि स्कूल बसच्या परवान्याची संख्या निश्चित करावी, परवाना नूतनीकरणाची विधिग्राह्यता संपल्यानंतर परवाना 6 महिन्यांच्या आत नूतनीकरण न केल्यास परवाना रद्द करण्याचा निर्णय त्वरित मागे घ्यावा, सन 1997 नंतरचे परवाने नूतनीकरण करण्याची मुदत वाढविण्यात यावी, या मागण्या मान्य कराव्यात, अशी विनंती मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

सभापती महोदय, विदर्भातील 11 जिल्ह्यांतील रिक्षा चालक-मालक संघटनांनी मागील आठवड्यात विधान भवनावर भव्य मोर्चा आणला होता. नागपूरमध्ये रिक्षाचे नवीन परवाने गेल्या अनेक वर्षांपासून देणे बंद आहे, ते सुरू करण्याची त्यांची मागणी आहे. 16 वर्षांनंतर रिक्षा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोहन जोशी ....

परमिटवरून उतरण्याचा नवीन कायदा काढला आहे, तो रद्द करावा आणि शहरात ऑटोरिक्षातून 10 शाळकरी मुलांना नेण्याची परवानगी होती, ती 6 शाळकरी मुलांची केली आहे. अशा 2-4 मागण्या होत्या. विदर्भातील 11 जिल्ह्यांतील रिक्षाचालकांना शासनाने न्याय द्यावा, अशी मागणी मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून करीत आहे

----

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सभागृहाची बैठक आता मध्यंतरासाठी स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक दुपारी 2.30 वाजता पुन: भरेल.

(दुपारी 1.51 ते 2.30 पर्यंत मध्यंतर)

----

( नंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( मध्यंतरानंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेबाबत**

**सभापती** : माझ्याकडे आज नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना आलेली आहे. त्याबाबत मी निर्णय घेतलेला नाही. या संदर्भात मी चर्चा करुन निर्णय घेणार आहे.

----

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबई शहर प्राथमिक शिक्षण, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण, हैद्राबाद सक्तीचे प्राथमिक शिक्षण व मध्य प्रदेश प्राथमिक शिक्षण (निरसन) विधेयक

L. A. BILL NO. XXIII OF 2013 (A BILL TO REPEAL THE CITY OF MUMBAI PRIMARY EDUCATION ACT, THE MAHARASHTRA PRIMARY EDUCATION ACT, THE HYDERABAD COMPULSORY PRIMARY EDUCATION ACT, 1952 AND THE MADHYA PRADESH PRIMARY EDUCATION ACT, 1956 AND TO PROVIDE FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.) AND MOTIONS FOR REFERRING THE BILL TO THE JOINT COMMITTEE

श्री.राजेंद्र दर्डा ( शालेय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्या प्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2013 चे वि.स.वि.क्रमांक 23, मुंबई शहर प्राथमिक शिक्षण अधिनियम, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण अधिनियम, हैद्राबाद सक्तीचे प्राथमिक शिक्षण अधिनियम, 1952 आणि मध्य प्रदेश प्राथमिक शिक्षण अधिनियम, 1956 निरसित करण्याकरिता व तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी विधेयक मांडतो.

**सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्या प्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2013 चे वि.स.वि.क्रमांक 23, मुंबई शहर प्राथमिक शिक्षण अधिनियम, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण अधिनियम, हैद्राबाद सक्तीचे प्राथमिक शिक्षण अधिनियम, 1952 आणि मध्य प्रदेश प्राथमिक शिक्षण अधिनियम, 1956 निरसित करण्याकरिता व तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, सन 2013 चे वि.स.वि.क्रमांक 23 हे विधेयक दोन्ही सदनाच्या सदस्यांच्या संयुक्त समितीकडे पाठविण्याचा निर्णय मागील अधिवेशनामध्ये झाला होता. तरी देखील हे विधेयक सभागृहासमोर विचारार्थ आलेले आहे. या विषयावर विस्तृतपणे चर्चा होणे

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे....

आवश्यक आहे. शिक्षणाच्या दृष्टीने हे विधेयक महत्वाचे आहे. त्यामुळे सदरहू विधेयक दोन्ही सदनाच्या सदस्यांच्या संयुक्त समितीकडे पाठविण्यात यावे अशी मी आपल्याला विनंती करतो.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, सन वि.स.वि.क्रमांक 23 हे विधेयक शिक्षणाच्या दृष्टीने महत्वाचे आहे. या विधेयकासंबंधी सांगोपांग चर्चा होणे आवश्यक आहे. त्यामुळे दोन्ही सदनाच्या सदस्यांच्या संयुक्त समितीकडे हे विधेयक पाठविण्यात यावे, तेथे या विधेयकावर सविस्तर चर्चा झ ाल्यानंतर पुन्हा हे विधेयक सभागृहासमोर मांडण्यात यावे अशी मी आपल्यामार्फत मंत्री महोदयांना विनंती करतो.

नंतर श्री.शिगम.......

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 13:35

**सभापती** : सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे यांनी विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव दिलेला आहे. त्यांनी तो मांडावा.

डॉ. नीलम गो-हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडते.

"सन 2013चे वि.स.वि. क्रमांक 23 - मुंबई शहर प्राथमिक शिक्षण, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण, हैद्राबाद सक्तीचे प्राथमिक शिक्षण व मध्यप्रदेश प्राथमिक शिक्षण (निरसन) विधेयक, 2013 विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या 45 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

सभापती महोदय, आपणास विनंती आहे की, शिक्षणाच्या विषयामध्ये सुसंगत भूमिका आणि धोरणे अत्यावश्यक असतात. अनेक वर्षापासून शिक्षण क्षेत्रामध्ये आपण सुधारणा करण्याचा प्रयत्न करीत आहोत. त्या पार्श्वभूमीवर शिक्षण हा मूलभूत अधिकार आहे असे म्हणून स्थानिक संस्थांचे सर्व अधिकार केंद्रीभूत करणे कितपत योग्य आहे या मुद्यावर चर्चा होणे गरजेचे आहे. त्याच प्रमाणे जो शिक्षण मंडळांचा कारभार आहे त्याबाबतीत मुदतवाढ देऊन शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांचा उपयोग कसा करुन घेता येईल यासाठी दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांकडून विचारविनिमय होणे आवश्यक आहे. पुणे महानगरपालिका, ठाणे महानगरपालिका, कल्याण डोंबिवली महानगरपालिका अशा अनेक महानगरपालिकांचे या संदर्भात ठराव आहेत. म्हणून मला असे वाटते की, शिक्षणाचा जो मूलभूत अधिकार आहे त्यामध्ये खूप सुधारणा व्हायला पाहिजेत. त्या करीत असताना अधिकार केंद्रीभूत केल्यामुळे शिक्षणाच्या दर्जा निश्चितपणे सुधारेल का याबाबत पुनर्विचार होणे गरजेचे असल्यामुळे हे विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठवावे अशी माझी विनंती आहे.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव दिलेला आहे. त्यांनी तो मांडावा.

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडते .

"सन 2013चे वि.स.वि.क्रमांक 23 - मुंबई शहर प्राथमिक शिक्षण, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण, हैद्राबाद सक्तीचे प्राथमिक शिक्षण व मध्यप्रदेश प्राथमिक शिक्षण (निरसन) विधेयक, 2013 विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या 45 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांचा आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

सभापती महोदय, मराठवाडयाचा आणि विदर्भाचा काही भाग निजामातून आणि काही भाग मध्यप्रदेशातून आलेला असून अशा प्रकारचा विदर्भ महाराष्ट्रामध्ये सामील झालेला आहे. 1960 मध्ये महाराष्ट्राची निर्मिती झाली. नागपूर महानगरपालिकेचे क्षेत्र असेल किंवा हैद्राबादी कायदे असतील, या निजामाच्या आणि मध्यप्रदेशाच्या कायद्यामध्ये आम्ही आजही अडकलो आहोत. त्या कायद्यामध्ये कोणताही बदल झालेला नाही. प्राथमिक शिक्षणाच्या दृष्टीने काही बदल करावयाचा असेल तर त्याबाबतीत मोठ्या प्रमाणावर चर्चा होण्याची गरज आहे. ज्या काही गोष्टी आम्हाला लागणार आहेत, ज्या काही गोष्टी आवश्यक आहेत त्या आम्हाला मिळाल्या पाहिजेत आणि त्यासाठी या विधेयकासंबंधी सखोल चर्चा होणे आवश्यक असल्यामुळे हे विधेयक दोन्ही सभागृहाच्या संयुक्त समितीकडे पाठवावे अशी मी आपणास विनंती करते.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

**सभापती** : आता विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न व विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबतच्या प्रस्तावावर एकत्रित चर्चा होईल. त्यानंतर विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचे प्रस्ताव प्रथम मतास टाकले जातील व ते असंमत झाल्यास विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल. आता सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण सुरु करावे.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, माननीय शिक्षण मंत्री श्री. राजेंद्र दर्डा यांनी हे विधेयक या ठिकाणी मांडलेले आहे. हे विधेयक दोन्ही सभागृहाच्या संयुक्त समितीकडे विचारार्थ पाठविण्यास माझा पाठिंबा आहे. माझे म्हणणे असे आहे की, आता विविध महानगरपालिकांच्या शिक्षण समित्यांवर सदस्यांच्या नियुक्त्या झालेल्या आहेत. जे सदस्य तेथे गेलेले आहेत ते त्यांची टर्म संपेपर्यंत राहिले पाहिजेत. यानंतर कोण येणार हा प्रश्न आहे. आता राजकारण बदलत चालले आहे. पोलिटिकल सिस्टिमवरचा लोकांचा विश्वास वाढायचा असेल तर पोलिटिक अपॉईण्टमेण्टस् होता कामा नयेत असा विचार आपण शिक्षण क्षेत्राच्या बाबतीत तरी निश्चितपणे केला पाहिजे. राजकीय कार्यकर्ता जो शैक्षणिकदृष्टया कॉम्पीटण्ट आहे तो तेथे नक्की जावा. पण एखाद्याला नगरसेवकाची तिकीट मिळाली नाही म्हणून तुला तिकडे ॲडजस्ट करतो, महिला वॉर्ड झ ााला म्हणून तिकडे ॲडजस्ट करतो असे जे काही चाललेले आहे ते आपण स्वत:हून थांबविण्याची गरज आहे. आता जे लोक जाऊन बसलेले आहेत ते कोणत्या ना कोणत्या कमिटमेण्टच्या आधारे तेथे जाऊन बसलेले आहेत. त्यांना काढणे हा जस्टीस होईल असे मला वाटत नाही. हे विधेयक संयुक्त समितीकडे जात असताना या मुद्यांचा विचार व्हावा. आपणावर देखील बंधने आली, कार्यकर्त्यांचा दबाव आला तर त्यांनाही आपण सांगू शकतो की, या गोष्टी कायद्याने झालेल्या आहेत. तेव्हा संयुक्त समितीमध्ये या सर्व गोष्टींचा आपण विचार करावा असे मला आग्रहाने वाटते.

----

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांनी जे विधेयक या ठिकाणी आणलेले आहे त्यामध्ये केवळ हैद्राबाद सक्तीचे प्राथमिक शिक्षण व मध्यप्रदेश प्राथमिक शिक्षण(निरसन) अधिनियम नसून मुंबई शहर प्राथमिक शिक्षण आणि महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण यामध्ये बदल करणारे हे विधेयक आहे. या विधेयकाच्या अनुषंगाने सर्व शिक्षण मंडळे मग ती नगरपालिकांची असतील किंवा महानगरपालिकांची असतील, ती बरखास्त करण्याचे शासनाचे धोरण दिसत आहे. हा विषय अत्यंत महत्वाचा असल्यामुळे यावर सर्वंकष विचार होण्याची आवश्यकता आहे. हा विचार होण्यासाठी हे विधेयक संयुक्त समितीकडे जाण्याची नितांत गरज आहे.

सभापती महोदय, शिक्षण मंडळे सुरु ठेवण्याच्या संदर्भात शासनाने कार्यवाही करावी अशा प्रकारचे आदेश उच्च न्यायालयाने दिलेले आहेत. हे विधेयक संयुक्त समितीकडे जाऊन पुन्हा सभागृहामध्ये येईल. यामध्ये कालावधी जाईल. आता राईट टू एज्युकेशन अंतर्गत विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा देखील प्रश्न आहे. त्याबाबतीत काही प्रशासकीय निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. तोपर्यंत ही शिक्षण मंडळे किंवा त्यांना दिलेले अधिकार सुरु ठेवून हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठवावे अशी मी आपल्या माध्यमातून मंत्री महोदयांना विनंती करतो.

---

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र दर्डा (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, राज्यातील सर्व विद्यार्थ्यांना गुणात्मक आणि दर्जेदार शिक्षण देण्याची जबाबदारी शिक्षण विभागाची असते. महाराष्ट्र शासनाने सर्व ठिकाणी प्राथमिक आणि माध्यमिक शाळा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. 1960 मध्ये महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीच्या अगोदरपासून काही भाग हा हैद्राबाद राज्याशी सलंग्न होता. काही भाग सी.पी.ॲन्ड बेरारशी सलंग्न होता. त्यामुळे ज्या प्राथमिक आणि माध्यमिक शाळा आहेत त्या संदर्भात आपल्याकडे सध्या चार अधिनियम अस्तित्वात आहेत. महाराष्ट्र प्रादेशिक शिक्षण अधिनियम, 1947, नंतर तो 1961 चा झाला. मुंबई शहर प्राथमिक अधिनियम, 1920, मध्यप्रदेश प्राथमिक शिक्षण अधिनियम, 1956 आणि हैद्राबाद सक्तीचा प्राथमिक अधिनियम, 1952 म्हणजे या चार अधिनियमाच्या माध्यमातून आज विविध माध्यमिक व प्राथमिक शाळा आजही चालतात. यासंदर्भात जे नियम आहेत, जे निर्णय होतात, आदेश, परिपत्रके या अधिनियमाच्या माध्यमातून हाताळण्यात येतात.

सभापती महोदय, 2002 मध्ये भारतीय घटनेत दुरुस्ती होऊन 6 ते 14 वयोगटातील सर्व बालकांना प्राथमिक शिक्षण मोफत देण्याचा मूलभूत अधिकार देण्यात आला. त्या अनुषंगाने 2009 चा कायदा पारित झाला. आज राईट टू एज्युकेशनमध्ये अथवा शिक्षणाचा अधिकारामध्ये ज्या गोष्टी आहेत त्या आणि या चार अधिनियमामध्ये ज्या गोष्टी आहेत त्यामध्ये फरक आहे. त्यामुळे संपूर्ण कायद्यासाठी एकच कायदा असला पाहिजे अशी या मागची मूळ कल्पना आहे. हे विधेयक पास केल्यामुळे ही गोष्ट निश्चित होणार आहे.

सभापती महोदय, दुसरी गोष्ट अशी होणार आहे की, आज महाराष्ट्रामध्ये विदर्भ, मराठवाडा आणि मुंबई यापैकी मुंबई येथे वेगळी परिस्थिती आहे. नाशिक, पुणे महसूल आणि कोकणमध्ये सध्या नगरपालिका आणि महानगरपालिकांमध्ये शिक्षण मंडळे अस्तित्वात आहेत. आज मुंबई विभाग, नाशिक विभाग, पुणे विभाग आणि कोल्हापूर विभाग मिळून 53 महानगरपालिकांमध्ये ही विविध शिक्षण मंडळे आहेत. तर याच भागातील महानगरपालिकांमध्ये 17 शिक्षण मंडळे आहेत. आज यांच्या माध्यमातून त्या त्या शहरामध्ये शिक्षणाच्या दृष्टीने कामे होतात. हे विधेयक पास झ ाल्यानंतर ही मंडळे बरखास्त होणार आहेत आणि त्यामुळेच आम्ही हा प्रस्ताव आणत आहोत.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ ST/

श्री.राजेद्र दर्डा...

यापुढे महानगरपालिका क्षेत्रामध्ये महानगरपालिका आयुक्त आणि जिल्हा परिषद क्षेत्रामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी या बाबी हाताळणार आहेत. विधानसभेत चर्चा करीत असताना, ज्याचा उल्लेख सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी केला आहे, सध्या जी शिक्षण मंडळे अस्तित्वात आहेत, ती आपण आहेत तशीच ठेवावीत अशा प्रकारची सूचना विधानसभेत आली,

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र दर्डा......

ती आपण मान्य केली आहे. त्या सूचनेसह विधानपरिषदेत हे विधेयक आणले आहे. सभागृहाच्या भावना माझ्या लक्षात आल्या आहेत. त्याबद्दल उचित कार्यवाही करावी लागेल. त्यासाठी खालच्या सभागृहात प्रस्ताव घेऊन जावे लागेल. आपल्याला समिती गठीत करावी लागेल. मी या ठिकाणी चर्चा थांबवितो. सभागृहाच्या भावनांची मी दखल घेतली आहे.

**सभापती** : मंत्री महोदयांनी केलेल्या विनंतीनुसार मी या विधेयकावरील चर्चा या ठिकाणी थांबवितो. मंत्री महोदयांनी पुढील वेळी रीतसर प्रस्ताव मांडावा.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अशासकीय कामकाज (विधेयके)**

**सभापती** : माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी त्यांच्या सन 2011 चे वि.प.वि.क्रमांक 8 वरील चर्चा सुरु करावी.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आदर्श घोटाळ्यासंबंधीचा विषय महत्वाचा आहे. विधानसभेत आदर्श घोटाळ्यासंबंधी नेमलेल्या आयोगाचा अहवाल सादर करण्यात आला आहे. या सभागृहाच्या पटलावर देखील हा अहवाल ठेवण्यात यावा. हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. तोपर्यंत सभागृहाची बैठक तहकूब करावी अशी मी विनंती करतो. या ठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांना पाचारण करावे. सभागृहाचे नेते या ठिकाणी उपस्थित होते, त्यांच्याकडून हा अहवाल मांडला जाईल अशी आमची अपेक्षा होती. परंतु ते सभागृहातून निघून गेले आहेत.

**सभापती** : तोपर्यंत अशासकीय कामकाज सुरु करावे.

श्री.दिवाकर रावते : नाही. आपण सभागृहाची बैठक तहकूब करावी.

**सभापती** : सभागृहाची बैठक मी 30 मिनिटांकरिता तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 2 वाजून 47 मिनिटांनी 30 मिनिटांकरिता तहकूब झाली.)

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**<u>वरळी, मुंबई येथील कॅम्पाकोला निवासी संकुलातील अनधिकृत बांधकामासंबंधी</u>**

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री सभागृहात आलेले आहेत. आज सकाळी नगरविकास विभागावर चर्चा होती. त्यावेळी मी कॅम्पाकोलाचा विषय उपस्थित करणार होतो. मुंबईतील कॅम्पाकोला कॅम्पसचा विषय गेल्या काही दिवसांपासून गाजत आहे. सुप्रीम कोर्टाने या प्रकरणाला सुमोटो स्टे दिलेला आहे. आता नव्याने सुप्रीम कोर्टाने म्हटले आहे की, यासंबंधी सरकारने रि-एग्झामीन करावे. तेव्हा शासन म्हणून आपले कोणते धोरण आहे, हे आम्हाला जाणून घ्यावयाचे आहे. त्यामुळे या प्रकरणातील मेरिट-डीमेरिट मध्ये मी जात नाही. कारण तेवढा वेळ नाही. जेवढा एफएसआय पर्मिसिबल आहे तेवढा निर्णय आपल्या पॉलिटिकल सिस्टीमने घेतला पाहिजे असे आमचे आग्रही मत आहे आणि ते भेटून त्या त्या वेळी मांडलेले आहे. त्यावेळी सुप्रीम कोर्टाचे कडक बंधन होते असे आपण म्हणत होता. शेवटी Judiciary has to interpret the Law. आता सुप्रीम कोर्टानेच सांगितले असल्यामुळे त्यासंबंधी शासनाचे काही धोरण ठरले आहे काय ?

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, कॅम्पाकोला हा विषय एका प्रश्ना पुरता मर्यादित नाही. आपण नेहमी वेगवेगळ्या धोरणांचा स्वीकार केला आहे. कोणाच्याही डोक्यावरचा आसरा काढून न घेणे हे आपले धोरण राहिले आहे. कॅम्पाकोलाच्या प्रकरणामध्ये सर्व न्यायिक प्रक्रिया झाल्यानंतर एक गोष्ट समोर आली आहे ती मी माननीय मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून देतो. महापालिकेने हे बांधकाम नियमित करण्यासाठी नोटीसेस दिल्या होत्या. हा पत्रव्यवहार कोर्टाच्या रेकॉर्डवर देखील आलेला नाही. तो रेकॉर्ड आता मिळालेला आहे. ही नवीन डेव्हलपमेंट आहे. महापालिकेने आपली स्वतःची माहिती कोर्टासमोर कधीच आणली नाही ती माहितीच्या अधिकाराखाली त्या बाधित लोकांनी मिळविलेली आहे. 1992-93 मधील ही माहिती आहे. महानगरपालिकेला देखील हे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप....

बांधकाम नियमित करावे असे वाटले होते. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी पर्मिसिबल एफएसआय देण्याची मागणी केली आहे. यात व्हॉयलेशन झाले असेल तर त्या नंतरच्या गोष्टी आहेत. तेव्हा यासंबंधी माननीय मुख्यमंत्र्यांनी मानवतेच्या दृष्टीने निर्णय घ्यावा अशी माझी विनंती आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, कॅम्पाकोलाच्या माध्यमातून मुंबईतील बेकायदेशीर बांधकामाबाबत शासनावर व मुंबई महानगरपालिकेवर बरीच चर्चा झाली. कॅम्पाकोला मधील बांधकाम मी कधीच बघितले नव्हते. बेकायदेशीर बांधकाम असल्यामुळे मी तेथे नंतर देखील गेलो नाही. कॅम्पाकोला संकुलात 25 वर्षे राहिल्यानंतर 156 कुटुंबाचे छप्पर जात आहे. मी त्यांच्या जागी असतो तर....असा प्रश्न आज माझ्या मनामध्ये आला म्हणून मी माहिती घेण्याचा प्रयत्न केला. या प्रश्नासंबंधी आदरणीय मुख्यमंत्र्यांच्या सोबत बैठक देखील झाली आहे. यात फक्त 19000 चौ.फूटाचे बांधकाम बेकायदेशीर असून उर्वरित बांधकाम राहू शकते. जे बांधकाम बेकायदेशीर आहे ते काढून टाकावे. ते ठेवण्यात येऊ नये. तेथे जे उपलब्ध चटई क्षेत्रफळ आहे त्यासंबंधातील पुनर्नकाशे सादर करण्यास सांगण्यात यावे व त्या कामाला नियमाच्या चौकटीत मान्यता देण्यात यावी. वाटल्यास त्यांच्याकडून जी काही पेनल्टी घ्यायची आहे ती घ्यावी व त्या लोकांचे छप्पर वाचवावे. 19000 चौ.फूटाचे अनधिकृत बांधकाम आपण काढून टाकावे. हा वाद कॅम्पाकोलाचा नसून मागे असलेल्या एसआरएच्या योजनेच्या भानगडीतून निर्माण झाला असावा असे मला वाटते.

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

त्यांना तेथून रस्ता हवा असून  हा वाद रस्त्यावरुन आहे. कॅम्पाकोला वासियांचे छप्पर वाचण्याची आता शक्यता निर्माण झालेली आहे. त्या ठिकाणी उपलब्ध चटई क्षेत्र असेल तर त्यांचे छप्पर वाचावे अशी आमची प्रामाणिक इच्छा आहे. जे अनाधिकृत व बेकायदेशीर असेल ते बेलाशक तोडावे. आता हा विषय माननीय मुख्यमंत्र्यांनी गांभीर्याने घेण्याची आवश्यकता आहे. अन्यथा बेकायदेशीर कॅम्पाकोला वाचविण्याकरिता सगळे पक्ष  धडपड करीत आहेत अशा प्रकारची प्रतिमा जनमानसात निर्माण होता कामा नये अशी माझी या मागची भूमिका आहे.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय सावंत : सभापती महोदय, कॅम्पाकोला सारख्या इतरही इमारती आहेत. यामध्ये 1967 चा कायदा वापरण्याची आवश्यकता आहे. खरे म्हणजे आता आपण 1991 चा कायदा आणलेला आहे. 1991 च्या रुल्स प्रमाणे कार्यवाही केली तर सर्व काम ॲथोराईज होईल. 1991 चा रुल ॲप्रूव्ह झालेला आहे. एकदा रुल रद्द केले की, ते रुल पुन्हा आपल्याला वापरता येत नाहीत. ज्या रुल्सने इमारती पास झालेल्या आहेत ते रुल्स पुढे घेतले गेले पाहिजेत. महानगरपालिकेचे म्हणणे आहे की, आम्हाला सुप्रीम कोर्टाने 1967 चे रुल वापरण्याचे आदेश दिलेले आहेत. अशा प्रकारच्या एकंदरीत तीन चारशे इमारती आहेत. या प्रकरणामध्ये महानगर पालिकेची तसेच शासनाचीही चूक झालेली नाही. हा विषय कोर्टाला समजून सांगता न आल्यामुळे हे प्रकरण घडले आहे. आता खरे म्हणजे आपल्याला 1991 च्या रुल्स प्रमाणे इमारती ॲप्रूव्ह करण्याची आवश्यकता असल्यामुळे यासंदर्भात जीआर काढून किंवा कायदा दुरुस्त करुन न्याय देण्याची आवश्यकता आहे.

---

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, कुणाचेही घर तुटावे असे कोणी म्हणणार नाही. परंतु कॅम्पाकोलाला जो काही न्याय देता येईल तो जरुर द्यावा. कॅम्पाकोलाला न्याय देत असतांना याच पध्दतीने झोपडपट्टयात असलेल्या सामान्य माणसांना सुध्दा न्याय देण्याची आवश्यकता आहे. मुंबईमध्ये कॅम्पाकोलाचा प्रश्न एका वेगळया पध्दतीने आला होता. मुंबईमध्ये शासन मान्य,अनुदानित असलेल्या बहुसंख्य शाळांचे स्ट्रक्चर अनाधिकृत आहे. या शाळांना अधिकृत मान्यता न मिळाल्यामुळे या शाळांची रि-डेव्हलपमेंट होऊ शकत नसल्यामुळे शाळकरी मुलांनाही न्याय देता येत नाही.

खरे म्हणजे आरटीईची अंमलबजावणी त्यामुळेच थांबलेली आहे. या प्रश्नाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री सर्व विचार करतील असा विश्वास आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी या विषयाच्या संदर्भात जी भूमिका घेतली ती अतिशय स्वागतार्ह आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यावेळेलाही स्वागतार्ह भूमिका घेतली होती. या सर्व प्रश्नावर माननीय मुख्यमंत्री लक्ष घालतील अशी अपेक्षा व्यक्त करतो.

---

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, कॅम्पाकोला इमारतीचे अनाधिकृत मजले पाडण्यासंबंधीचा विषय काही महिन्यापासून गाजत आहे. आपल्याला कल्पना आहे की, कॅम्पाकोला रहिवाशांचा तसेच मुंबई महानगरपालिकेचा वाद हा सन 2000 पासून सुरु आहे. सन 2000 मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेने कॅम्पाकोलामधील अनधिकृत मजले पाडण्याचा निर्णय घेतल्यानंतर हा वाद कोर्टात गेला. मुंबई उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयामध्ये हा वाद अनेक वेळेला गेलेला आहे. शेवटी सर्वोच्च न्यायालयाने फेब्रुवारी, 2013 मध्ये निर्णय दिला असून यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयात सरकार किंवा सरकारच्या कोणत्याही संघटनेने हस्तक्षेप करु नये, करता कामा नये अशी सक्त ताकीद फेब्रुवारी महिन्याच्या अंतिम निवाडयात दिली होती. बीएमसी किंवा राज्य शासनाने हस्तक्षेप करुन सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाविरुध्द काही करावयास जाणे हे सुध्दा शक्य नव्हते. कॅम्पाकोलाचे रहिवासी अनेक लोकप्रतिनिधींना भेटले होते. यासंदर्भात मी महाराष्ट्राच्या ॲडव्होकेट जनरल तसेच दिल्लीच्या ॲटर्नी जनरल यांचाही सल्ला घेण्यात आला होता. सुप्रीम कोर्टाने जो निर्णय घेतलेला आहे तो अत्यंत स्पष्ट व उल्लंघन न करणारा असून त्यामध्ये कोणीही हस्तक्षेप करता कामा नये असा सर्वांचा सल्ला घेतल्यानंतर आमचे मत तयार झ ाले. त्यानंतर सुप्रीम कोर्टाने या याचिकेचा फेरविचार केला. त्यामध्ये जर काही शक्यता असेल तर त्याचा पुनर्विचार करण्याला त्यांनी मुभा दिली आहे. फेब्रुवारी महिन्याचा सुप्रीम कोर्टाचा जो निर्णय होता तो त्यांनी शिथिल केलेला आहे.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण....

त्यावेळी मला भेटावयास आलेल्या लोकप्रतिनिधींना मी सांगितले की, मी मुंबई महानगरपालिकेला आदेश दिले आहेत की, या विषयाच्या सर्व बाजू तपासून पहाव्यात. शिवाय कॅम्पाकोला इमारतीतील रहिवाशांची आणि लोकप्रतिनिधींची बैठक घ्यावी असे देखील सांगितले आहे. मी सुध्दा त्या रहिवाशांची भेट घेऊन सहकार्य करणार आहे. त्यांनी तर्क दिला आहे की या कारणामुळे अमुक इतका एफएसआय शिल्लक आहे की, नाही, किती बांधकाम नियमित करता येईल, किती पाडावे लागेल या बाबत अभ्यास सुरु आहे. त्या इमारतीतील रहिवाशांना जास्तीत जास्त लाभ कसा देता येईल अशा प्रकारचा निर्णय कायद्यान्वये घेण्यास महापालिकेच्या अधिकाऱ्यांना सांगितले आहे. मुंबईला गेल्यानंतर व प्राथमिक चौकशी झाल्यानंतर मी स्वत: लोकप्रतिनिधींना भेटण्याचे आश्वासन दिलेले आहे. मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, सुप्रीम कोर्टाच्या स्वत:च्याच दुसऱ्या निवाड्यामुळे थोडासा मार्ग प्रशस्त झाला आहे. त्यामुळे त्यातून काही तरी मार्ग निघेल असे मला वाटते.

--------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : बृहन्मुंबई महानगरपालिका विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम-33 (9) मध्ये सुधारणा करण्याचे ठरविणे

**मु.शी.** : बृहन्मुंबई महानगरपालिका विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम-33 (9) मध्ये सुधारणा करण्याचे ठरविणे, या संबंधी मुख्यमंत्र्यांचे निवेदन

श्री.पृथ्वीराज चव्हाण ( मुख्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.प. नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो..

महोदय, बृहन्मुंबईच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये नागरी नूतनीकरण म्हणजेच क्लस्टर डेव्हलपमेंटच्या बाबत विनियमामध्ये काही बदल करण्याच्या किंवा सुधारणा करण्याच्या बाबतीत मी सभागृहाला आश्वासन दिले होते. मी दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने हे निवेदन करीत आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम-33 मध्ये वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करण्याविषयी तरतुदी आहेत. त्यानुसार धोकादायक किंवा असुरक्षित इमारतींचा पुनर्विकास, उपकर प्राप्त इमारतींचा पुनर्विकास, नागरी नूतनीकरण योजना (क्लस्टर डेव्हलपमेंट), झोपडपट्टी पुनर्विकास, या पुनर्विकास योजनांनाही अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक उपलब्ध होतो. विनियम-33 मध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी सुधारणा करुनही प्रत्यक्ष अंमलबजावणीमध्ये अडचणी येत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले होते. त्या अनुषंगाने उपयुक्त उपाययोजना सुचविण्यासाठी दिनांक 10 सप्टेंबर, 2012 च्या शासन निर्णयानुसार प्रधान सचिव (1), नगर विकास विभाग यांच्या समन्वयाखाली एक अभ्यास गट स्थापन करण्यात आला आहे. सदर अभ्यास गटाने अभ्यासाअंती नागरी नूतनीकरण योजनेच्या विनियम-33 (9) मध्ये सुधारणा करण्यासाठी शिफारशी सुचविल्या होत्या. शासनाने अभ्यास गटाच्या शिफारशींचा साधकबाधक विचार करुन, विनियम-33 (9) मध्ये सुधारणा करण्याचे तत्वत: ठरविले असून, त्यावर जनतेच्या सूचना व हरकती मागविण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, 1966 च्या कलम 37 (1) (a) (a) खाली सूचना त्वरित प्रकाशित करण्यात येईल.

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: आदर्श सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., कुलाबा, मुंबईचा चौकशी अहवाल सादर करणे

श्री.पृथ्वीराज चव्हाण (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने आदर्श सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, कुलाबा, मुंबई यासाठी शासकीय जमिनीचे वाटप करणे, संस्थेस वेळोवेळी विविध परवानग्या देणे व इतर संबंधित विषयांची चौकशी करण्याच्या प्रयोजनासाठी गठीत करण्यात आलेल्या द्विसदस्यीय चौकशी आयोगाने शासनास सादर केलेल्या चौकशी अहवालाचा भाग-2 व त्यावर शासनाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल (एटीआर) सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे. सन्माननीय सदस्यांना अहवालाच्या प्रतींचे वाटप करण्यात यावे.

श्री.विनोद तावडे : महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी नुकताच आदर्श गृहनिर्माण संस्थेच्या बांधकामाबाबतचा चौकशी अहवाल सभागृहासमोर ठेवला आहे. कमिशन ऑफ इन्क्वॉयरी ॲक्ट अंतर्गत सभागृहामध्ये केवळ शोभेसाठी अहवाल ठेवणे योग्य नाही. तो अहवाल मांडून त्यावर चर्चा करावयास पाहिजे. तो अहवाल स्वीकारावा की नाही, या बाबतचा अधिकार शासनाला दिलेला आहे. विधिमंडळात अहवाल सादर करणे याचा अर्थ विधिमंडळात त्यावर चर्चा घडवून आणणे असा आहे. हा अहवाल अगोदर विधानसभेमध्ये मांडण्यात आलेला आहे. तो अहवाल मी चाळला आहे. 'आदर्श' म्हणजे काय ? संस्कृत भाषेमध्ये जो दर्शवितो तो 'आदर्श' होय.

नंतर श्री.कांबळे....

अस्सुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

आदर्शचा अहवाल राज्यातील भ्रष्टाचार दर्शवितो, अनैतिकता दर्शवितो. कमिशनने देखील त्यामध्ये हेच म्हटले आहे. अहवालावर चर्चा झाली पाहिजे. एटीआर दिला आहे, तो त्यांनी का स्वीकारला नाही, हे आम्हाला कळत नाही. त्याची काही कारणे असतील. परंतु, ती कारणे आम्हाला समजली पाहिजेत म्हणून सभागृहात या विषयी चर्चा झाली पाहिजे. कोणाकोणाचा राजकीय पाठिंबा या आदर्श प्रकरणाला मिळाला त्यांची नावे अहवालामध्ये आहेत, जसे की, विलासराव देशमुख, सुशीलकुमार शिंदे, अशोक चव्हाण, राजेश टोपे, सुनील तटकरे. क्विट प्रोकोमध्ये पुन्हा त्यातील काही नावे आली आहेत. क्लिअर म्हटले आहे. कमिशनने संबोधनात टॉलस्टॉयची गोष्ट ऐकवली आहे. How much land does a man need? आपल्याला किती भूक लागते, हे सांगितले आहे. आपला हावरटपणा किती असू शकतो, हे सांगितले आहे. त्या माणसाला प्रचंड जमीन हवी होती, तो सकाळपासून संध्याकाळपर्यंत काही न खातापिता खूप चालला आणि शेवटी पडला. त्याला रक्ताची उलटी झाली आणि तो साडे पाच फूट खड्यांत पडला. राज्यातील राजकीय नेत्यांना हे का कळत नाही की, आपला हावरटापणा साडे पाच फुटांइतकाच पाहिजे. एकावर एक मजले, फ्लॅटवर फ्लॅट द्या, असे नको. इतक्या कडक भाषेत सांगितल्यानंतरही माननीय मुख्यमंत्री चर्चा करणार नसतील तर मला माफ करा, हा दोष आपला राहील. अहवालावर चर्चा करू असा आपण आग्रह धरला पाहिजे. आम्ही अजून एक आठवडा थांबण्यास तयार आहोत. आमच्या मोदी साहेबांची सभा होऊ द्या, आम्हाला सभेस जाण्याची गरज नाही. आम्ही येथे थांबून चर्चा करू. कारण मोदी साहेबांच्या सभेपेक्षा राज्यात झालेला भ्रष्टाचार जो कमिशनने उघड केला आहे, त्यावर चर्चा केली तर पुढे किमान हा भ्रष्टाचार थांबेल. भ्रष्टाचार थांबविण्याची इच्छा असेल तर सरकार या चर्चेला मान्यता देईल, अशी माझी अपेक्षा आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी प्रथमत: तीव्र शब्दांत सरकारचा निषेध करतो. कारण राज्याची राज्यभाषा मराठी असताना देखील अहवाल आम्हाला इंग्रजीमध्ये दिला आहे. तुमच्याकडे तो अहवाल इंग्रजीमध्ये आला असेल पण तो मराठीमध्ये भाषांतरित करून आमच्याकडे आला पाहिजे होता.

**सभापती** : शासनाने तातडीने या अहवालाचे भाषांतर मराठी भाषेत करून घ्यावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, अहवालात एक वाक्य भयानक आहे, ते मी वाचून दाखवितो.

"Adarsh is not a saga of ideal co-operation but it is a shameless tale of blatant violations of statutory provisions, Rules and Regulations. It reflects greed, nepotism and favouritism on the part of some people who were, in one way or the other associated with the Adarsh CHS."

सभापती महोदय, एवढ्या भयानकपणे आदर्शच्या अहवालात नोंद झाली असेल तर याची गंभीरता, भीषणता समजून घेतली पाहिजे. त्यामुळे भ्रष्टाचाराची कार्यपध्दती ज्याला मोडस ऑपरेन्डी म्हणतो ती कशी असेल यावर चर्चा होणे आवश्यक आहे. राज्यातील राज्यकर्त्यांच्या माध्यमातून प्रशासकीय अधिकाऱ्यांनी आपला अधिकार वापरून याबाबतीत कसा प्रचंड भ्रष्टाचार केला आहे, ते किती भयंकर आहे, हे सांगितले आहे. बेनामी फ्लॅट किती आहेत, याची यादी दिली आहे. बोगस मेंबर्स कोण आहेत, राजकीय मेंबर्स कोण आहेत, अधिकारी कसे आहेत, त्यांचे किती फ्लॅटस् आहेत, लूटणारे अधिकारी कोण आहेत, या संदर्भातील सर्व महिती आली आहे. त्यामुळे ही गंभीर बाब आहे. आपण हा अहवाल स्वीकारायचा की नाकारायचा हा आपला अधिकार आहे. या भयानक घटनेच्या संदर्भात चर्चा झाल्यानंतर सरकारवर नैतिक बंधन निर्माण होईल की, आपण नक्की काय स्वीकारतो किंवा नक्की काय नाकारतो. त्यामुळे अहवालावर या सदनात तातडीने चर्चा होणे अत्यंत आवश्यक आहे. आपण नियमाप्रमाणे आम्हाला यावर चर्चा करण्यासाठी वेळ द्यावा आणि अहवालावर तातडीने चर्चा घडवून आणावी, अशी माझी आपणास विनंती आहे.

( नंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, सबंध महाराष्ट्राचे लक्ष लागले होते. हा अहवाल विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांमध्ये सादर केला जाणार आहे की नाही असे न्यायालयाने देखील सरकारला विचारले होते. आज हे अधिवेशन संपत असताना शेवटच्या क्षणी हा ए.टी.आर.सभागृहाला सादर करण्यात आला आहे. हा अहवाल आम्ही वाचलेला नाही. हा अहवाल शेवटच्या दिवशी सादर करण्या पाठीमागचा उद्देश काय आहे ? हा आदर्श घोटाळा झाला नसता तर विद्यमान माननीय मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण हे राज्याचे मुख्यमंत्री म्हणून राज्यात आले नसते. या घोटाळ्यामुळेच ते मुख्यमंत्री झाले आहेत. त्यांचे चारित्र्य निष्कलंक व स्वच्छ आहे. ते जपण्याचे काम त्यांच्याकडून होईल अशी आमची अपेक्षा होती. त्यांनी असे सांगावयास पाहिजे होते की, होय, हे चुकलेले आहेत, त्यांना शासन केले पाहिजे. मग राज्याचे माजी मुख्यमंत्री असोत, मोठमोठे आयएएस अधिकारी असोत, त्या सर्वांना पाठीशी घालून, पूर्वीच्या चार मुख्यमंत्र्यांप्रमाणेच पाचवा मी मुख्यमंत्री असून अशा पध्दतीने भ्रष्टाचारावर शिक्कामोर्तब करु शकतो. दुर्दैवाने ते दाखविण्याचे पाप त्यांनी केलेले आहे. त्याचा मी धिक्कार व निषेध करतो.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, या सभागृहात हा अहवाल ठेवल्यानंतर आपल्या घटनेतील तरतुदी समजून घेण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते. एकीकडे असे म्हणावयाचे की, हा अधिकार सरकारचा आहे. दुसरीकडे या अहवालाबरोबर हे जोडले पाहिजे, असे म्हणून त्या म्हणण्याला एक वाक्य जोडावयाचे. या सदनाने निर्णय घेतल्यानंतर या आयोगाची नियुक्ती केली होती आणि त्या आयोगाचा हा अहवाल आलेला आहे. या अहवालात दोन महत्वाच्या गोष्टी आहेत. या अहवालासंबंधी आम्ही सभागृहात व सभागृहाबाहेर असे ऐकलेले आहे की, ही जागा डिफेन्सची आहे, महाराष्ट्र शासनाची नाही. हा एक मुद्दा झाला. दुसरा मुद्दा लोकांच्या मनावर वारंवार बिंबवला गेला आहे. त्याचा प्रचार व प्रसार केला गेला की, ही सोसायटी कारगिलमधील जवानांच्या विधवांसाठी आरक्षित होती. या अहवालामध्ये या दोन्ही बाबींसंबंधी स्पष्टता आलेली आहे. ही जागा महाराष्ट्र शासनाची आहे हे स्पष्ट झालेले आहे. या जागेवर कारगिलमधील जवानांच्या विधवांसाठी आरक्षण नव्हते. त्या ठिकाणी पर्यावरणाचे उल्लंघन झाले असेल किंवा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.भाई जगताप.....

अतिरिक्त एफएसआय दिला असेल त्याबाबतीत जी काही कारवाई करावयाची होती ती व्हावयास पाहिजे. त्याच्या आड कोणी येत नाही. परंतु मला या सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, राज्यात जेव्हा सत्ताबदल झाला होता त्यावेळीही श्रीकृष्ण आयोगाचा अहवाल स्वीकारला होता काय, त्यावेळी सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस ह्या मंत्री असताना महाराष्ट्रातील डाळ घोटाळ्याचा अहवाल त्या सरकारने स्वीकारला होता काय, तत्कालीन पाटबंधारे मंत्री श्री. शिवणकर यांच्या संदर्भातील अहवाल स्वीकारला होता काय, तत्कालीन कृषी मंत्री श्री.शशिकांत सुतार यांच्या कृषी खात्यातील घोटाळ्याचा अहवाल स्वीकारला होता काय ?

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात. )

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांना मी सांगू इच्छितो की, एखाद्या सन्माननीय सदस्यांच्या विरुध्द आपल्याला जर आक्षेप घ्यावयाचा असेल तर त्यांना रीतसर नोटीस देऊन तुम्हाला आक्षेप घेता येईल. आता सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांच्या नावाचा आपण उल्लेख केलेला आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांची माफी मागून मी सांगू इच्छितो. त्यांच्या व्यतिरिक्त मी ज्यांचा उल्लेख केला आहे ते या सभागृहाचे सदस्य नाहीत.

**सभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताईंचे आपण नाव घेतलेले आहे. ते रेकॉर्डवर राहणार नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांना आपण बोलण्याची परवानगी द्यावी. आपण या अहवालावरील चर्चा स्वीकारल्यानंतर आम्ही त्यांना उत्तर देऊ.

नंतर श्री.शिगम.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे.....

(सत्ताधारी आणि विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य आपापल्या जागेवर उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

सभापती महोदय, माझे म्हणणे असे आहे की, या अहवालावर सविस्तर चर्चा करण्याची आमची तयारी आहे. सभागृहामध्ये माननीय मुख्यमंत्री बसलेले आहेत. त्यांनी म्हणावे की, चला, आता आपण चर्चा सुरु करुया. आम्ही आता चर्चा करायला तयार आहोत. सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांना देखील या विषयावर बोलता येईल. तेव्हा या अहवालावर चर्चा करावी. तोपर्यंत सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप जे काही बोलले आहेत ते कार्यवृत्तातून काढून टाकावे.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, या अहवालासाठी चौकशी आयोग नेमला होता. कमिशन ऑफ इन्क्वायरी ॲक्ट अंतर्गत या प्रकरणी चौकशी झालेली आहे. चौकशी समितीने आपले फॅक्टस् फाईंडिंग्ज दिलेले आहेत. अहवालावर काय कारवाई करायची हा राज्य शासनाचा अधिकार आहे.परंतु कारवाई का फेटाळली ? याबाबतीत 3 कारणे दिलेली आहेत. टर्म्स ऑफ रेफरन्समध्ये तीनच कारणे नव्हती. त्यामध्ये बरीचशी कारणे होती आणि त्याबाबतीत चौकशी व्हायची होती. त्यापैकी फक्त तीनच कारणे दिली. ही जमीन महाराष्ट्र शासनाच्या मालकीची आहे, ही जमीन संरक्षण कर्मचाऱ्यांसाठी आहे. मग बाकीच्या मुद्यांचे काय झाले ? त्याची चौकशी काय झाली आणि हा अहवाल नाकारण्याची कारणे काय आहेत ती सभागृहाला समजली पाहिजेत. अहवाल नाकारायचा की स्वीकारायचा हा शासनाचा अधिकार आहे. पण अहवाल का नाकारला हे सभागृहाला कळणे गरजेचे आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, हा अहवाल सरकारने स्वीकारलेला नाही. या अहवालामध्ये ज्या अधिकाऱ्यांची नावे आलेली आहेत ते आज देखील अधिकाराच्या पदावर राज्य सरकारचा कारभार चालविण्याच्या भूमिकेमध्ये आहेत. त्याच बरोबर त्यामध्ये गुंतलेले काही मंत्री महोदय सरकारच्या कॅबिनेटमध्ये आहेत. त्यामुळे हा अहवाल न स्वीकारण्याचा सरकारला अधिकार आहे. परंतु याच अधिकाऱ्यांच्या मार्फत, याच मंत्र्यांच्या मार्फत पुन्हा असे नवे आदर्श तयार होणार

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे...

नाहीत याचा भरवसा जनतेला कसा मिळणार ? हा अहवाल न स्वीकारण्याचा अधिकार सरकारला असला तरी या प्रकरणी बेनामी व्यवहाराच्या संदर्भात ज्या अधिकारी आणि मंत्र्यांची यादी दिलेली आहे त्यांच्या बाबतीत कारवाई झाली पाहिजे ही जनतेची अपेक्षा तुम्हाला पूर्ण करावीच लागेल.

**सभापती** : सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी आदर्श सहकारी गृहनिर्माण संस्थेचा अहवाल या ठिकाणी सादर केला आहे. सदनाच्या दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना जे काही स्पष्टीकरण पाहिजे होते त्यादृष्टीने त्यांनी आपल्या भावना या ठिकणी व्यक्त केल्या. यावर यापेक्षा जास्त चर्चा न करता अहवालाच्या अनुषंगाने झालेली ही चर्चा मी थांबवितो.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य घोषणा देतात.)

----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेसंबंधी

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी ज्या विषयी नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना दिलेली आहे तो विषय आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये नसल्यामुळे मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे. परंतु हा विषय नियम 289च्या प्रस्तावाचा कसा होतो याबाबत सन्माननीय सदस्यांनी आपले म्हणणे थोडक्यात मांडावे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मी आधीच म्हटले होते की, कमिशन ऑफ इन्क्वायरी ॲक्टच्या नियमाने सरकार चालले असते तर हा अहवाल मागील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी सभागृहासमोर आला असता. कारण त्यावेळी सहा महिने पूर्ण व्हायचे होते. सरकार अहवाल आणत नसल्यामुळे माझ्या सारखा राजकीय कार्यकर्ता राजकीय व्यवस्थेची लढाई लढतो. परंतु दुर्दैव हे आहे की आपण प्रत्येक वेळी राजकीय व्यवस्थेवर ज्युडिशिअरी व्यवस्थेला हावी होऊ देता.

...नंतर श्री.गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ प्रथम श्री.शिगम 15:45

श्री.विनोद तावडे....

म्हणून आम्हाला कोर्टात जावे लागले. आपल्या राज्याचे तत्कालीन मुख्य सचिव म्हणाले की, असे अनेक अहवाल पडलेले आहेत. ते आता सेवानिवृत्त झाले आहेत. आपण मुख्यमंत्री असताना राजकीय व्यवस्थेला ज्युडिशिअरीच इतके खाली आणत गेलात तर कसे चालेल, म्हणून आम्ही नियम 289 चा प्रस्ताव दिला होता. मी नियम 289 चा प्रस्ताव दिला त्यावेळी आजच्या कामकाजात हा विषय नव्हता. आता तो विषय माननीय मुख्यमंत्र्यांच्या मांडणी नंतर आलेला आहे. तो विषय आता आलेला असल्यामुळे तो विषय आपण नाकारु शकत नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी विषय मांडल्यानंतर तो विषय सभागृहात आपोआप येतो. तो विषय आलेला असल्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांनी स्वत: उभे राहून सांगितले पाहिजे की, या विषयावर चर्चा करण्याची विरोधकांची इच्छा आहे. हा भ्रष्टाचार महाराष्ट्राला कलंक होता. यापुढे असे होऊ नये. आम्हाला कोणाचे नाव घ्यावयाचे नाही. या प्रकरणात चुकीच्या गोष्टी होत गेल्या यासंबंधी आम्हाला विचार मांडावयाचे आहेत. ते जर मांडले तर महाराष्ट्रात स्वच्छ गोष्टी कशा चालल्या पाहिजेत, यासंबंधी आम्हाला सकारात्मकदृष्टया चर्चा करावयाची आहे. ही चर्चा होऊ द्यावी असे माननीय मुख्यमंत्री उभे राहून बोलले नाहीत तर खरच Brutus, you too? असा प्रश्न इतिहासात विचारला गेला तसा प्रश्न आपल्याला विचारावा लागेल. आम्हाला एवढेच म्हणावयाचे आहे की, सरकारने उठून सांगावे की, ही चर्चा होऊ द्यावी.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, आपण माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांच्या नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेस अनुमती नाकरली आहे परंतु हा विषय नियम 289 च्या प्रस्तावाचा कसा होतो याबाबत सन्माननीय सदस्यांना आपले म्हणणे मांडण्यास आपण परवानगी दिली आहे. परंतु आपल्यालाच फार चांगले शब्दप्रयोग करता येतात अशा अविर्भावात ते बोलत आहेत. माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री हे राज्याचे प्रमुख आहेत. आम्ही माननीय विरोधी पक्ष नेत्याच्या बाबतीत वक्तव्य करताना आदरार्थी शब्द वापरतो. या राज्याच्या मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्र्यांच्या बाबतीत एखादा शब्दप्रयोग करीत असताना आदरार्थी बोलले पाहिजे. त्यांच्या नंतर तुमचे स्थान आहे. (अडथळा ) आम्ही सुध्दा माननीय विरोधी पक्षाच्या बाबतीत असे शब्दप्रयोग करु शकतो ही गोष्ट आपण लक्षात घ्यावी. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आपला विषय मांडा. त्यास आमचा विरोध नाही. (अडथळा)

श्री.संजय दत्त : माननीय मुख्यमंत्र्यांच्या बाबतीत "तू" असा शब्दप्रयोग करणे हे बरोबर नाही. (अडथळा)

**सभापती** : माननीय विरोधी पक्ष नेते, आपण अत्यंत चांगल्या भाषेत अत्यंत खोचक मुद्दे मांडणारे आहात. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री यांच्या बाबतीत एखादा शब्द अनवधानाने उच्चारला गेला असला तरी ते बरोबर नाही. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जे दोन शब्द वापरले आहेत, ते रेकॉर्डमधून काढून टाकण्यात येतील.

श्री.दिवाकर रावते : नियम 289 बाबत चर्चा सुरु आहे. सन्माननीय सदस्य मध्येच उठले आणि ते Brutus, you too? म्हणाले. आम्ही चर्चा का मागतो आहे या विषयी माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी खुलासा केलेला आहे.

श्री.संजय दत्त : माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी Brutus, you too? असा चुकीचा शब्दप्रयोग केलेला आहे.

श्री.हेमंत टकले : माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे हे त्यांची बाजू मांडत असताना आणि त्यांचा मुद्दा स्पष्ट करीत असताना त्यांना ज्या पध्दतीने बोलावयाचे आहे, तसे ते बोलू शकतात. हे मान्य करुन सुध्दा आपण जेव्हा इतिहासाचे दाखले देता त्यावेळेला त्याचा संदर्भ त्यावेळच्या परिस्थितीशी जोडला जातो. आणि Brutus, you too? हे कोणत्या वेळेला कसे म्हटले गेले होते. हा रेफरन्स त्यामागे असतो. तसा रेफरन्स या प्रकरणात नाही. हा वाक्प्रचार वापरुन आपण मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्री पदाची जी एक शान आहे त्याच्यावर संशय निर्माण करीत आहात. हे चुकीचे आहे.

यानंतर श्री.भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले.........

आपण त्या रिपोर्टबद्दल बोलू शकता. ते मांडण्याचा तुम्हाला अधिकार आहे. परंतु दाखले देताना आपण कोणाची याबद्दलची गरिमा आणि प्रतिष्ठा याला धक्का लागणारे इतिहासाचे दाखले देऊ नयेत अशी आमची विनंती आहे.

**सभापती** : मी दोन्ही शब्द कामकाजातून काढून टाकले आहेत. या ठिकाणी नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना माननीय सदस्य श्री.विनोद तावडे व इतर यांनी दिलेली आहे. आजच्या कामकाजामध्ये या अनुषंगाने कोणताही विषय नाही. त्यामुळे मी ही प्रस्तावाची सूचना नाकारीत आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आता विषय सभागृहामध्ये उपस्थित झालेला आहे.

**सभापती** : आज मी ही चर्चा नाकारली आहे.

(विरोधी पक्षाचे माननीय सदस्य वेलमध्ये येऊन माननीय सभापतींशी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

मी सभागृहाची बैठक दुपारी 4.30 वाजेपर्यंत स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 3.51 ते 4.30 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगिती नंतर)

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

अशासकीय कामकाज - विधेयके

**पृ.शी.**: बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क

**L. C. BILL NO. XI OF 2013**

(A BILL FURTHER TO AMEND THE RIGHT OF CHILDREN TO FREE AND COMPULSARY EDUCATION ACT, 2009 IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.)

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन 2013 चे वि.प.वि.क्रमांक 11 बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, 2009 महाराष्ट्र राज्यास लागू असताना त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2013 चे वि.प.वि.क्रमांक 11 मांडतो.

**सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

......

**अशासकीय कामकाज पुढे ढकलण्याबाबत**

**सभापती** : आजच्या कामकाज पत्रिकेवर दर्शविण्यात आलेली विचारार्थ अशासकीय विधेयके पुढे ढकलण्यात येत आहेत.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**महाराष्ट्र विधान परिषद तृतीय (हिवाळी) अधिवेशन, 2013 सत्र कालावधीतील कामकाजाचा संक्षिप्त आढावा**

**सभापती** : हिवाळी अधिवेशनाचा आजचा शेवटचा दिवस आहे आणि आजचे दिवसाचे कामकाज सुध्दा आता संपले आहे. मी या सत्रकाळातील कामकाजाचा आढावा आता सदनासमोर ठेवतो.

एकूण बैठकीची संख्या - 10

मंत्री उपस्थित नसल्यामुळे वाया गेलेला वेळ - 30 मिनिटे

अन्य कारणांमुळे वाया गेलेला वेळ - 8 तास 30 मिनिटे

प्रत्यक्षात झालेले कामकाज - 67 तास 30 मिनिटे

रोजचे सरासरी कामकाज 6 तास 45 मिनिटे

**तारांकित प्रश्न**

एकूण आलेले तारांकित प्रश्न 3718 - कार्यवाहीसाठी घेतलेले तारांकित प्रश्न -2867

स्वीकृत प्रश्न - 1156 सभागृहात तोंडी उत्तरित झालेले तारांकित प्रश्न - 49

उत्तरित झालेले अल्पसूचना प्रश्न - 1

**नियम 93 सूचना -**

एकूण प्राप्त झालेल्या सूचना -86 ,स्वीकृत सूचनांची संख्या -44 , चर्चा झालेला सूचना -9

**लक्षवेधी सूचना -**

प्राप्त झालेल्या सूचना -1222, मान्य झालेल्या सूचना 218 , चर्चा झालेल्या सूचना -27

विशेष उल्लेखाच्या 52 सूचना मांडण्यात आल्या.

औचित्याचे मुद्दे - एकूण 30 मांडण्यात आले.

**नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा** -प्राप्त सूचना -4, मान्य झाली -1, चर्चा झाली -1

शासकीय विधेयके संमत - 8 ( परिषद - 1 , सभा -7 )

नियम 260 अन्वये 4 प्रस्तावांवर चर्चा झाली.

अशासकीय विधेयके विचारार्थ - 4

अशासकीय ठराव- चर्चा झालेल्या सूचनांची संख्या - 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**माननीय सभापती**.....

अर्धा तास चर्चा- प्राप्त झाल्या -112 मान्य झाल्या- 88
नियम 46 अन्वये मंत्र्यांचे निवेदन -1
अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा झाली -1

...........

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**:पुढील अधिवेशनासंबंधी घोषणा

**सभापती** : मी जाहीर करतो की, महाराष्ट्र विधान परिषदेचे पुढील अधिवेशन सोमवार दिनांक 24 फेब्रुवारी, 2013 पासून विधान भवन, मुंबई येथील विधान भवनात बोलवावे, अशी शिफारस राज्यपालांकडे करण्याचे ठरले आहे.

----

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.:सत्र समाप्तीसंबंधीची घोषणा**

**सभापती** : सभागृहापृढील कामकाज संपले आहे. आता मी सत्र-समाप्तीसंबंधीचा राज्यपालांचा आदेश वाचून दाखवितो.

"भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 174, खंड (2) उपखंड(क) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन मी के.शंकरनारायणन, महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल, याद्वारे महाराष्ट्र विधान परिषदेचे सत्र संस्थगित करीत आहे."

आता राष्ट्रगीत गाईले जाईल व त्यानंतर सत्र संस्थगित होईल, असे मी घोषित करतो.

(यानंतर राष्ट्रगीत झाले.)

( सायंकाळी 4.35 वाजता सत्र संस्थगित झाले.)

.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही